# माणूस

७ मार्च ७० चालीस पैसे



मग एक पक्षी आला.
कोठून तरी आला.
झाडावर बसला.
ते सळसळून उठले.
झाड बोलू लागले.
मुके झाड बोलू लागले...
त्याची झाली एक आत्मकथा

# माणूस

पुढील अंकी तीन विशेष लेख–

विषय : मा. यशवंतराव चव्हाण

लेखक

भाई माधवराव बागल

त्रि. शं. पारगावकर

दादूमिया

या अंकाची पृष्ठसंख्या सुमारे १००

किंमत : ८० पैसे

विक्रेत्यांनी कृपया नोंद घ्यावी.

७ मार्च १९७०

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष नववे : अंक चाळीसावा

संपादक : श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे
१०२५ सदाशिव, पुणे ३० दूरध्वनी : ५७१५१

किंमत : ४० पैसे   वार्षिक वर्गणी : वीस रुपये   परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

आपला २१ फेब्रुवारी १९७० चा अंक मिळाला. सुधाकर राजांचे ' भारत दॅट इज इंडिया ' लाजवाब. ग्यानबाही सध्या उत्तम. किरण ठाकूरही बरट्रँड रसेल बद्दल बरंच काही सांगून जातात. मौजे गांधीनगर लेखमाला उत्तम. आपल्या ' मार्ग 'बद्दल तर सवाल पैदा नही होता !


विजय तेंडुलकरांच्या ' रातराणी 'चा सुगंध जरा कमी झाल्यासारखा वाटतो. ' अंदाज ' अर्थात साप्ताहिक भविष्यातही सध्या मजा येत नाही. मध्यंतरी आपण बंद केलेले भविष्य परत का चालू केलेत ते समजत नाही. ' अंदाज 'ची ५ पाने श्री. ब. मो. पुरंदऱ्यांना दिल्यास ' माणूस 'ची लज्जत वाढेलसे वाटते.

ह्या अंकात अनुपस्थिती जाणवते ती दादूमियांची. त्यांचे लेख आपण एवढे अनियमितपणे का छापता ते कळत नाही.

५–६ महिन्यापूर्वी कोणीतरी आपणास ' माणूस 'मध्ये येणाऱ्या कथांबद्दल लिहिल्याचे स्मरते. बहुतेक अंकात येणाऱ्या कथा अगदीच सामान्य दर्जाच्या असतात. तेव्हा ह्या कथांऐवजी दुसरे काही दिल्यास ' माणूस 'चा दर्जा वाढेल असे वाटते.

फेब्रुवारी, २३.   जयंत भागवत, गिंडी–मद्रास–३२

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.



# दिल्ली

## दिनांक २४ फेब्रुवारी

### बेळगावची सौदेबाजी

चंदीगडचा प्रश्न इंदिरा–सरकारने अखेरीस कसाबसा निकालात काढला तर आता बेळगावचा प्रश्न उभा राहिला आहे. अर्थात् हाही प्रश्न जुनाच आहे, पण राजधानीच्या सरकारी वर्तुळात आतापर्यंत चंदीगडचे साद–पडसादच ऐकू येत होते ते संपून बेळगावचे ऐकू येऊ लागले आहेत. म्हैसूर–महाराष्ट्र सीमाप्रश्नावर प्रधान मंत्राणींनी सुचविलेले उत्तर दोन दिवसापूर्वी म्हैसूरने धुडकावून लावल्यापासून इंदिराजींची कृष्णशिष्टाई अडचणीत सांपडली आहे. म्हैसुरी मंत्र्यांच्या शिष्टमंडळाने गेले दोन–तीन दिवस राजधानीत भेटी–गाठीची झोड उठविली तिच्यावरून हे स्पष्ट झाले आहे की सौदा बऱ्याच घासाघिशीशिवाय पटणार नाही. इंदिरा–सरकारनेही ही घासाघीस बरेच दिवस चालणार हे ओळखले आहे. महाजन–कमिशनच्या अहवालात थोडाफार फरक करून हा प्रश्न सोडवावा अशी केंद्र सरकारची भूमिका आहे. इंदिराजींनी म्हणे म्हैसुरी मंडळींना स्पष्टपणे सांगितले आहे की कमिशनचा अहवाल म्हणजे काही दगडावरची रेघ नाही, आवश्यकता असेल त्याप्रमाणे त्यात बदल करता येईल.

सीमा–तंटयाचा केंद्रबिंदु अर्थात बेळगाव आहे. म्हैसुरी मंडळींनी केंद्र सरकारला इशारा दिला आहे की बाकीच्या प्रदेशाच्या बाबतीत थोडीफार तडजोड करता येईल, पण बेळगाव आम्हालाच मिळाले पाहिजे. अर्थात् महाराष्ट्रही नेमके हेच म्हणत आहे. दोन्ही बाजू दिल्लीत आपापल्या पार्लमेंट–सदस्यांच्या मार्फत प्रश्न धसाला लावण्याची खटपट करीत आहेत. म्हैसुरी पार्लमेंट–सदस्यांनी परवा एक अखिल–पक्षीय बैठक घेतली तेव्हा दोन्ही काँग्रेस, प्रसोपा, ससोपा व स्वतंत्र अशा सर्व पक्षातले सदस्य पक्षभेद विसरून हजर राहिले व एकत्र मिळून प्रधानमंत्राणींना भेटले. या मंडळीत केंद्रीय उपमंत्री सरोजिनी महिषी, सरकारी काँग्रेसच्या संसदीय दलाचे चिटणीस शंकरानंद, विरोधी काँग्रेसचे पुनाचा, स्वतंत्रचे लोबो प्रभु इत्यादि प्रमुख मंडळी सामील होती. उलट आपले वसंतराव नाईक, वसंतरावदादा पाटील

इत्यादि मंडळी जगजीवनरामांना भेटली व बेळगाव आम्हालाच मिळाले पाहिजे अशी अर्ज–विनंती करती झाली. जगजीवनरामांनी ठरावीक उत्तर दिले–आम्ही या प्रश्नाचा विचार करीत आहोत. बेळगावच्या भोवतालचा प्रदेश व इतर काही जंगली भाग महाराष्ट्राला द्यायची केंद्रीय कल्पना आपल्याला मुळीच मान्य नाही याची अर्थातच दिल्लीतल्या श्रेष्ठींना समज देण्यात झाली आहे.

## जनसंघ म्हणतो ' भीकबळी ' नको

पाटण्याला भारतीय जनसंघाचे अखिल भारतीय अधिवेशन झाले तेव्हा भरघोस परकीय मदतीवर अवलंबून राहणाऱ्या केंद्रीय सरकारच्या पंचवार्षिक-योजनेला प्रत्युत्तर म्हणून एक ' पर्यायी स्वदेशी चतुर्थ पंचवार्षिक योजना " आखण्याचे ठरले व त्यासाठी एक समिती नेमण्यात आली. या समितीत नुकतेच प्रकाशात आलेले तरुण अर्थशास्त्रज्ञ प्रा. स्वामी, दिल्लीतील जनसंघ–सरकारचे प्रमुख विजयकुमार मलहोत्रा, 'ऑर्गनायझर' साप्ताहिकाचे संपादक मलकानी व पार्लमेंट–सदस्य प्रा. महावीर ही मंडळी आहेत. गेल्या आठवड्यात या समितीची बैठक दिल्लीला झाली व तिच्यात " राष्ट्रीय हितासाठी कुठल्याही देशाकडून मदत घेणे ताबडतोब बंद करण्यात यावे " असे आवाहन करण्यात आले. बैठकीत झालेल्या चर्चेबद्दल पत्रकारांशी बोलताना मलहोत्रा म्हणाले : आतापर्यंत आपल्या देशाने जी परकीय मदत स्वीकारली आहे तिची आपल्याला जबर किंमत द्यावी लागली आहे. ती किंमत म्हणजे परावलंबी मनोवृत्तीची जोपासना झाली असून पुरुषार्थाचे महत्त्व कमी झाले आहे. अर्थात् याचा अर्थ असा नव्हे की आयात, निर्यात व आंतरराष्ट्रीय भांडवल कर्जाऊ घेणे बंद करायचे. हे भांडवल व्यापारी पद्धतीने घ्यायला हरकत नाही. शिवाय परकीय मदतीमुळे आपल्याला परदेशी तंत्रज्ञान स्वस्त दरात मिळत नाही तेही मिळविता येईल. भारताच्या संरक्षणासाठी आवश्यक असणारी अणु–शस्त्रे ताबडतोब तयार करण्यास घ्यावीत. असे केल्याने बेकारीही खूप कमी होईल. त्याचप्रमाणे नोकऱ्या कमी न करता शासन–यंत्रणेचा खर्च कमी करणेही शक्य आहे.

राष्ट्रीय विकास परिषदेची पुढची बैठक व्हायच्या आत जनसंघाची ही समिती आपली पर्यायी चतुर्थ पंचवार्षिक योजना तयार करील असा अंदाज आहे. स्वदेशी अणुबाँब व स्वदेशी पंचवार्षिक योजना या जनसंघाच्या दोन्ही कल्पना सरकारला तुच्छतेने धुडकावून लावता आलेल्या नाहीत हे या दोन्ही गोष्टींची नुकतीच सरकार–दरबारी जी चर्चा झाली तिच्यावरून सिद्ध झाले आहे.

– अनामिक

# मुक्ताफळे

## महात्मा–रसेल

सुप्रसिद्ध विचारवंत बर्ट्रांड रसेल हे २–२–१९७० या दिवशी निधन पावले. या 'नोबेल पारितोषिक विजेत्या तत्त्वज्ञानी माणसासंबंधी वृत्तपत्रांनी व नियतकालिकांनी जे गौरवपर लिहिले ते सर्वांनी वाचले आहेच. गणिती म्हणून, तत्त्वज्ञ म्हणून, सामाजिक बंडखोर म्हणून, विवाहविषयक प्रचलित रूढींना धक्के देणारी चमत्कारिक व्यक्ती म्हणून गेली जवळजवळ पाऊणशे वर्षे, या माणसाने गाजवली. नव्वदाव्या वर्षात पदार्पण केल्यानंतरही मोठ्या हिरीरीने अण्वस्त्र-विरोधी प्रचाराची मोहीम आयुष्याच्या अखेरीपर्यंत त्यांनी चालवली. मोहीम चालवली ती 'गोष्टी सांगेन युक्तिच्या चार' या थाटात नाही, तर प्रत्यक्ष देहदंड पत्करून.

मानवता वाचवावयाची असेल, तर जगात सर्व देशांनी अण्वस्त्र संन्यास घ्यावा आणि रशिया वा अमेरिका काय करते याचा विचार न करता, ब्रिटनने एकतर्फी [unilaterally] सर्व अण्वस्त्रे नष्ट करावी, असा या विचारवंताचा आग्रह होता. रसेल यांच्या या उपदेशाची इंग्लंडात कशी काय संभावना झाली हे लोकांना फारसे माहीत नाही.

रसेल यांच्या भूमिकेचा समाचार घेणारे एक पत्र मार्च १९६१ च्या 'एन्–काउंटर' या नियतकालिकात प्रसिद्ध झाले. लेखक होते ख्रिस्तोफर मॅथ्यू. या गृहस्थाने रसेल यांना सांगितले —

"बहुसंख्य ब्रिटिश लोकांचा रसेल यांच्या अण्वस्त्र संन्यासविषयक मतांना विरोध आहे, याचे कारण, अशी मते आम्ही पूर्वी ऐकलेलीच नाहीत किंवा ती समजायला फार गहन आहेत हे नसून, आम्हा सर्वांचा त्यांच्याशी मतभेद आहे हे होय.'

रसेल महाशय खरोखर शहाणे असल्याने, त्यांना हा फटका चांगलाच झोंबला. जून १९६१ च्या 'एन्काऊंटर'मध्ये रसेल यांनी उत्तर दिले. या उत्तरात स्वारी अधिकच घसरली. रसेल यांनी लिहिले—

'आम्हाला जगात सर्व राष्ट्रांनीच 'अण्वस्त्र संन्यास' घ्यावा असे वाटते. परंतु ब्रिटनने इतरांचा विचार न करता एकतर्फीच हे केले, तर त्याचा खूपच परिणाम होणार आहे. श्री. मॅथ्यू यांना यातली तर्कसंगती समजत नाही. ते विचारतात 'रशियाजवळ अण्वस्त्रे असताना ब्रिटनने ती काय म्हणून नष्ट करावी?' ज्यांना अण्वस्त्रां-

संबंधी माहिती आहे, ते असला प्रश्न विचारणार नाहीत! यातही सत्य आहे. ते पाहिले तर ते ब्रिटनला नामुष्कीकारक वाटणारे आहे. रशियाने मनात आणले तर ब्रिटनची यच्चयावत प्रजा, तो केवळ अर्ध्या तासात खतम् करू शकतो! रशियावर अशा तऱ्हेने गंडांतर आणण्याची ताकद ब्रिटनजवळ असलेल्या अण्वस्त्रसंचयात नाही. रशिया हा इंग्लंडचा संहार आपली फक्त २ टक्के अण्वस्त्रे वापरून करू शकतो. अमेरिकेशी तुलना केली तर इंग्लंडची अण्वस्त्रशक्ती ही तर कस्पटासमान आहे.

'मी जर उद्या असे जाहीर केले की, हाती लागतील ती शंभर अर्भके एकत्र करून, त्यांची कत्तल करण्याचा माझा विचार आहे, तर श्री. मॅथ्यू हे चमकून उठतील. परंतु हाच गुन्हा प्रचंड प्रमाणावर करण्याची शक्यता जगात निर्माण होत असताना मात्र, आम्ही शांत राहावे अशी अपेक्षा आहे काय? नीरो फिडल वाजवीत होता तोच हा आदर्श होय. फरक इतकाच की त्या वेळी फक्त रोम शहरच काय ते जळत होते!'

श्री. ख्रिस्तोफर मॅथ्यू यांनी त्याच अंकात रसेल यांना चमकावले आहे. श्री. मॅथ्यू लिहितात—

१. रसेल यांचे बोलणे तर्कसंगत नाहीच आहे. युनिलॅटरलिस्ट – म्हणजे ते लोक, की जे, इतरांचा विचार काय आहे ते न पाहता ब्रिटनने अण्वस्त्रसंन्यास घ्यावा असे म्हणतात. आमचे – म्हणजे मल्टीलॅटरलिस्ट – लोकांचे म्हणणे आहे – सर्व अण्वस्त्रधारक देश जर अण्वस्त्रसंन्यास घेणार असतील, तरच तो ब्रिटनने घ्यावा.

२. वरील दोन्ही मते ही एकाच माणसाची असू शकत नाहीत. ही दोन्ही म्हणणी म्हणजे एकच म्हणणे होय, असे जर रसेल सांगत असतील, तर त्यांनी 'युटिलॅटरलिस्ट' व 'मल्टीलॅटरलिस्ट' या दोन्ही शब्दांची व्याख्या बदलली पाहिजे. त्यांच्या बोलण्यात बोलणे दिसत नाही.

३. रसेल म्हणतात, त्याप्रमाणे ब्रिटनची अण्वस्त्रशक्ती ही जर रशियापुढे इतकी क:पदार्थ आहे तर ब्रिटनने शस्त्रसंन्यास घेतला काय किंवा न घतला काय! ब्रिटनचा विचारच मुळी या प्रश्नात महत्त्वाचा ठरत नाही.

४. रसेल यांच्या अखेरच्या मुद्द्याला शांतपणे उत्तर देणे कठीण आहे. रसेल सुचवतात त्याप्रमाणे, 'क्रेमलिन' व 'व्हाईट हाऊस'मधील मंडळी ही परस्पर संहाराला टपलेली असतील, तर मानवप्रेमाचा मोठा हिस्टेरिक्–झटका सर्वांना येणे अपरिहार्य आहे. परंतु देशोदेशींनी अण्वस्त्र पैदा केली ती दुसऱ्याला वापरण्याची बुद्धीच होऊ नये यासाठी! अशा स्थितीत जगात घबराट उत्पन्न करण्याचा रसेल यांचा हा खेळ हा विचारशून्य व अधिक भयावह आहे. अशा तऱ्हेच्या

भयातून जर उद्या अण्वस्त्रयुद्ध भडकलेच, तर युनिलॅटरल – अण्वस्त्र संन्यासाचा प्रचार करणाऱ्यांना त्याचा जाब द्यावा लागेल.

हुश्श ! रसेल साहेबालाही त्याची योग्य जागा दाखवणारे हे ख्रिस्तोफर मॅथ्यू १९६१ साली कॉमन्सचे सभासद होते. म्हणजे ते लोकप्रतिनिधीच होते.

ब्रिटनने पैदा केलेले अण्वस्त्र नष्ट करावे व ज्यांच्याजवळ आज अण्वस्त्र नाही, त्यांनी त्याचा 'संन्यास'च घ्यावा, असे सांगणारे 'महात्मा रसेल' हे थोर आहेत, याबद्दल आमच्या मनात शंका नाही. परंतु डोंगराप्रमाणे दुरून ही मंडळी चांगली दिसतात !

महात्मा रसेल यांना शक्य तो मोक्षच लाभणार परंतु यदाकदाचित आपले अपुरे राहिलेले अण्वस्त्र संन्यास प्रचाराचे कार्य करण्याकरता त्यांनी पुनर्जन्म घेण्याचा हट्टच धरला, तर तो त्यांनी इंग्लंडमध्येच घ्यावा ! कारण तिथे ख्रिस्तोफर मॅथ्यू सारखे जागरूक सामान्यजन विपुल आहेत. इंग्लिशांना हे माहीत आहे की ज्यांच्या मनगटात दंड करण्याची शक्तीच नसते, त्यांनी आपण क्षमाशील आहोत असा डांगोरा पिटण्यात आणि ऊर बडवण्यात अर्थ नाही. जगात युद्धाचे, कलहाचे, रक्तपाताचे उच्चाटन करू पाहणे हे अतिथोर लक्षण होय, परंतु ते आज घडीला शक्य मात्र नाहीच नाही ! आज जे अण्वस्त्र संन्यास घेऊ म्हणतील, ते अण्वस्त्रधारी राष्ट्रांच्या दयेवर आणि भिकेवर जगणारे असे कायमचे लाचारच राहतील.

– ग्यानबा




कलकत्ता. रात्री दहा.

काळा ठरीव फलक : बार विल रिमेन ओपन टिल ट्वेल्व्ह पी. एम. लंच अँड कॅबरे.

रिसेप्शन काउंटरवर पांढऱ्या रक्तहीन कातडीचा म्हातारा आर्मेनियन रिसेप्शनिस्ट नाकाच्या शेंड्यावर चष्मा ठेवून सुरकुतली मुद्रा जाडजूड उघड्या हॉटेल रजिस्टरकडे रोखून राहिलेला; मधून मधून येते जाते चष्म्यावरून न्यहाळीत.

समोरचा आलीशान जिना चढून वर. बाजूच्या कांचांच्या भिंतीआड मंद प्रकाश. काचेचे दार लोटून त्या

रातराणी । विजय तेंडुलकर

# उगीच का कान्ता.... कलकत्त्यातले

वाटेने बारकडे. ' बो 'टाय बांधलेला, निळ्या सुटातला गोऱ्या कातडीचाच उंच मॅनेजर उठून स्वागताचा उपचार पुटपुटतो.

लाउंजमध्ये मंद, रंगीबेरंगी प्रकाशात अनेक सुव्यवस्थित टेवले खुर्च्या. एका टोकाला बार. दुसऱ्या टोकाला छोटा मंच. त्यावर गडद सुटातले काही बँडवाले बसलेले. एकजण उभा. बँड सुस्तपणे एका लयीवर डुलत झुलत वाजतो आहे. झुरमुरत, झिगझिगत, झणाणत. वेटर्स अगदीच तुरळक गिऱ्हाइकांपुढे पेये, खाद्ये आणून आदबीने ठेवताहेत.

अगदी काल परवापर्यंत ईव्हिनिंग ड्रेसशिवाय येऊ देत नसत. नियम म्हणज नियम, मग अशा अनौपचारिक उत्सुकांना प्रवेश मिळू लागला, पण वेगळे अस्पृश्यांसारखे त्या तिकडल्या आडोशाला बसवीत. आता ते येतात आणि कुठेही मनचाहे बसू शकतात. ईव्हिनिंग ड्रेसवाल्यांची गर्दीच कमी असते. एकेकदा लाउंज रिकामा असतो आणि या रिकाम्या लाउंजपुढेच बँडवाले वादन करतात. आज थोडी गर्दी आहे. मग ती गटागटाने वाढते. आज ' कॅबरे 'मध्ये लिंडा आहे.

बँडवाल्यांपैकी टक्कलवाला नळकांड्याचा दूरध्वनीक्षेपक तोंडापुढे धरून आता गातो; लयीवर मुरडत, झुलत, पायाने ताल धरीत. त्याचे इंग्रजी गाणे विरहाचे असते. मी इथे एकटा आहे. मला तुझ्याविषयी फार ओढ आहे. मी तुझी आठवण करतो आहे. तू कुठे असशील ? काय करीत असशील, आपली भेट कधी होईल ? कधीही होवो पण मला तुझ्याविषयी फार ओढ मात्र आहे आणि मी आपला तुझ्या आठवणीवर इथे जगतो आहे. हे विसरू नको...

मंद प्रकाश. मंद लय. मंद गीत. तुरळक गर्दीची कुजबुज. प्याल्यांची किणकिण. वेटर्सची ये जा. कोणी एकजण गीताच्या शब्दांत गुंतून एकटाच बेचैनपणे मद्याचे मोठमोठे घोट घेतो आहे. त्याची घरची आठवण चाळवली आहे. दूर राहिलेल्या घरची आठवण. त्याच्यासारखे आणखीही इथे असतील. रोज रात्री येतात. एकटे बसतात. गटाने आले तरी हळूहळू एकटेच होतात. मग मद्य घोटीत या असल्या गीतांच्या लयीवर, स्वरावर, शब्दावर दूर राहिलेल्या घरासाठी, सुहृदयांसाठी, शाश्वतीसाठी हुरहुरतात. बेचैनीने आणि मद्याने भरतात. कलकत्त्यात असे पुष्कळ आहेत. मोठी वेतने. मोठे हुद्दे. थोडक्या अवधीसाठी इथे आले आणि इथेच अडकून पडले. नवे कोणी खुषीने किंवा सक्तीने येणारे तयार होत नाही तोवर कलकत्ताच. कलकत्ता, त्याच्या अशाश्वत, धुमसत्या वातावरणासकट. दंगे, गावठी बॉम्ब्ज, घेराव आणि बंगाल फॉर बेंगॉलीजच्या वृत्तीसकट. एक बंदिस्त संस्कृती. धमन्यातून वाहणारे आणि कधी रस्त्यातून वाहणारे बरेच गरम रक्त. चेअरमन माओ ईज अवर चेअरमनच्या परक्या घोषणा वागवणाऱ्या भिंती. रिक्षा ओढणारे आणि हाडे चघळणारे दारिद्र्य...पैशासाठी काहीही देऊ करणारे...

भेट कधी होईल ? आपली भेट कधी होईल ? मी तुझी इथे आठवण करतो आहे...मी एकटा आहे...लयीवर हिंदकळत मंचावरून तो टक्कलवाला दर्दभऱ्या पुरुषी स्वरात गातो आहे, टेबलाटेबलाशी मद्याचे ग्लास घोटाघोटाने रिते पडताहेत, एका उत्सुकतेने नजरा मनगटी घटचाळे पहाताहेत. आणखी माणसे येतात. कांही धिप्पाड गोरी. काही चपटचा चेहऱ्यांची पिवळी. काही काळी. मोक्याची राखीव टेबले भरतात.

एका घोळक्यात बंगाल सरकारचा एक बडा सरकारी अधिकारी आहे. कोणीतरी त्याची ओळख कोणाला तरी करून देते. तो बरोबरच्यांची ओळख करून देतो.

सगळे एकमेकांना 'ग्रेट' 'बिग' 'व्हेरी बिग' म्हणतात. मुख्य ओळख एकच. मद्य घेत घेतच ते इथे पोचले आहेत. स्वर घसरताहेत. मुद्रा बधिर आहेत. मने जड धुंद आहेत. एकजण मुंबईला कांहीकाळ घालवलेला बंगाली 'ग्रेट' फिल्म क्रिटिक आहे. घसरत्या स्वरात तो प्रौढीने सांगतो, त्याचे वडील भूगर्भशास्त्रज्ञ होते आणि त्याने बालपणी कोल्हापूर सांगली वेंगुर्ले पाहिले आहे. 'शिवाजी भगवान'चा परवल तो साक्षी पुराव्यादाखल उच्चारतो आणि झिंगले स्मित करतो. ऑकॉश। पॉतॉल एक कोरू, मुंबई ऑमचीच ऑय...तो पुनः तेचतेच, पुन्हा चष्मा सावरीत म्हणत रहातो. मग 'लटपट लटपट' म्हणून दाखवतो. त्याला जास्त झाली आहे आणि म्हणून आपल्या व्यक्तिमत्वाचे विनबंगाली विशेष तो मोठ्या प्रौढीने मिरवतो आहे. एरवी बंगाली माणसे अशी चूक करीत नाहीत! डु यु लाइक लिंडा? तो पुन्हा पुन्हा जवळच्या सर्वांना विचारतो. चॉंगली ऑय? तो विचारतो. नाइस, नो? व्हेरी नाइस! वरॉ ऑय नॉ? – तो विचारतो. तो आणि त्याचे सांगाती मिस् लिंडाला भेटण्यासाठी मुद्दाम आले आहेत. खरे म्हणजे इथे बसलेला जवळजवळ प्रत्येकजण आज रात्री लिंडासाठी जमला आहे. सारे लिंडाची प्रतीक्षा करताहेत. बॅंड नवे झुरते गीत वाजवतो आहे. टक्कलवाला नव्या लयीवर अंग हिंदकळवीत ते गीत गातो आहे; पण आता त्या गीताला खुषीचा श्रोता नाही. साऱ्यांना यापलीकडचे हवे आहे–लौकर.

मग ढोलक, झांजा, बाजाची पेटी मंचावर आणून मांडली जाते. सूटवाल्यांचे इंग्रजी गीत संपून सुरवार जाकिटातले साथीदार येऊन या वाद्यांचा ताबा घेतात. घोषणा होते: लेडीज अँड जंटलमेन, यानंतर सादर करीत आहो कथाकली नृत्य: मिस् एडना लोबो यांचे. मंचाभोवतालचे दिवे विझतात. प्रेक्षकांच्या बाजूकडून मागून एकच प्रकाशझोत रंगमंचाकडे येतो. कथाकली पोषाखात कोणी एडना लोबो प्रवेशते. निर्विकार मुद्रेची आणि सामान्य रूपाची तरुण मुलगी. झगमगत्या कथाकली शृंगारातही ती विचारी फार सामान्य दिसते. सामान्य नाचते. तिचा जोडीदार उजवा नाचतो. पण बहुतेक गिऱ्हाईक आता नाक मुरडत घोट रिचवीत बघत असते. भरपूर कपड्यांच्या असल्या भारदस्त शास्त्रोक्त सपक सांस्कृतिक नाचात इथे कुणालाच तूर्त रस नाही. मग भांगडा नृत्य होते. तेही तसेच सपक. शिकाऊ. जुजबी. उतावळ्या टाळ्या पडतात.

डु यु लाइक कोलकोता? डु यु लाइक लिंडा? नाइस, नो? व्हेरी नाइस! तो तर्र बंगाली फिल्म क्रिटिक भोवतालच्यांना आवर्जून विचारीत आणि सांगत असतो. मध्यच चालू पंजाबी नृत्याला लयीच्या टाळ्या मारतो. मध्येच उठून उत्तेजन देतो. ऑमी मुंबईकोर...तो मध्येच म्हणतो. नृत्य संपते आणि तो आपले मुंबईकरत्व म्हणजे महाराष्ट्रीयत्व सिद्ध करण्यासाठी चक्क गाऊ लागतो, उगिच कॉ कॉंतॉं गॉंजितॉं...दोन्ही कान धरून मद्याने भरलेल्या धूसर डोळ्यांनी पहात

तो म्हणतो, ओब्दुल करीमखा...
उगिच कॉ...कॉंतॉ...

नवी घोषणा होते. नाऊ वुई प्रेझेंट द फेमस फायर ईटर नेल्सन डांटे...

लिडासाठी जमलेल्यांची बेचैन वडबड आणि कुजबुज यासरशी एकदम दबते. नजरा लाउंजच्या, मंचाच्या बाजूच्या प्रवेशद्वाराकडे वळतात. काळोख होतो. प्रकाश-झोत येतो. दोन वेटर्स अवजड तल-वारींचे आकार असलेले खाचा-खाचांचे दोन स्टँडस आणून एका रेषेत, मध्ये अंतर टाकून ठेवतात. त्यांच्या अनेक खाचांपैकी वरच्या खाचांत एक लांब नळकांडे आणून रचले जाते. आणि बँडमधल्या झांजांच्या झणझणाटात रंगीबेरंगी



दि फेमस फायर इटर – नेल्सन डांटे

गवती मेक्सिकन टोपी, गवताचे लांडे जाकीट, उघडे पोट, गवतासारख्या कापडाची तंग तुमान अशा पोषाखात एक मिचमिच्या डोळ्यांची, नकट्या नाकाची, सड-पातळ पोरगेली असामी प्रेक्षकांसमोर येऊन अभिवादन करते. दुधाचे वाटतील अशा ओठांच्या दोन बाजूंना उतरत्या मिशांसारखा रंग फासला आहे. नाजूक भुवया रंगाने जाड केल्या आहेत. गवती टोपीखालून काळ्याभोर बेशिस्त झिपऱ्या डोकावताहेत. कानांच्या बाजूला लांब कल्ले चितारले आहेत. उंची माफक. मनगटे नाजूक. रंग पिवळट गोरा. उघडी पावले पोरीची वाटावीत अशी.

लाउंजमध्ये स्तब्धता पसरली आहे. नजरा त्या असामीवर.

आता 'द फेमस नेल्सन डांटे' प्रेक्षकांना अभिवादन करुन तलवारींच्या स्टँडवर रचलेल्या नळीचा अंदाज घेतो. लीलेने त्या नळीखालून उताणा, हात किंवा पाठ न टेकता केवळ पायांवर शरीराची कमान तोलीत पलीकडे निघून येतो.


यात तसे विशेष कांही वाटत नाही. मग तो नळकांडे स्टँडच्या खालच्या एका खाचेत रचून दोन पेटते पलिते हाती धरतो. हे पलिते दोन हातात अल्लद धरून तो पुन्हा एकदा, पाठ न टेकता, सरपटत्या पायांवर तोल सावरीत पालित्यांसकट त्या नळकांड्याखालून अल्लद पलीकडे येतो. पुन्हा आता तो ते नळकांडे स्टँडच्या आणखीच खालच्या खाचेत रचतो. त्या नळकांड्यावर भरपूर स्पिरिट ओततो. ते

पेटवतो. ते चांगले भडभडा पेटल्यावर शरीराची लवचीक धनुकली लवबीत, तोलीत, सरकवीत त्या पेटत्या नळकांड्याखालून सुखरूप पुन्हा पलीकडे येतो— अंग भुईला न लावता.

टाळी पडते. मग तो लाकडी खुर्ची मागून घेतो. आणि खुर्ची दोन हातात तोलीत नळकांड्या खालच्या आणखी निरुंद फटीतुन तसाच अल्लद पलीकडे येऊन दाखवतो; शरीर न टेकता, केवळ पायांनी सरकत, लाकडी खुर्चीसकट. आता जोराची टाळी पडते. या तरुण चिनी नेल्सनच्या लवचीकपणाची खरेच कमाल आहे !

लिंडाला तात्पुरते सर्व विसरलेले दिसतात. पोरगेला नेल्सन आपल्या कसरतींनी नजरा बांधून घेऊन नवनवे खेळ दाखवतो.

तो तोंडात स्पिरिट घेऊन पेटत्या पलित्यांवर त्याच्या चुळा फेकीत तोंडावाटे भडभडा जाळ काढू लागतो. मग पलित्यांचा जाळ तो पेटते पलिते तोंडात घेऊन विझवतो. सर्वांसमक्ष. त्याचे दुधाचे वाटणारे ओठ साक्षात जाळ गिळतात, स्पिरिटच्या ज्वालाग्राही चुळा टाकतात. पोरगेला नेल्सन डांटे पलित्यांच्या जाळात आपला तलम कातडीचा एकेक हात धरून दाखवतो— हसतमुखाने. लीलेने. न कचरता. आता त्याने हॅट काढलेली असते. पोरगेल्या काळ्याभोर स्वैर झिपऱ्या चौफेर नाचत असतात. मिचमिचे डोळे जाळाच्या उजेडापलीकडल्या काळोखातल्या प्रतिक्रिया जागरूकपणे हेरीत असतात. प्रेक्षकांमागून तो दारूची अर्धी भरलेली बाटली हातात घेऊन पाय ओढीत येतो. प्रेक्षकांपुढे ती तोंडाला लावून मोठा घुटका घेतो. तोंड कडवट तुरट करतो. मग बाटली ग्लासात ओतून आणखी एक घुटका गिळतो. म्हणतो, मी दारू प्यायलोय ही खरी गोष्ट. पण दारू मला चढत नाही. पलीकडे बसलेल्या प्रेक्षकाला आपल्या बाटलीतली थोडी दारू तो पाजतो. मग त्याच्या ग्लासातली आपल्या ग्लासात मिसळतो. म्हणतो, आय लव्ह यू. दुसऱ्या टेबलावरचा सोडा या मिश्रणात घालतो. पलीकडल्या तिसऱ्या टेबलाशी जातो. तिथली आणखी दारू आपल्या ग्लासात घेतो. चालताना लटपटतो. म्हणतो, मी दारू प्यायलोय खरी गोष्ट. पण मला कधीच चढत नाही. आणखी एक मोठा घोट तो आता घेतो. सगळे स्मिमित नजरांनी पिणे विसरून त्याला पहात असतात. पोरगेला वाटणारा नेल्सन दारूचे एक जालीम कॉकटेल भराभरा पाण्यासारखे नाहीतर विषासारखे घोटतो आहे. एका क्षणात सराईत माणसाने ठार शुद्ध गमवावी असे मद्यप्राशन पोरगेल्या व्यक्तिमत्त्वाचा आणि कोवळ्या आवाजाचा हा नाजूक चिनी नेल्सन प्रेक्षकांसमक्ष करीत रहातो आणि म्हणतो, चढत नाही, दारू मला चढतच नाही. बोलताबोलता तो घसरतो. हातचा भरला ग्लास घरंगळतो. बाटली गळून फुटते. नेल्सनची मुद्रा यासरशी आक्रसते. डोळे आणखीच मिचमिच करतात. मग कसाबसा तो पायांवर स्वतःला सावरीत म्हणतो, आता इतकी दारू पिऊनही मी कांही



**कसरत मी करणार आहे. मला केलीच पाहिजे.**

कसरती करून दाखवणार आहे. मला त्या कराव्याच लागतात. बरे एवढेच की, दारू मला तशी चढत नाही. आणि ग्लासात म्हणून तो नवी बाटली ओततो. ती बाजूला सांडत रहाते.

सर्व प्रेक्षक प्रकाशझोतातल्या नेल्सनला मुग्ध होऊन पहात असतात.

मग नेल्सन लटपटत्या मानेने तोल सावरीत म्हणतो, आता पहिली कसरत. तो बुटाचा एक पाय टेबलावर शिकस्तीने रोवतो. दुसरा रोवू जातो आणि अर्ध्यावर धडाड्दिशी वेडावाकडा भेलकांडून दगडी जमिनीवर उताणा आदळतो. गडबडा लोळतो. शर्थीने उठतो. लटपटणे आणखीच वाढलेले असते. तशाच स्वरात तो प्रेक्षकांना नवे आश्वासन देतो. कसरत मी करणारच आहे, मला ती केलीच पाहिजे.

पुन्हा तसेच टेबलावरचा पाय निसटून धडपडन अगदी वेडेवाकडे दगडी भुईवर आदळणे. वाटावे की नक्कीच डोकेबिके फुटले असणार. निदान एकादे हाड तर नक्कीच निखळले असले पाहिजे.

नेल्सन उठून जाम लंगडतो. त्याची बधिर पोरगेली मुद्रा नशेने आणि जणू वेदनेनेही सारखी आक्रसते. मग तो लटपटत, भेलकांडत निश्चयाने टेबलावर उभा रहातो, तसाच देहाची उताणी कमान करतो आणि टेबलावरचा दारूने अर्धा भरलेला ग्लास दातांनी अचूक उचलून हात न लावता रिकामा करतो.

प्रेक्षक दबल्या टाळ्या वाजवतात. आधीच दारूने मेंदू जड झालेल्या ज्याला त्याला आता नेल्सनची काळजी लागलेली असते. एवढे पिऊन हा गृहस्थ या पुढची कसरत कशी करणार? छे छे, हा फार पितो. एवढे पिणे बरे नव्हेच. पिणे बरे नव्हेच...

नेल्सन पहिल्यासारखी देहाची उताणी कमान करून आता दोन्ही पाय उचलून दोन हातांवर स्वत:ला तोलतो आणि टेबलावरच्या तेवत्या मेणबत्तीवर ओठातली सिग्रेट नेमकी पेटवून दाखवतो आणि मोठ्या टाळ्या पडतात.

त्रिवार अभिवादन करून लटपटत नेल्सन डांटे सस्मित म्हणतो, लूक, आय ॲम नॉट ड्रंक. नॉट ड्रंक ॲट ऑ–ल ! आणि टाळ्या घेत पाय ओढीत निघून जातो.

तो बंगाली फिल्मक्रिटिक आपल्या टेबलाशी उभा राहून जोरजोराच्या टाळ्या वाजवीत असतो. म्हणतो, ऑहॉ, ऑहॉ ! कोलकोता नाइस सिटी ! इजण्ट इट अ व्हेरी नाइस सिटी कोलकोता ?

कलकत्त्याच्या त्या हॉटेल लाउंजमध्ये मद्य रिचवीत संवेदना बधिर करणारा जवळपासचा एकलकोंडा मनाशी वैतागून म्हणतो, टु हेल वुइथ कोलकोता ! साले झालनात जावो. आपण पहिल्या संधीला इथून जाणार...पहिल्या संधीला...खूप आग गिळली, खूप कसरती केल्या, खूप दारूही घोटली–त्या नेल्सन डांटेसारखी... आता बास !

नवी घोषणा : नाऊ लेडीज ॲंड जंटलमेन वुई प्रेजेंट द लास्ट ॲंड द मोस्ट पॉप्युलर कॅबरे आयटेम ऑफ धिस इव्हिनिंग बाय...मिस–लिंडा.

जोराच्या टाळ्या.

जोराचे पाश्चात्त्य पौर्वात्य मिश्र संगीत.

काळोख. मोठमोठे घोट. रोधले श्वास. दबले उत्सुक उद्‌गार. प्रकाशझोत.

आणि लिंडा.

तरुण. देखणी. निदान प्रकाशझोतात देखणी. गौरवर्ण. पुष्ट. बांधेसूद. मोकळे ब्लॉन्ड केस. अंगात एक झगमगता सोनेरी झगा. त्याला, मांड्यांपर्यंत पाय दिसावेत अशा फटी. अंगावर एकही अलंकार नाही, लिपस्टिकशिवाय कसला जाणवणारा शृंगार नाही. लिंडा–कलकत्त्यात एकटे जीवन जगणाऱ्या सुस्थितांचे आजचे एक आकर्षण.

लिंडा–सोनेरी झग्याआडची , हाडामांसाची शिसवी गोरीपान पुष्ट वळवळती मूर्ती. लिंडा–मूर्तिमंत वासना.

देहाच्या सूचक, शहारत्या, वळवळत्या, ताठरत्या, लवत्या डौलदार, नृत्यसदृश हालचाली ती एकसारखी करीत असते. यात संकोच नाही, उपचार नाहीं, मर्यादा तर नाहींच नाहीं. सूचकता नाहीं. जे असते ते साक्षात. सरळ. निर्विवाद, पण अद्याप पुरेसे उघड नव्हे.

बॅंड नृत्याच्या प्रकारची गत वाजवीत असतो. लिंडाच्या उत्तेजक नृत्यसदृश हालचाली वाढतात. आता ती प्रेक्षकांकडे सरकू लागते. चुंबने टाकते. मुक्त केस सुस्तपणे पुन्हा पुन्हा उस्कटते, खुणावते. हा सर्वसाधारण अभिनय नव्हे. रोख निश्चित एकेका चेहऱ्यावर. नजर नजरेला मनस्वी मादकतेने भिडलेली. लिंडा

नृत्यसदृश आविर्भाव करीत जाऊन आपले ' भक्ष्य ' निवडते. त्याचा चेहरा हाती घेते. त्याचे केस विस्कटते. तळव्यांनी त्याचे गाल कुरवाळते. छातीवरून पुन:पुन्हा हस्तस्पर्श करीत राहते. चुंबने टाकते. अननुभवी ' भक्ष्य ' संकोचते, गोंधळते, अंग चोरते, नजर वळवते. डोळे झाकून घेते, पण कलकत्त्याच्या सर्व एकलकोंडयांची आणि रंगेलांची एक राणी लिंडा अगदी नि:संकोच असते. मग दुसरे भक्ष्य–तिसरे–चौथे. प्रकाशझोत रंग पालटत लिंडाबरोबर सरकत असतो. बँड वळवळते, झणाणते संगीत वाजवीत असतो. टेबलांवरचे मद्याचे ग्लास एव्हांना रिते पडलेले असतात. नजरा विस्फारलेल्या असतात. माना उंचावलेल्या असतात. श्वासोच्छ्वास जोर-जोराने चालू असतात. तो तरं बंगाली फिल्म क्रिटिक उभा राहून प्रत्येक ' भक्ष्या'चा हेवा करीत ओरडत असतो, ए बाबू ! ओ मेहरबान ! अरे अरे अरे ! लिंडा स्लोली–व्हेरी स्लोली प्लीज...यौवनाने मुसमुसलेली वळवळती विषकन्या लिंडा पहिली फेरी करून परत नाचत मंचापुढे येते. पायातले उंच टाचांचे सोनेरी चढाव ती काढून फेकते. प्रेक्षकांकडे पाठ करते. संगीताच्या लयीवर वळवळत, नृत्यसदृश विभ्रम करीत झग्याचे सर्व बंद ती आता सोडते. संगीत गरम रक्ताच्या प्रचंड स्त्रोतासारखे फिरत असते. ते झणाणते. लाउंजमधून एक शहारा धावतो. लिंडाने आता झगा उतरला आहे. लिंडाची गौरकाय बांधेसूद देहलता अनावृत झाली आहे. एक कंचुकी आणि मागे किंचित खाली उतरलेली एक तंग चड्डी यापलीकडे या देहावर आता काही नाही. या अभावाचा संकोचदेखील नाही. लिंडा आता अधिकच मुक्त आहे. धुंद आहे. उन्मत आहे. तिचे शरीर आता जणू तिचे उरलेले नाही. ते सर्पिणीचे लवलवते स्फुरते संकोचते शरीर बनले आहे. लिंडाच्या अणुरेणूत मदनबाधा भरली आहे. वासना कोंदाटली आहे. रंगीत प्रकाशझोतात लिंडाचा देह म्हणजे एक अद्‌भुत विखारी स्वर्गीय स्वप्नच वाटते आहे.

अनावृत लिंडा आता पुन्हा प्रेक्षकांची फेरी करू लागते. कोणाच्या गळ्यात पडते आहे, कुणाच्या अंगावर रेलते आहे, कुणाला कुरवाळते आहे तर कुणाला विळखाच घालते आहे.

कलकत्त्यातले एकलकोंडे, गुदमरलेले, उबलेले, उपासमार झालेले पुरुषी मन आणि शरीर आता किंचित्काळासाठी सारी झुरणी विसरले आहे. सारे एकटेपण सरले आहे. उपासमार संपली आहे. जणू पंचपक्वाने समोर आली आहेत. वाफाळणारी, घसघशीत, रसरशीत, साक्षात ! आत दूर कोठे तरी एक बोलावणारे घर नाही, त्यात वाट पाहणारे सुहृद नाहीत, त्यात पत्नी नाही, कच्चीबच्ची नाहीत, आईवडील नाहीत–कसले पाश, कसली ओढ म्हणून नाही. अस्तित्वाचा नुसता एक पतंग होऊन तो उंच अंतराळात तरंगतो आहे. देहमनाचे एकच एक हलकेफूल पीस होऊन हवेत भुरभुरते आहे. रंगीबेरंगी हवेत. एका पुष्ट, हिंदकळत्या, शहारत्या, लवलवत्या समूर्त तरी अमूर्त गोऱ्यापान वातावरणात...

तो तर्र बंगाली मोठमोठ्यांदा चीत्कारतो आहे. सरकारी अधिकारी नाचत्या डोळ्यांनी टाळ्या पिटतो आहे. गोऱ्या गटातल्या स्त्रिया आतून शहारत वरवर खिदळताहेत. काळ्या मंडळीतले रंगेल रंगराव मद्य पिणे विसरून नजरांनी लिंडाचे शरीर-मद्य घटघटा पिऊन घेत आहेत...लिंडाने आलिंगिलेले थरारून बेभान आहेत....

आता लिंडा एकदा मूर्च्छना यावी तशी स्वतःला भुईवर झोकून घेते. लिंडा एकटीच वळवळत भुईवर उपडी उताणी होत राहते. लिंडा पाय झाडते, केस विस्कटते, मस्तक अनावर आवेगांनी जणू कचकचा आपटते, शरीर घसघसा चोळते, दीर्घ उसासे टाकते, चीत्कारते, गडबडा सरकत राहते...अनावृत लिंडा...लिंडा नामक एक पेटलेले शरीर...एक जळणारा देह...जळणारा आणि जाळणारा... कदाचित जळण्याचा बेमालूम सराईत अभिनयच करीत जाळणारा...वासनेच्या मातीने घडलेला...वासनांच्या एका वादळात उन्मळणारा, गदगदणारा, गडबडा लोळणारा, आक्रसणारा, स्फुरणारा...

पुष्कळजण जागचे उठून तटस्थ उभे आहेत. पुष्कळ श्वास घेण्यालाच विसरले आहेत. पुष्कळांच्या पापण्या ताठरल्या आहेत. संवेदना गोठल्या आहेत. भान हरवले आहे. त्या लाउंजमधले सारे काही लिंडा नामक वासनेच्या एका रौंरावस्था मुक्त वादळात उधळला धुराळा झाले आहेत. उग्र वादळ, सुकुमार वादळ, एकाच वेळी भयचकित आणि मंत्रमुग्ध करणारे वादळ, लवथवते वादळ, गडबडते वादळ... रंगीत प्रकाश झोताखाली गडद भुईवर वासनेच्या तेजाळ रेषा चौफेर ओढीत, गोऱ्यागोऱ्या लाटांनी उचंबळत उफाळत गडबडा धावणारे गोरे मांसल वादळ...

लिंडा पुन्हा मूळ जागी येते. लिंडा उठून उभी रहाते. ती एक रेशमी वस्त्र लपेटते. प्रेक्षकांना औपचारिक अभिवादन करते. आणि ते गोरे मांसल वादळ प्रेक्षकांना देऊन, त्या वादळात प्रेक्षकांना सोडून आवृत लिंडा, अलिप्त लिंडा, कसबी नर्तकी लिंडा दौडत आत निघून जाते.

लाउंजमधले सर्व दिवे लागतात. लाउंज प्रकाशतो. चेहरे विझतात. शरीरे संकोचतात, जागच्या जागी कलंडतात.

रोधलेले श्वास सुटतात. बँड शांत होतो. मंच रिता, ओकाबोका होतो. ते लाउंजच निश्चेतन, निष्प्राण, मुके भासते. एक विलक्षण भास सरला आहे. विशुद्ध वासनेचीच एक रम्यभीषण सृष्टी अंतर्धान पावली आहे. खरे म्हणजे एक मुक्त, रौद्र, प्रचंड असे ' उगिच का कांता ' संपले आहे.

उरते खरखर. तो तर्र बंगाली ग्रेट फिल्म क्रिटिक हावरटासारखा खातो आहे. चिनी गिन्हाइके एकमेकात मोठमोठ्यांदा वडवडत आहेत. गोरा परिवार सिग्रेटींचा धूर सोडीत खोटा खोटा हास्यविनोद करतो आहे. कोणी उठून जाऊ लागले आहेत. बिले वाटताना आणि टिप गोळा करताना वेटर्सची धांदल उडाली आहे. कलक-

त्याच्या पिंजऱ्यात नोकरीच्या बंधनापायी येऊन फसलेला बाहेरचा एकलकोंडा 'पंछी' पुन्हा सवयीच्या झुरणीत रुतला आहे. चला. उद्या सकाळी पुन्हा ऑफिस. पुनः डोकेदुख्या. युनियन. मागण्या. घेरावची कायम धमकी. न संपणाऱ्या वाटाघाटी. हाताखालच्या नोकरांच्या संशयी नजरा आणि कुजबुजी. कायम जाणीव की आपण कुणाला तरी नको आहोत आणि आपल्याला कुणीतरी फार फार नको आहे. आणि तरी सर्व असेच चालणार–ओह्–डॅमिट! डॅम्–इट!! तो आणखी मद्य ऑर्डर करतो. आता 'किक' शिवाय खरे नाही. आज रात्री शुद्ध उपयोगाची नाही. ते गोरे गोरे गडबडते वादळ...ते उफाळते, बोलावते मांसल वादळ...

कुणी तरी कुणाला तरी सांगते आहे, ही लिंडा बॅंगलोरची. अन्नाला महाग होती. नेल्सन डांटेने हिला कलकत्त्याला आणली. ही कला शिकवली. आता महिना दीड हजार मिळवते. नेल्सनचे खरे नाव वाँग. त्याच्या बापाची बुटांची मोठी फॅक्टरी आहे. पण भांडून घराबाहेर पडला. 'कारेट,' 'जिजित्सु' शिकला. तो करतो ती कसरत तो त्यात शिकला आहे. ते वेडेवाकडे पडले तरी हिशेबाने आणि अलद पडणे. आपणच उगीच घाबरतो, त्याला काही होत नाही. काडी पेटवून तिच्यावर सरळ बोट धरतो. म्हणतो, इच्छाशक्ती पाहिजे, बस्स! रोज तीन तीन तास याची मेहनत चालते, तेव्हा शरीर असे ताब्यात. पण लिंडा हल्ली याच्या हातात नाही. या बहुतेक कॅबरे पोरी अशाच...यातल्या बहुतेक म्हणे लेस्बियन असतात...म्हणून तर खुशाल पुरुषाशी खेळतात आणि पुन्हा हात झटकून कोरड्या...हिच्यापेक्षा ती नीना कितीतरी सरस...फॉर्म पण फॉर्म आहे नुसता, देखते रहो...मस्ट गो देअर वन्स...

केव्हातरी काचांच्या भिंतीमधले काचेचे दार लोटून बाहेर. आलिशान जिन्यावरून खाली. आर्मेनियन रिसेप्शनिस्ट म्हाताऱ्याच्या नाकाच्या शेंड्यावरल्या चष्म्यामधून पुढे–हॉटेलच्या इमलेवजा इमारतीबाहेर; कलकत्त्याच्या रस्त्यावर. वखवखल्या भुकेल्या नजरा, भकाटी गेलेली पोटे, पसरलेले हात, चिरगुटातली कुडकुडती शरीरे...

रात्रीचे बारा वाजले आहेत.



## प्रथमच शर्यतीत उतरुन विक्रमामागे विक्रम करणारी मराठी जोडी

# सुरेश नाईक अरुण ओक

अशोक आचार्य

नुकत्याच झालेल्या अखिल भारतीय पातळीवरील मोटारींच्या शर्यती मराठी माणसांच्या दृष्टीने अविस्मरणीय ठरतील. विशेषतः सुरेश नाईक व अरुण ओक या जोडीने या स्पर्धेत (फियाट गटात) जो अभूतपूर्व असा विक्रम केला त्यामुळे मराठी माणसाची मान नेहमीच उन्नत राहील.

याचे कारण असे की, अशा तऱ्हेच्या शर्यतीत यश मिळविणे ही आजवर पारशी, इराणी, गुजराथी किंवा अन्य कोणाही अ-मराठी माणसाची जणू मिरासदारीच बनली होती. अशा स्पर्धे-तून कारणे अनेक असतील, परंतू मराठी माणूस भागही फारसा घेत नव्हता. मोटार-मायकल शर्यतीत कै. शंकरराव वर्तक यांच्यासारखी काही मराठी माणसे असत परंतू अपवादाने नियम सिद्ध होतो त्य प्रमाणेच. कै. वर्तक हे या स्पर्धेत उतरले आणि त्यांनी तिथे सतत यश मिळविले. पारशी, गुजराती लोकांच्या तिथल्या मिरासदारीला एक जबरदस्त धक्का दिला. तसाच एक धक्का श्री. नाईक व ओक या जोडीने यंदाच्या मोटार शर्यतीत दिला आहे.

नाईक-ओक जोडीने केवळ यश मिळ-विले एवढेच नसून यंदा प्रथमच ते या स्पर्धेत उतरले होते या पार्श्वभूमीवर त्यांचे यश विशेष उठून दिसते. मराठी माणूस प्रथमच स्पर्धेत उतरतो आणि यशस्वी होतो एवढ्यावरच या यशाचे वैशिष्ट्य संपलेले नाही. स्पर्धेच्या अंतीम टप्प्यात (नागपूर ते मुंबई) मुंबईला भारतीय बनावटीची मोटर सर्वप्रथम

घेऊन येणारी जोडीही नाईक-ओक हीच होती.

या जोडीच्या आधी पाच स्पर्धक मुंबईत आले होते. परंतु त्या साऱ्यांच्या मोटारी परदेशी बनावटीच्या होत्या. 'पेट्रोल भरण्याच्या बाबतीत आपली जरा अधिक चांगली सोय झाली असती आणि खुडाळा ट्रॅकच्या ५० मैलात अँबेसेडर मोटारीने आमची विनाकारण अडवणूक केली नसती तर आम्ही सर्व प्रथम मुंबईला येऊन पोहोचलो असतो, असे श्री. ओक म्हणतात त्यात बरेच तथ्य आहे.

खुडाळा ट्रॅकमध्ये एक अँबेसेडर गाडी 'फियाट'च्या पुढे होती. वास्तविक फियाट व अँबेसेडर या गाडयांचा स्पर्धेत वेगवेगळा गट होता. आणि समजा जरी एकच असता तरी स्पर्धा होती ती मोटारीच्या वेगाबद्दल आणि ड्रायव्हिंग स्किल-बद्दल. अडवणूकीबद्दल नव्हती. परंतू अडवणूक मात्र सतत सुरू होती. वारंवार इशारे देऊनही ५० मैलापर्यंत त्या गाडीने यांच्या फियाटला काही पुढे जाऊ दिले नाही की वेगही वाढविला नाही. अखेरीस जेव्हा एका ठिकाणी थोडीशी 'जागा' मिळाली तेव्हा या जोडीने भरकन आपली 'फियाट' पुढे काढली. या साऱ्या प्रकरणात मोलाची १२ मिनिटे फुकट गेली होती.

जादा पेट्रोलसाठीही नाईक-ओक यांनी मोटारीत स्वतंत्र टाकी बसविली होती. परंतु शर्यतीच्या ऐन आदल्या दिवशी ती टाकी 'डिकी'त बसविली पाहिजे असे श्री. नाईक यांना सांगण्यात आले. त्यामुळे पेट्रोलसाठी सुमारे १४ मिनीटे (वाया) गेली. पेट्रोलची १४ आणि अडवणूकीची १२ अशी २६ मिनिटे जर वाया गेली नसती तर ओक-नाईक निश्चित सर्वप्रथम मुंबईला पोहोचले असते. (मुंबईला प्रथम येणाऱ्या नाझीर हुसेन नंतर काही मिनीटातच ते आले होते)

या मराठी जोडीने नागपूर सोडले तेव्हा त्यांच्यापुढे सहा फियाट, व काही अँबेसेडर्स व परदेशी बनावटीच्या गाड्या मुंबईकडे रवानाही झाल्या होत्या. एक एक करीत या जोडीने गाडया मागे टाकण्यास प्रारंभ केला त्याचवेळी यशाचा मार्गही ते आक्रमू लागले होते.

या सहा फियाटपैकी ३ गाडया नादुरुस्त अवस्थेत त्यांना रस्त्यात आढळून आल्या. बाकीच्या तीन गाडयांचे काय झाले ते त्यावेळी समजू शकले नव्हते. या साऱ्या प्रवासात या जोडीच्या 'फियाट'ने कधीच दगा दिला नव्हता. ब्रेक डाऊन तर नाहीच परंतु प्लग-कार्बोरेटर खराबी असलेही काही घडले नव्हते. नागपूर-मुंबई प्रवासात गाडीत साधे पाणी भरण्याचीही आवश्यकता भासली नव्हती. आणि म्हणूनच ज्यावेळी 'आमच्या 'ड्रायव्हिंग'ला ज्याप्रमाणे आमच्या यशाचे श्रेय तसेच आमच्या फियाट मशीनलाही आहे' असे जेव्हा नाईक-ओक म्हणतात तेव्हा त्याला निश्चित काही अर्थ असतो.

या गाडीने नाही परंतु काही ठिकाणी अतिउत्साही जनतेने आणि उपद्रवी दरोडेखोरांनी मात्र या विजयी स्पर्धकांना बराच त्रास दिला.

लोक उत्साहाने स्वागत करण्यासाठी उत्तेजन देण्यासाठी ठिकठिकाणी जमा होत आणि भान विसरून सरळ रस्त्यात येत. असे उत्तेजन निश्चितच स्पर्धकांना उपकारक असते परंतु ते करीत असताना ज्यांना आपण उत्तेजन देतो त्यांच्या मार्गातच येऊन यशाच्या मार्गात अडथळाही आणतो हे ज्या दिवशी या उत्साही लोकांच्या लक्षात येईल तो सुदिन ठरेल.

## आम्ही मृत्यूही पाहिला ...

आणि दरोडेखोरांच्या रूपाने तर एका ठिकाणी आमच्या मार्गात साक्षात मृत्यूच उभा राहिला होता. श्री. ओक आपला अनुभव सांगताना म्हणाले.

मध्यप्रदेश आणि गुजरातच्या सीमेवर गोध्राच्या जवळच दोहद नावाचे एक गाव आहे. त्याच्या आसपास डोंगर टेकड्यातून शर्यतीचा मार्ग होता. अंधार पडू लागला होता. नाईक-ओक यांची फियाट भरवेगात धावत होती. इतक्यात अचानक दगडांचा वर्षाव सुरू झाला. काय होते ते क्षणभर उमजेचना. काहीतरी बाका प्रसंग आहे हे ध्यानात आल्याबरोबर आम्ही गाडीचे चारही पॉवरफुल दिवे सुरू करून गाडीचा वेग आणखी वाढवला.

दगडफेक चालूच होती. आमच्या मागोमाग काही गाड्या येत होत्या. त्यांचेही फ्लड लाईटस् सुरु होते. असे रांगेने भरधाव येणारे 'दिवे' पाहिल्यामुळे कदाचित असेल परंतु नंतर ते दरोडेखोर गायब झाले.

आम्ही मोठ्या संकटातूनच वाचलो म्हणायचे. कारण नंतर जे कळले ते भयंकर होते. रात्री अशी एकटी दुकटी गाडी पाहून दगडांच्या वर्षावाने तिचा वेग कमी झाला की प्रवाशाला लुटणे हा या भागातील दरोडेखोरांचा नित्याचाच उद्योग होता. तो सारा टापू या वाटमारीसाठी ख्यातनामच होता. आमचे सुदैव म्हणून आम्हालाच काय परंतु मोटारीलाही दगड लागला नाही. श्री. ओक यांनी समारोप केला.

'रस्त्यावरच्या ट्रॅफिकचा काही अडथळा ?'

अशिक्षित ट्रक ड्रायव्हर्स अगदी खऱ्या 'सुशिक्षिता'प्रमाणे वाटले. आमची गाडी येते असे दिसले की आपणहून रस्त्याच्या कडेला वाहने उभी करीत असत. परंतु काही तथाकथित सुशिक्षित मोटारवाले मात्र अनेक वेळा हॉर्न वाजवूनही 'बाजू' देत नसत. या 'सुशिक्षितांचा (?) त्रास इंदूरपर्यंत फार झाला.

या शर्यतीत नाईक-ओक जोडीच्या फियाटने सर्वात जास्त वेग गाठला होता तो भुसावळ-नासिक या मार्गावर. यावेळी त्यांच्या मायलो मीटरचा काटा ८५-९० च्या घरात थरथरत होता. क्वचित तर त्याने ९० चीही मर्यादा ओलांडली होती. अर्थात वाहतुकीतील अडथळे वळणे-आडवळणे वगैरेमुळे त्यांच्या वेगाची सरासरी ५० च्या आसपास होती.

'खाण्यापिण्याचे कसे ? '

' खाऊन आम्ही भरपूर नेले होते. शिवाय बिस्कीटांचे पुडेही घेतले होते. परंतु खरे तर आम्हाला उपयोगी पडले ते लाडूच. खायला सोपे–गाडीचा वेग कमी न करताही सहज तोंडात टाकता येण्यासारखे. वर पाणी प्यायले की झाले जेवण ! इतर काही खाण्याची इच्छाच होत नव्हती. ध्यास होता शर्यत जिंकण्याचा. त्यामुळे बिस्कीटांचे पुडेही जसेच्या तसे परत आले.

खानपूर ते मुंबई हा प्रवास करण्यासाठी त्यांच्या फियाट गटाला वेळेचे बंधन होते १२ तासांचे. परंतु प्रत्यक्षात या ' ध्यासा 'मुळे त्यांनी ते अंतर तीन तास आधीच म्हणजे ९ तासात काटले.

## ' जोडी जमावी अशी '

श्री. सुरेश आप्पासाहेब नाईक यांचे स्वतःच्या मालकीचे माटुंगा येथे ' नाईक ऑटोमोबाईल्स ' नावाचे वर्कशॉप आहे. तीशी ओलांडून चार दोन वर्षे झालेल्या या तरुणाने मोटार मेकॅनिकचे शिक्षण घेतल्यानंतर स्वतंत्रपणे या व्यवसायात पदार्पण केले. यापूर्वी कधी त्यांनी अशा शर्यतीत भाग घेतलेला नव्हता. मोटार–चालक शर्यतीमधील अनुभव मात्र त्यांच्या गाठीशी होता. साथीदार श्री. अरुण चिंतामण ओक यांच्याकडे गेली ५–६ वर्षे ' कार ' आहे एवढाच या क्षेत्राशी संबंध. [ श्री. ओक ' रॅश ड्रायव्हिंग ' करतात असेच त्यांच्या घरच्या मंडळीचे मत ] मोटार रेसशी त्यांचा संबंध म्हणजे ते नेहमी त्या संबंधी ऐकत आलेत आणि वाचत आले. असे हे दोघे ' जवान ' बालपणापासून एकमेकांचे साथी. दोघाचाही स्वभाव तसा धाडसी.

स्वतःचे वर्कशॉप असलेला नाईक ' प्रिमियर ऑटोमोबाईल्स 'मध्ये अधिकारी असलेल्या श्री. ओक यांच्या मनाने यंदाच्या शर्यतीत भाग घेण्याचे घेतले. आणि घरच्यांचा ' विरोध ' बोथट करण्याचेच काम त्यांना सर्वप्रथम करावे लागले.

स्पर्धेत ओक यांची ' गाडी ' चालविण्यात आली. १५०० मैलांपैकी सुमार चार शाचशे पैकी (इंदूर–गोध्रा भागात) श्री. ओक यांनी गाडी चालविली त्या भागाची त्यांना माहिती होती. मूळचे ते इंदूर–देवासकडचे. आणि बाकी श्री. नाईक हे ' चक्रधर ' होते. त्यांना ' मार्ग ' दर्शनाचे (नॅव्हिगेशनचे) काम श्री. ओक यांनी केले.

रेसचा सारा मार्ग अनोखा. स्पर्धकांच्या हाती नकाशा होता. परंतु त्यात दिलेली माहिती (नीट पाहिले नाही तर) चकविणारी होती. उदाहरणार्थ–सांताक्रूज हायवे– वर आल्यानंतर वांद्र्याकडे जाण्यासाठी ' ॲरो मार्क ' ह्या नकाशात असेल, परंतु लिहिलेले असेल (विरुद्ध दिसेला) बोरीवलीकडे.

अनोख्या भागात (रेसमध्ये बहुतेक मार्ग अनोखाच असतो) म्हणूनच नॅव्हिगेशनचे महत्त्व विशेष. ज्या तीन फियाट गाड्या ' दिसल्याच नाहीत ' त्या बहुधा ' मार्ग

चुकल्या ' असाव्यात. ' उत्कृष्ट ड्रायव्हिंग आणि उत्कृष्ट नॅव्हिगेशन ' याची ज्यावेळी जोडी जमते त्यावेळी जरी स्पर्धेत प्रथमच उतरले असले तरी यश मिळू शकते हेच ' नाईक-ओक ' या जोडीने सिद्ध केले आहे.

अर्थात् स्पर्धेत भाग घेण्यापूर्वीपासूनच ' यश आमचेच ', हा आत्मविश्वास ' नाईक–ओक ' बाळगून होते. [ प्रत्यक्ष रेस सुरु होण्यापूर्वी अनेक ' नाम 'वंत थोर स्पर्धक पाहिले आणि आत्मविश्वास थोडासा ढळला ही गोष्ट वेगळी ] आणि प्रत्यक्ष गाडी सुरु झाल्यानंतर हा आत्मविश्वास वेगाबरोबर सतत वाढतच गेला.

अशी ही विक्रमी मराठी जोडी–मराठी माणूसही काही पराक्रम करू शकतो हे सत्य आजवरच्या मक्तेदारांना बजावणारी–अन्य मराठी तरुणांच्या कर्तृत्वाला आवाहन करीत आहे.


जिद्द आणि आत्मविश्वाचे अनोखे दर्शन घडविणाऱ्या ' नाईक–ओक ' या जोडी-कडून म्हणूनच आगामी मुंबई–महाबळेश्वर मोटार शर्यतीत आणखी विक्रम घडतील ही अपेक्षा.

□ □ □

---

भारतामधील अस्सल रेशीम आणि हातमागाच्या किमती कापडापासून बनविण्यात आलेल्या पाश्चात्य धर्तीच्या पोशाखांचे प्रदर्शन अलीकडेच बैरूतमध्ये भरवण्यात आले होते. आधुनिक आणि आकर्षक पोशाख बनविण्या-बाबत अंतरराष्ट्रीय ख्याती असलेल्या प्रख्यात फ्रेंच फॅशन पूट ख्रिश्चन दोर यांनी भारतीय रेशीम आणि हातमागाचे कापड यावर काचेचे मणी आणि जर यांचे कलाकुसरीचे काम करून त्या अभिनव कापडाचे सुंदर प्रदर्शन वस्तुभांडारात मांडले होते. खास करून रेशीम, ब्रॉकेड, त्याचप्रमाणे मणी यामधून तयार करण्यात आलेल्या कपड्याचे जबरदस्त आकर्षण तेथील गिऱ्हाइकांना वाटते. मध्यपूर्वेमध्ये भारतीय रेशमाच्या कापडाला जी विलक्षण मागणी आली आहे त्याचे कारण अशा प्रकारची भरविलेली प्रदर्शनेच होत. भारतातील तयार कपड्यांच्या कारखानदारांना हे एक नवीनच क्षेत्र उपलब्ध झाले आहे.

---



# मी कोण : आम्ही कोण?

मौजे गांधीनगर

लेखांक नऊ

वि. शं. पारगावकर

बरोबर दुपारी चार वाजता जगजीवन बाबू त्यांच्या मिरवणुकीसाठी सजविलेल्या गाडीत येऊन बसले. हजारो लोकांच्या माना तिकडे वळल्या. काळाभोर रंग, बेढब शरीर, अस्ताव्यस्त कपडे, घामेजला चेहरा म्हणजे त्या वेळचे बाबू जगजीवनराम. डोक्यावरची भैय्यासारखी दिसणारी पांढरी टोपी त्यांनी एका हाताने काढली आणि दुसऱ्या हाताने त्यांनी टाळूवरचा घाम निपटला. आणि तोच भिजलेला रुमाल त्यांनी घामाने डबडबलेल्या चेहऱ्यावरून फिरविला.

सार्वजनिक क्षेत्रातलं त्यांचं ते वर्तन कोणालाही आवडण्यासारखं नव्हतं. माझ्या आयुष्यात अनेक नेते मी पाहिलेले होते. परंतु इतका अजागळ आणि मठ्ठ चेहऱ्याचा नेता आज मी प्रथमच पाहात होतो. सार्वजनिक जीवनात वावरण्याची काही पथ्ये असतात. कुठल्याही नेत्याला ती

पाळावीच लागतात. केनेडी, चर्चिल, क्रुश्चेव, नेहरू आणि अजागळ देशाचा चौ–एन–लाय देखील किती चटपटीत, स्वच्छ आणि टापटीपीच्या कपड्यात लोकांपुढे वावरतो हेही आम्ही पाहिलेलं आहे! संघटना काँग्रेसचे अध्यक्ष निजलिंगप्पा यांना देखील नुकतेच मी अहमदाबादला पाहिलेलं आहे. त्यांचे कपडे, चालणं, बोलणं, हंसणं हे सार्वजनिक जीवनाला साजेसं वाटलेलं होतं.

परंतु बाबूंनी मात्र निराशा केली.

त्यांच्या जवळ गाडीत बसलेले महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष वसंतरावदादा पाटील देखील उठून दिसत होते. मिरवणूक निघाली आणि हजारोंच्या जयघोषात बाबूजींची गाडी पार दिसेनाशी झाली.

आम्ही थकून आलो होतो. दिवसभर प्रवास केला होता. तेव्हा लगेच एखाद्या हॉटेलात जाऊन चहा–फराळ करण्याची आम्हाला घाई झालेली होती. परंतु आमच्यापेक्षा तिथल्या खुद्द मुंबईच्या लोकांनाच विलक्षण घाई झालेली दिसत होती. अक्षरशः दहा मिनिटात तेथील गर्दी नाहीशी झाली. सारा रस्ता अक्षरशः सुना सुना वाटू लागला. मी जोशीबुवांना म्हटलं,

'मुंबईचे लोक किती यांत्रिक जीवन जगतात नाही?'

'They cannot afford to indulge!' जोशीबुवा मिस्किलपणे हसत उद्‌गारले. आणि म्हणाले,

'चला, मुंबईतला चहा आणि वडासांबार घेऊ!'

त्या सुन्या सुन्या राजरस्त्यावरून आम्ही चाललो होतो. चौकापर्यंत आलो आणि डाव्या हाताच्या रस्त्याने वळलो. चालता चालता जोशीबुवा मला म्हणाले,

'तुम्ही या रस्त्याने जाणाऱ्या एखाद्या माणसाला विचारा की मघाशी इथं एवढी गर्दी कशाची होती म्हणून?'

'का?'

'काँग्रेसच्या नियोजित अध्यक्षांची मिरवणूक नुकतीच पलिकडून गेली हे या रस्त्याने जाणाऱ्या माणसाच्या गावीही नसेल? कोपरा बदलला की विषय बदलतात.'

मला जोशीबुवांच्या बोलण्याची मौज वाटली. आणि खरोखरच मी रस्त्यातल्या एका माणसाला थांबवून विचारलं. जोशीबुवांचं निदान अगदी तंतोतंत बरोबर होतं. तो माणूस म्हणाला,

'क्या है कि भाई, मुझे तो कुच्छ मालूम नही!'

मुंबई शहरातील जीवनाला किती असंख्य कप्पे असतील! पुण्यात अशी मिरवणूक निघाली असती तर सर्व पुण्याचा तो विषय झाला असता. गोरक्षणासाठी केलेल्या सार्वजनिक उपोषणाचा सोहळा असो, किंवा शिवाजीराव भोसल्यांची व्याख्याने असोत; इतकेच नव्हे तर राजकपूरची गाडी पुण्यातून इकडून तिकडे गेलेली असो. ती बातमी पुण्याची झालेली असते. तसे मुंबई शहराचे नाही.

संध्याकाळचे पाच वाजून गेले होते. आम्हाला गिरगावात जायचे होते. बस, टॅक्सी मिळणे शक्य नव्हते. आम्ही चालत दादर स्टेशनवर गेलो. आणि लोकल पकडली. चर्नीरोडला उतरलो. गिरणीच्या तोंडातून भकाभका पीठ गळत राहावे तसे लोकलच्या दारावाटे माणसे गळत होती. फलाट माणसांनी खच्चून भरले होते. आम्ही खाली उतरलो आणि पाऊल टाकायला जागा नाही एवढ्या गर्दीच्या गराड्यात सापडलो. सारी माणसे उजवीकडच्या रस्त्याने बाहेर सडकेवर जाण्याऐवजी दादर चढून वर जात होती. मुंगीच्या पावलांनी गर्दी पुढे सरकत होती. बाहेरच्या रस्त्यावरची माणसेही आत स्टेशनमध्ये येत होती आणि दादऱ्याकडे धावत होती. मला आश्चर्य वाटलं. गर्दीत मला चेंगणाऱ्या माझ्या चहूबाजच्या माणसांपैकी एकाला मी विचारलं,

'माणसं बाहेर जाण्याऐवजी आत येऊन जिन्यावर का धावत आहेत?'

'कारण जिन्यावरच्या पुलावरून रस्ता क्रॉस करणं सोपं आहे म्हणून!'

मी उजव्या हाताच्या लोखंडी पुलाकडे पाहिले. त्या रस्त्यावर तरंगणाऱ्या पुलावरून माणसं पलिकडे जात होती. आम्ही कसे तरी एकचतुर्थांश दादरा चढून जाऊ शकलो. पुढे गर्दी जाम झाली. वरून खाली उतरणारे आणि खालून वर जाणारे उतारू. त्यांचा जाम दट्ट्या बसला. मी जिन्याच्या उजव्या कडेला कठड्याला धरून उभा होतो. खालचा रस्ता मोटारींनी गच्च भरला होता. आतून लोकल्स सामान्य माणसांचे लोंढे घेऊन धडाधडा धावत होत्या. दादऱ्यावर माणसांच्या गर्दीचा दट्ट्या बसला होता. माणसांना चालण्यासाठी रस्ताच नव्हता. सडकेवरून अक्षरशः हजारो मोटारी धावत होत्या. डाव्या आणि उजव्या बाजूंनी. उलट आणि सुलट दिशांनी. हजार मोटारींतून फार तर दोनतीन हजार मालक माणसं जाऊ शकत होती. परंतु पायी चालणाऱ्या पाचपाच हजारांची गर्दी रस्त्याअभावी मध्येच अडकून पडत होती.

तेवढ्यात वरून एक मुसंडी आली. आणि एक तरूण बाई अक्षरशः जिन्यावरून निसटली आणि गडगडली. शेकडो माणसांच्या पायाखाली आली. एकच मिनिट. जवळच्या एका पठाणाने तिला आडवी होत असतानाच सावरली आणि खसकन ओढून कठड्याच्या कडेला आणली. एकच—सेकंद. पण तिचं पातळ अस्ताव्यस्त झालं. पोलक्याची बटणं तुटली. केस विस्कटले. शरीराला असंख्य माणसं अक्षरशः डसली. ती जिन्यावर आडवी झाली असतो तर मिनिटातच गर्दीच्या रानटी पायांनी तिचं भरीत केलं असतं! पठाणाने तिला वाचविली. जिवावरच बेतलं होतं ते थोडक्यात हुकलं. बाई वाचली आणि धपापत्या उराने कठड्यांना धरून उभी राहिली.

गर्दी माणसांची होती पण तिचं रूप एखाद्या रणगाड्याचं होतं. सभ्यता,

[पृष्ठ ५२ वर]




# हे कसले तज्ञ? हे तर देशद्रोहीच!

"अमेरिकेकडून ५१ साली अन्नधान्य आयात करण्याचा प्रसंग असो, पाकिस्तानला अमेरिकेकडून शस्त्रास्त्रांची मदत मिळण्याची ५३ मधील घटना असो, ६२ मधील चीनचे आक्रमण असो वा ६५ मधील रशिया–अमेरिका यांच्या संयुक्त दडपणामुळे अर्धवट सोडावे लागलेले भारत–पाक युद्ध असो, अपमानाच्या जाणीवेने काही काळ कासावीस व्हायचे. फार तर थोडी आरडाओरड करायची. एकदा स्वावलंबनाचा जप आणि जाग येऊनही पुन्हा झोप असा आपल्या गेल्या वीस वर्षांतला नित्यक्रम आहे.

"खरोखर आपल्याला स्वावलंबन हवे का ?"

हा उतारा १७–८–१९६८ च्या 'माणूस' मधील श्री. ग. मा. यांचा आहे. त्याच अंकात पान १०५ वर 'नियोजन मंडळा'चे उद्योग विभागाचे सदस्य श्री. आर. व्यंकटरामन सांगतात–

"पी. एल्. ४८० चे धान्य आले त्यासाठी आपल्याला काहीही किंमत द्यावी लागत नव्हती. त्या धान्याच्या देशातील (आपल्या) विक्रीतून येणारा पैसा परत आपल्याच विकास योजनांसाठी खर्च करता येत होता. याच गळाला आपल्या

र. गो. करमरकर
बॉम्बे एक्सप्रेस
डेअरी फार्म
दिंडोशी

७ मार्च १९७०

नियोजनकारांचा मासा कायमचा लागला. पी. एल. ४८० धान्याचे हजारो कोटी रुपये आपल्या देशात साचले आहेत. त्या पैशासाठी आपण काहीही केले नाही. त्यामुळे तो पैसा आपली अर्थव्यवस्था कुरतडतो आहे. पोखरतो आहे. व्यवहारात याचा अर्थ इतक्या हजार कोटींच्या नोटा आपण नाशिकच्या छापखान्यात छापून घेतल्या असा होतो. याचाच परिणामी अर्थ असा की, तितक्या रुपयांची चलन फुगवट झाली आहे. हेच आमच्या कर्जबाजारी होण्याचे प्रमुख कारण आहे. म्हणून नियोजन मंडळाचे म्हणणे आहे की १९७० अखेर पी. एल. ४८० च्या धान्य आयातीला संपूर्ण फाटा द्यावा."

गेल्या २०–२२ वर्षांच्या अनुभवातून आपण शहाणे व्हायचेच नाही असे ठरविलेले दिसते; किंवा कोणतीही ठरविलेली गोष्ट निकराने अमलात आणावयाचीच नाही असे ठरलेले असते. नाहीतर...

'नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड' म्हणून केंद्र सरकारने एक ८–१० अधिकाऱ्यांचे मंडळ नेमले आहे. त्याचे अध्यक्ष आहेत, आनंद डेअरीचे जनरल मॅनेजर डॉ. व्ही. कुरियन. ते मोठे उत्साही गृहस्थ आहेत. दूध प्रक्रियेला जरूर असणारी यंत्रसामग्री उभी करण्याच्या कामात ते वाकबगार आहेत, अशी त्यांची ख्याती आहे. आनंद डेअरी उभी करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. पण दूध उत्पादनाबद्दल त्यांना फारसे काही समजत नाही असे ते स्वतःच कबूल करतात. आनंदच्या डेअरीकरिता यंत्रसामग्रीची बरीच आयात करावी लागते. दुधाची पावडरही त्यांना लागते. अशा कामात त्यांचे मध्य सरकारमधील वरच्या अधिकाऱ्यांशी घनिष्ट संबंध वृद्धिंगत झाले तर आश्चर्य नाही. ज्या डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाचे ते अध्यक्ष म्हणून त्यांची मध्य सरकारने निवड केली आहे, त्या बोर्डाचा दूध उत्पादनाशी मुळीच संबंध नाही. जो काही आहे तो वाटपाशी व दूध प्रक्रियेला लागणाऱ्या यंत्रसामग्रीशी व ज्ञानाशी. बोर्डाच्या उद्देशावरून हे स्पष्ट होते.

श्री. कुरियन साहेबांची एवढी तपशिलात प्रस्तावना करण्याचे कारण असे की, ह्या साहेबांनी 'ऑपरेशन फ्लड' म्हणून एका अवलक्षणी दूध योजनेला जन्म दिला आणि केंद्र सरकारने तिला दत्तक घेतले. हे बाळ आपल्या वंशाच्या मुळावरच आले आहे. काय योजना आहे ही ?

गेल्या २–३ वर्षांत 'युरोपियन इकानॉमिक कम्युनिटी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राष्ट्रांकडे दूध व तज्जन्य पदार्थांचे बेसुमार उत्पादन वाढले. कारण असे समजते की, युरोपीय राष्ट्रांच्या व्यापाराच्या नव्या धोरणामुळे दुधाचा जो भाव नक्की करण्यात आला तो उत्पादकांना फायद्याचा होता. त्यांनी उत्पादनाला चालना दिली. गरजेपेक्षा जास्त उत्पादन झाले. लोण्याचे साठे पडून राहू लागले. लोणी साठविण्यास त्यांना जागा पुरेनाशी झाली. ह्या साठ्याचे काय करायचे ही एक मोठी समस्या ह्या देशांसमोर उभी राहिली त्याचे फार मार्मिक वर्णन 'टाईम्स ऑफ इंडिया'ने आपल्या १०–१०–६९ च्या अग्रलेखात केले आहे ते येथे देण्याचा मोह टाळता येत नाही.

## "Butter Not Guns"

"Man does not live on butter alone. But there exists the distinct possibility of a half dozen seemingly stable European Governments falling as a result of an excess of it. The idea of a Government tumbling down the slippery slopes of a butter mountain is fit to make a hungry chuckle, but the threat is real."

ह्यात वर्णन केल्याप्रमाणे ह्या लोण्याच्या पर्वताच्या निसरड्या उताराकडे पाहून आपल्या बुभुक्षित मंडळींच्या तोंडाला पाणी सुटले आणि त्यांनी केंद्र सरकारकडून 'देणगी' मिळविण्याची परवानगी मिळविली. अन्न खात्याने डॉ. कुरियन यांना 'वर्ल्ड फूड प्रोग्रॅम'कडे याचना करण्यासाठी रोमला पाठविले आणि हे बहाद्दर आपला दौरा यशस्वी करून आले. त्याचा फलितार्थ असा–

१,२६,००० टन दुधाची भुकटी. एक टनास रु. १७००/– प्रमाणे २१·४२ कोटी रुपये किमतीची व एका टनास रु. ३२३४/– प्रमाणे रु. १३·६८ कोटी रुपयांच्या किंमतीचे ४२,००० टन बटर ऑईल किंवा तूप मिळून एकूण ३५·१० कोटी रुपयांची भेट किंवा देणगी म्हणून युरोपीय राष्ट्रांनो भारताला 'वर्ल्ड फूड प्रोग्रॅम'मार्फत द्यायचे कबूल केले. हा पुरवठा पुढील पाच वर्षांत करावयाचा आहे.

ही पावडर व लोणी यांचे मिश्रण तयार करून येथे 'दूध' तयार करावयाचे; ह्याकरिता जरूर ती यंत्रसामग्री आयात करायची व बसवायची. मुंबई, मद्रास, दिल्ली, कलकत्ता ह्या चार मोठ्या शहरांत हे दूध विकायचे. सध्या ज्या भावात 'दूध योजना' दूध खरेदी करतात त्याच भावाने योजनांनी ही पावडर व तूप खरेदी करायचे. वेगवेगळ्या चरबीच्या प्रमाणांचे दूध तयार करून, दुधातील घृतांश कमी करून वेगवेगळ्या दराने गरिबांपासून श्रीमंतांपर्यंत सर्वांना दूध उपलब्ध करायचे. हल्ली जो खऱ्या दुधाचा भाव १·७० लिटरला आहे, त्याच भावाने त्या दर्जाच्या घृतांशाच्या दुधाचा भाव राहील असे समजते. ह्या व्यापारातून सुमारे ६५ कोटी रुपये नफा होईल, असा अदाज आहे. तो नफा व मूळचे ३५ कोटी मिळून १०० कोटी रुपये इतका दूध धंद्याच्या विकासाकरिता एक फंड तयार करायचा.

अशी थोडक्यात ही योजना आहे. हे जे १०० कोटी रुपये नफ्याचे मिळणार आहेत हे फार मोठे आकर्षण योजनाकारांना आहे.

ह्या योजनेचे उद्देश कोणते ? तर असे सांगण्यात आले आहे की—

१. शहरांतील गोठेवाले दुधात फार पाणी घालतात आणि दूध विकतात त्यामुळे ग्रामीण दूध योजनांना त्यांच्याशी स्पर्धा करता येत नाही.

२. सरकारी दूध योजना एकूण गरजेपैकी ३०–४० टक्केच पुरवठा करीत असल्यामुळे त्यांना दुधाच्या भावांबाबत स्थैर्य निर्माण करता येत नाही.

३. शहरांतील गोठेवाले आतला जनावरे खरेदी करतात आणि शहरांत



गोठेवाले आणि कसाई

आणतात. येथे वासरे पोसायला परवडत नाही म्हणून ती ते मारतात आणि म्हशी पाडशा झाल्या की कसायांना विकतात. त्यामुळे देशातील चांगल्या पैदाशीच्या जनावरांना देश मुकतो.

म्हणून पावडरीच्या दुधाचा ह्या शहरातून महापूर निर्माण करायचा. दूध गोठे-वाल्यांना ह्या दुधाशी स्पर्धा करणे परवडेनासे होईल आणि ते आपल्या म्हशी बाहेर-गावी नेतील. त्यांना पुनर्वसनासाठी एका म्हशीमागे २,००० रुपयांप्रमाणे कर्ज देण्यासाठी २० कोटी रुपये ह्या नफ्यापैकी द्यायचे आहेत. ही जनावरे ग्रामीण विभागात गेली, की गोठेवाले वासरे पोसू लागतील आणि पाडशा म्हशीही पोस-तील, असा अंदाज करण्यात आला आहे.

एकदा सर्व गोठेवाले बाहेरगावी गेले की ३ वर्षांनंतर वासरांची वाढ होईल. त्याचे बरेच दूध उत्पादन मिळेल. ग्रामीण दूध योजना विकसित होईल. कारण कित्येक कोटी रुपयांची यंत्रसामग्री बसविण्यात येईल. गुरांच्या खाद्य मिश्रणाचे कारखाने उभारण्यात येतील आणि ५ वर्षांत दुधाचे पाट खेड्यांतून शहरांकडे वाहू लागतील. असा बराच कल्पनाविलास ह्या योजनेत आहे.

ह्या योजनेचा मूलाधार म्हणून जो धरण्यात आला आहे तो साफ चुकीचा आहे. एवढी दूरगामी परिणाम घडविणारी योजना एवढ्या कच्च्या पायावर कशी उभी करण्यात येते ह्याचे आश्चर्य वाटते आणि म्हणून ही योजना सद्हेतूने प्रेरित होऊन केलेली नसावी अशी शंका येऊ लागते किंवा प्रश्नाच्या सम्यक ज्ञानाच्या अभावातून तरी निर्माण झाली असावी असे वाटते.

मुंबई शहरापुरते बोलायचे तर आरे कॉलनीत सुमारे १५,००० म्हशी आहेत आणि बाहेर सुमारे ६०,००० म्हशी आहेत. सध्या म्हशीच्या किमती २,००० ते ३,००० रुपये आहेत. ह्या म्हशी पाडशा झाल्या की, गुजराथ किंवा महाराष्ट्रात इतरत्र पोसणीसाठी पाठवितात. ६८–६९ साली मुंबईमधून ५६,००० म्हशी बाहेर-

मावी पोसणीसाठी गेल्याची लायसेन्सिंग खात्यात नोंद आहे. कारण त्या खात्या-कडून परवाना घेतल्याशिवाय म्हशी बाहेर पाठविता येत नाहीत. त्यामुळे उत्तम जनावरे परवडत नाहीत, म्हणून कसायांना विकून कापली जातात हे विधान निराधार आहे. उलट कसाई म्हशीची किंमत २०० ते ४०० रुपये देतो. त्यापेक्षा ६–७ महिन्यांकरता ४०० ते ५०० रुपये खर्च करून भाकड म्हशी पोसणे परवडते. म्हणून पाडशा (भाकड्या) म्हशी पोसल्या जातात.

मुंबईमध्ये वासरे मरतात व पोसली जात नाहीत हे खरे आहे; परंतु म्हशी ग्रामीण विभागात नेल्याबरोबर वासरे पोसणे कसे परवडू लागेल हे समजत नाही. आरे कॉलनीत किंवा दापचरी येथे सरकारी योजनेमार्फत जी वासरे पोसली जातात त्यांचा १,५०० ते २,००० रुपये खर्च येतोच. पोसणीचा खर्च हा अन्नधान्य व वैरणीच्या किमतींशी निगडीत आहे. जोपर्यंत धान्याच्या किमतीमध्ये किंवा वैरणीच्या किमतीमध्ये स्थैर्य निर्माण होत नाही तोवर वासरे ग्रामीण विभागात गेली म्हणून परवडू लागतील हे संभवत नाही. तेव्हा शहरातून गोठेवाल्याला धंदा करणे परवडत नाहीसे झाल्यामुळे हुसकावून लावण्याचे पुण्य योजनेला पदरी पाडता येईल. परंतु त्यामुळे दूध उत्पादन वाढणार नाही. उलट हे धंदे बंद झाल्यामुळे हे दूध उत्पादन कमी होण्याचीच धास्ती आहे.

हे गोठेवाले ग्रामीण विभागात वसाहत करून योजनेला दूध देऊ लागतील. हे गृहीत कृत्यही वास्तविक परिस्थितीच्या अज्ञानातून निघाले आहे. कारण आरे कॉल-नीच्या रूपाने अशा योजनेचा प्रयोग सध्या सुरू आहे आणि तो अत्यंत असमाधानकारक आहे. हे सर्वश्रुतच आहे. ह्या बाबतीत सर्वांचेच असमाधान आहे, दूध उत्पादन वाढत नाही, पशुसंवर्धनाच्या दृष्टीने सुधारणा होत नाहीत, म्हणून दूध स्वस्त होत नाही म्हणून जनता नाराज आहे. तर आरे कॉलनीतील गवळ्यांना दुधाचा भाव त्यांच्या उत्पादन खर्चाच्या मानाने परवडणारा मिळत नाही, म्हणून ते गवळी हैराण आहेत. आरे कॉलनीतील बहुसंख्य गवळी कर्जात बुडालेले आहेत. कोणत्या क्षणी त्यांच्या धंद्याचे काय होईल ह्याबद्दल शाश्वती नाही. आम्हांला त्यांची तरफदारी करण्याची गरज नाही. परंतु हा जो सरकारबाबतचा अनुभव आहे, तो जमेस धरल्यास मुंबईतील गवळी पुनर्वसन करून सरकारी दूध योजनांना दूध देण्याचे धाडस करतील असे वाटत नाही.

शहरातील गवळी दुधात पाणी घालतात म्हणून सरकारी दूध योजना त्यांच्या-जवळ स्पर्धा करू शकत नाही हे खरे नाही. उलट दूध योजना स्टॅन्डर्डाइझ दुधाचा पुरवठा करू शकतात आणि ह्या चांगल्या दर्जाच्या दूध पुरवठ्यामुळे दुधाच्या किमती स्थिर करण्यात दूध योजना चांगल्याच यशस्वी झालेल्या आहेत. तेव्हा ह्या संबंधीचा दावाही फोल आहे. ज्या हेतूसाठी म्हणून ही योजना आखण्यात आली तेच बिनबुडाचे असल्यामुळे ही योजना महाराष्ट्र सरकारने का राबवावी हे समजू शकत नाही.

सध्या आपली दूध योजना ग्रामीण विभागातून बरेच दूध गोळा करून शहरां-तून विकत असते. ग्रामीण दूध योजनांबद्दल ग्रामीण विभागात बरेच औत्सुक्य निर्माण झाले आहे. हमखास गिऱ्हाईक मिळाल्यामुळे ग्रामीण विभागात तो एक चांगला जोडधंदा झालेला आहे. उपजीविकेचे अन्य साधन नसलेल्या बऱ्याच मंडळींना एक नवे दालन उपलब्ध होत आहे.


महाराष्ट्र सरकारची दूध योजना निश्चितपणे प्रगतिपथावर आहे. हे पुढील पानावर कोष्टक दिले आहे त्यावरून लक्षात येईल.

जानेवारी १९६३ मध्यें ग्रामीण विभागातून ३३,६९५ लिटर, जानेवारी १९६४ मध्ये ४९,५५१ लिटर तर १९६९ जानेवारीमध्ये ३,०४,२४० लिटर ह्या दूध योजनांमार्फत मिळत आहे असे दिसून येईल. ३३ हजारांवरून ६ वर्षांत ३ लाख लिटर दूध ही चांगलीच मजल दमादमाने दूध योजनेने मारलेली आहे. दूध गोळा करण्याची कितीतरी नवी केंद्रे सुरू झाली आहेत. अकोला, अमरावती, नागपूर-सारखी केंद्रे हळूहळू जास्त पुरवठा करीत आहेत, तर धुळे' कोल्हापूर, मिरज-सारखी केंद्रे दूध उत्पादनाची फार मोठ्या प्रमाणावर उपलब्धता असल्याबद्दल पुरावा देत आहेत. पुण्याची प्रगती १० हजार लिटरवरून १ लाख लिटरपेक्षा जास्त झाली आहे. ह्याविषयी संबंधित अधिकाऱ्यांजवळ चर्चा केली असता ह्या वाढीचे प्रमुख कारण आताची सुधारून वाढवून दिलेली भाव पद्धती असे समजले; तर ह्यासंबंधी जेव्हा प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या जबाबदार व जाणकार व्यक्तींजवळ चर्चा केली व त्यांच्या दूध योजनेसंबंधी बोललो. तेव्हा त्यांच्याकडून फारच मार्मिक माहिती मिळाली.

मिरजेला श्री. देवल म्हणून एक सामाजिक दृष्टिकोण असलेले गृहस्थ आहेत. त्यांना मुद्दाम भेटलो. त्यांच्याजवळ दूध योजनेसंबंधीची चर्चा केली. ते म्हैसाळ येथे हरीजनांची संयुक्त सहकारी शेती संस्था चालवितात. त्यांची दूध संस्था चांगली नावारूपाला आली आहे. दूध सोसायटीच्या नफ्यातून त्यांनी समाजाला आवश्यक असे कार्य चालविले आहे. हरिजन व भूमिहीनांना त्यांनी ह्या दुधाचा धंदा दिला आहे. ज्यांना जमीन नाही, म्हणून पत नाही, म्हणून व्यवसाय नाही, हे दुष्टचक्र त्यांनी भेदून अशा लोकांना ६ म्हशींना कर्ज व गोठे बांधून दिले आहेत. त्या सभासदांना भेटलो. त्यांच्याजवळ बोललो. एका नव्या उभारीने ते भारावलेले आहेत. कर्ज हळहळू फिटत आहे. नवी जिंदगी प्राप्त झालेल्या, नवे धुमारे आलेल्या, इतके दिवस घटलेल्या म्हणून समाजाने उपेक्षिलेल्या नव्या वृक्षाचे दर्शन मला घडले. देवल सांगत होते,

' बाकी सर्व ठीक आहे; पण अजून दुधाची मिळणारी किंमत ही शास्त्रोक्त पद्धतीने नक्की करून ठरविली जात नाही. त्यामुळे घसाऱ्याची रक्कम बाहेर निघत नाही. कर्ज आहे म्हणून चालते आहे. दूध जमविण्याच्या क्षेत्रात वाढ होते

| | नाव | जानेवारी १९६३ | जानेवारी १९६४ | जानेवारी १९६९ | |
|---|---|---|---|---|---|
| १. | अकोला | ५०६ | ७९० | ५,६६० | लिटर |
| २. | अमरावती | ७२६ | ९५४ | ७,४३० | ,, |
| ३. | औरंगाबाद | — | १८६ | २,९७० | ,, |
| ४. | वसई | — | ३,५२५ | — | ,, |
| ५. | चाळीसगाव | — | १,५८७ | — | ,, |
| ६. | धुळे | २,६०० | ५,४८८ | ७४,४०० | ,, |
| ७. | कोल्हापूर | ६,७१३ | २,४०३ | २२,५०० | ,, |
| ८. | कोल्हापूर, पायलट | ८३२ | — | — | ,, |
| ९. | कुलाबा | १,९७८ | २,६०७ | — | ,, |
| १०. | नागपूर | १,२५० | १,९८६ | १३,६६० | ,, |
| ११. | नागपूर (गाय) | २१३ | १,०३१ | — | ,, |
| १२. | नाशिक | १,९४९ | २,५१२ | ७,९९० | ,, |
| १३. | नाशिक (गाय) | २३३ | ७७० | — | ,, |
| १४. | पुणे | १०,४६२ | १३,०९९ | १०,६२०० | ,, |
| १५. | पुणे (फेडरेशन) | ५,६७० | ५,७७० | — | ,, |
| १६. | पालघर | — | २७१ | — | ,, |
| १७. | सफाळा | २९२ | ८३० | — | ,, |
| १८. | शहापूर | — | — | — | ,, |
| १९. | वसई वाडा | — | — | — | ,, |
| २०. | उपनगर तबेले | — | ६,०८३ | — | ,, |
| २१. | सोलापूर | २४१ | ४२७ | १३,५२० | ,, |
| २२. | वांगणी | — | २३२ | — | ,, |
| २३. | मिरज | — | — | ३८,४६० | ,, |
| २४. | खालापूर | — | — | ५५० | ,, |
| २५. | महाबळेश्वर | — | — | २,९६० | ,, |
| २६. | चिपळूण | — | — | १,४५० | ,, |
| २७. | महाड | — | — | १,००० | ,, |
| २८. | रत्नागिरी | — | — | १,५५० | ,, |
| २९. | कणकवली | — | — | १,४०० | ,, |
| ३०. | आरवी (वर्धा) | — | — | २,१७० | ,, |
| ३१. | कासा | — | — | ३७० | ,, |
| | | ३३,६९५ | ४९,५५१ | ३०,४,२४० | ,, |


पत्रें लवकर पेटींत टाका
कामाच्या शेवटच्या तासांत,
संध्याकाळीच जास्ती पत्रे टपाल
पेटयांत टाकली जातात. ही टपाल-कचेऱ्यां-
पुढील एक मोठी समस्या आहे. त्यामुळे
डाकेची गर्दी होते व विलंबही संभवतो.
टपालात पत्रे लवकर टाकल्याने तीं
त्याच दिवशीच्या डाकेने रवाना
होण्याची खात्री असते. तसे केल्याने इष्ट
स्थळी ती उशीर न होता पोहचतात.
पत्रे आताच टाका, संध्याकाळपर्यंत कशाला थांबता ?
भारतीय टपाल व तार खाते



# सोहळा / विजय तेंडुलकर

प्रथम काहीसुद्धा नव्हते. मग एक बीज कोठून तरी पडले. त्याचे झाड उगवले. झाडावर एक पक्षी आला. पक्ष्याने एक अंडे घातले. या अंड्याचा वरचा अर्धा झाला आभाळ. खालच्या अर्धाचे पाताळ बनले. आणि या दोन अर्धांमधला मधला भाग म्हणजे हे आपले जग होय.
कुणीतरी सांगितलेली भारताच्या वायव्य सरहद्दीवरच्या रानटी टोळचात प्रचलित असलेली ही एक लोककथा. आज तिचे राहून राहून स्मरण होत होते.

प्रथम काही नव्हते. काहीसुद्धा नव्हते. किंवा असेलही; पण नाममात्र. मग एक बीज पडले. एका विलक्षण आणि वादळी आयुष्याचे बीज. याचे बघता बघता झाड उगवले. घनदाट. पहाटे रम्य. दोनप्रहरी तापसी. उतरत्या उन्हात हुरहुरते. चांदण्या रात्री एक विश्रब्ध स्वप्न. अवसेला झपाटलेले. वाऱ्या-पावसाने हे झोडपून काढले. उन्हाच्या आगीने भाजून काढले. शिशिराच्या कडाक्याने रगडून काढले. हे झाड निष्पर्ण झाले. मोहरले, फळाफुलाला येता येता याला आभाळातल्या कडाडत्या तडितेने झडपले, हे वठले, फुलले, उन्मळता उन्मळता टिकले आणि मरता मरता जगले. कसे जगले ते आभाळालाच ठाऊक. का जगले तेही, आभाळातल्यालाच, असले तर माहीत.
मग एक पक्षी आला. कोठूनतरी आला. या झाडावर

बसला. पक्षाच्या पहिल्या मुक्त स्वराने मुके झाड अंग अंग शहारले, सळसळून उठले, त्याच्या सर्वांगातून स्वरच स्वर उमटू लागले. झाड बोलू लागले. झाडाला प्रथमच उमजले की आपल्याला एक भूतकाळ आहे आणि त्या वेदनामय भूतकाळानेच आपल्याला आता एक पक्षी दिला आहे, एक स्वर दिला आहे, एक वाचा दिली आहे. कृतज्ञतेने भारावून पानापानात हेलावून ते भाग्यवान झाड, ते दुर्दैवी झाड, ते वेगळे झाड बोलू लागले. त्याची झाली एक आत्मकथा...

दादरच्या बालमोहन शाळेसमोरच्या निवांत रस्त्याने चालताना मागून एकदम एक मोटार हॉर्न वाजवून भर वेगाने पुढे गेली. तंद्री भगली. दिल्या पत्त्यातले घर शोधण्यासाठी नजर वळली.

प्रथम काहीसुद्धा नव्हते. .काहीदेखील...होते फक्त एक मुके झाड...एक मुके सोशिक झाड...चांदण्या रात्री विश्रब्ध स्वप्न आणि अवसेला झपाटले जाणारे...

पत्ता मिळण्याला वेळ लागला नाही. जिने चढलो. खोलीत शिरलो. समोर ते मुके, सोशिक...
नमस्कार. समोर पलंगावर बसलेल्या हंसाबाईंनी हात जोडीत सस्मित म्हटले. एक कृश आकृती बालिश चेहरा. त्यावर वयाच्या, आजाराच्या ओढल्या, जून खुणा. एक बीळ. एक खळी. एक वेदना. कारुण्य. निरागसता. आरपार



जाण. काही पडद्यावर पाहिलेले, काही अपेक्षित नवे, काही पूर्णतया अनपेक्षित, असे मिळून एक आटोपशीर व्यक्तिमत्व. बाजूला, लौकरच सुरू होणाऱ्या अनौपचारिक सोहळ्याचा औपचारिक तपशील बोलत बसलेली माणसे. वरच्या ह्ॉलकडे आणि ह्ॉलकडून जिन्याने खाली चाललेली कोणाकोणाची लगबग. खोलीत येती जाती घरगुती माणसे. बाहेर रस्त्यावरची तुरळक वर्दळ. सगळ्या धावत्या गजबजल्या आयुष्यात एका पलंगावर श्रांत आणि मूक बसलेला हा एक बालिश, वयस्क चेहरा. रुग्णावस्थेतही हास्यासरशी उमलू पहाणारा, टवटवणारा.

कोठे कोठे पाहिला होता बरे ? कोणकोणते चित्रपट ? नीट कळतही नव्हते तेव्हा ‘ विजयाची लग्ने ’ नावाच्या चित्रपटात...‘ संत सखू ’ चित्रपटात, ‘ रामजोशी ’ आणि ‘ पुढचे पाऊल ’ चित्रपटात...‘ रामशास्त्री ’मध्ये देखील हा दिसला होता...‘ सांगत्ये ऐका ’च्या पोस्टरवर... अवखळ, स्त्रीत्वाने मुसमुसलेला, विलासी, नटवा... पडद्यावरून प्रेक्षागृहातल्या प्रत्येक पुरुष हृदयाचे अगदी चोरकप्पे सताड खोलून आत रिघाव घेणारा...आणि एक विशुद्ध देह, अंगप्रत्यंगातून पौरुषाला साद घालणारा... चैतन्याने लवथवणारा... मरडणारा, लवणारा, उसळणारा.

तेव्हा कधी वाटलेही नव्हते की याला पडद्याबाहेर एक अस्तित्व आहे, आयुष्य आहे, व्यक्तिमत्व आहे, नशीब आहे, सुखदु:खे आहेत...,वृद्धत्व आहे...आजार आहेत...आशा. निराशा आहेत...

हाच तो चेहरा. हाच का तो देह ? ओळखीचा आणि अनोखा. पडद्यावरचा आणि तरी जगल्याचे सारे घाव सुस्पष्ट वागविणारा.

हंसाबाई बोलत होत्या. समारंभात मी बोलणार नाही, मी मुळीच बोलणार नाही...मला बोलता येत नाही...


एक मुके झाड...मग एक पक्षी आला...

वर सभागारात तुरळक माणसे जमू लागली होती. दूरध्वनीक्षेपक टेस्ट होत होता. स्वच्छ गाद्यागिरद्या माणसांच्या अपेक्षेत पसरलेल्या होत्या. अत्तर गुलाब तयार होते.

पाहता पाहता गर्दी जमली. छोटा हॉल वेचीव माणसांनी भरला. मधोमध एक तात्पुरते व्यासपीठ; रिते.

गजबज दबली. गर्दीने बसल्या बसल्या माना वळवल्या. वाट दिली.

आला—तीळ. अस्पष्ट खळी. हसूच पाहणारे कोमजले ओठ. आयष्याच्या घावांचे. एक चेहरा झालेले वण. बालिश.



क्षीण तरीही उभारी आणि डौल टिकवण्याची शिकस्त करीत.

हंसाबाई तात्पुरत्या व्यासपीठावर लोडाला टेकून निश्चल बसल्या. मग डोळ्यांनी सर्वांना भेटल्या. हसूचे संभाषण करू लागल्या.

सोहळा सुरू झाला. प्रकाशकाचे प्रास्ताविक. हंसाबाईंच्या आत्मकथेचा त्रोटक इतिहास...आत्मकथेचे कसे सुचले...

एक पंक्षी...कोठून तरी आला आणि मुक्या, ओठंगल्या आशयाच्या झाडावर...पक्षाच्या पहिल्या मुक्त स्वराने मुके झाड शहारले, त्याच्या सर्वांगातून स्वरच स्वर उमटू लागले. झाड बोलू लागले. त्याची झाली...

हंसाबाई तटस्थपणे प्रकाशकाचे हृद्गत ऐकत होत्या. आत्मकथा...प्रकाशक अनेक प्रथितयश साहित्यिक टीकाकारांचे हवाले देत होता. त्यांनी स्तुती केली, म्हणून उमेद आली. अमूकांचे सहाय्य झाले,...यांनी लेखन केले, त्यांनी लेखनात सहाय्य केले...त्यांनी सजावटीची जबाबदारी पत्करली...

मुके झाड बोलके झाले, मुके झाड बोलके झाले...


प्रकाशकाने आत्मकथेची पाहिली मुद्रित प्रत हाती घेतली.

आदरभावाने त्याने ती प्रत हंसाबाईंच्या हाती ठेवली. आयुष्याचे कथन हे असे आयुष्याला भेटले. टाळ्यांचा सौम्य कडकडाट झाला. हंसाबाई भारावल्या. फार फार भारावल्या.

घनदाट झाड. पहाटे रम्य. दोनप्रहरी तापसी. सायंसमयी हुरहुरते. चांदण्या रात्री विश्रब्ध स्वप्न आणि अवसेला अंग अंग झपाटून उठणारे. वाऱ्या पावसाने झोडपून काढलेले, उन्हाच्या आगीने भाजून काढलेले, शिशिराच्या कडाक्याने रगडून अनेकदा निष्पर्ण केलेले, पुन्हा मोहरलेले, वठलेले, उन्मळता उन्मळता टिकलेले आणि जगलेले वाढलेले...

आता एकजण उठला. एक व्यावसायिक लेखक. आणि हंसा वाडकर नामक जगण्याला, या जगण्यातून व्यक्त झालेल्या ताकदीला, आत्मकथेतून बोलणाऱ्या कमालीच्या स्फटिकवत निर्मळ, नितळ मनाला मनापासून धन्यवाद देऊ लागला. अशी पुस्तके आयुष्यात सोबत करतात आणि जेव्हा आयुष्यात एकटे वाटते, गोंधळायला होते, अर्थ आणि हेतू हरवू पहातात तेव्हा ही पुस्तके फार धीर देतात असे सांगू लागला.

जवळच ते ' जगणे ' डोळे मिटून विश्रब्धपणे हे वाङ्मयीन



चालविलेला कशाचा तरी गौरव. आयुष्याचा वेध घेऊ पहात दूर जाऊन पडणारे शब्दांचे तीर. 'जगण्या'ने स्वतःला हटकले, खरेच हे सारे एवढे महत्त्वाचे होते ? खरेच काहीतरी महत्त्वाचे जगून झाले ? जे झाले त्याला एवढा महत्त्वाचा अर्थ होता का ? की सारे वहाणेच झाले? कशाला धर नव्हती, स्थैर्य नव्हते, विवेक बोथटला होता, संयम तर कधी नव्हताच. आतली वादळे आणि पायांखालचे वाळवंट संपतच नव्हते. वाटे, आयुष्य वाया चालले आहे, वाया गेले आहे. पण आता घडते आहे याचा अर्थ मग काय ? ते सारे व्यर्थ नाहीच तर ठरले ? ... की हे 'साहित्यिक' बोलणे तोंडापुरते आणि केवळ रीतीचेच आहे ? काय खरे ? ...ही माणसे कशामुळे जमली आहेत ? यांना आपल्याकडून काय मिळाले आहे किंवा हवे आहे ? आपण खरेच काय मिळवले, काय घालवले ? आजही तोच प्रश्न, तोच गोंधळ, तीच कोडी...

साहित्यिक खाली बसला. सोहळ्याचा औपचारिक भाग आता संपला होता. वातावरण जरा मोकळे झाले. मंडळी ऐसपैस बसली. हंसाबाईंच्या आत्मकथेचे सुबक पुस्तक हात पालटत फिरू लागले होते. हंसाबाई उत्सवमूर्तीची मध्यवर्ती जागा सोडून बाजूच्या खुर्चीत बसल्या होत्या आणि मधील्या कोणाकोणाशी गप्पा गोष्टी करीत होत्या



सांगत्ये ऐका–
हंसा वाडकर
आत्मकथेचा प्रकाशन सोहळा
मंगळवार : २४ फेब्रुवारी ७०
पुरंदरे हॉस्पिटल, दादर

प्रौढ बालिश मुद्रेवर आता वारंवार शीण दाटून येत होता. उदास हसऱ्या डोळ्यात एकांताची ओढ उमटत होती...

मग नकलाकार गोडे व्यासपीठावर आले. त्यांच्या हातखंडा गायकी नकलांनी बैठक पाहता पाहता खुलली. उत्स्फूर्त हंशांनी हिंदकळू, उसळू, कोसळू लागली. वेळेचे हिशेब घटकाभर पार हरवले आणि केव्हा तरी या धुंदीतून बाहेर यायला झाले तेव्हा फक्त एकच उमजले होते, खुर्ची रिती आहे आणि खुर्चीतले हंसाबाई वाडकर नामक ऋजु व्यक्तिमत्त्व, क्षीण शरीर आणि संपन्न आयुष्य उठून गेले आहे, बहुधा नजीकच कोठे सवयीच्या एकांतात विसावण्यासाठी, बैठकीत आपले संचित–उभ्या आयुष्याची मिळकत–आपले आत्मकथन, आणि एक खुषी ठेवून...एका–कृतज्ञपणे ◻

म्हणून जास्त दूध गोळा होते. सहकारी संस्थांची संख्या वाढते. पण एका शेतकऱ्याच्या म्हशींची संख्या दोनावरून ४-६ वर जात नाही. सर्व खर्च काटेकोरपणे जमेस धरून हा धंदा परवडत नाही. पण पूर्वी काहीच नव्हते त्या मानाने चतकोर अर्धचतकोर भाकरी तर मिळू लागली आहे ना? हळू हळू आणखीही सुधारणा होतील."

तसेच खानदेशात श्री. व्यंकटराव धोबी यांच्या बोराडी गावीही त्यांच्या दूध सहकारी संस्थेतील गवळ्यांजवळ बोलली. भाव बरोबर मिळत नाही त्यामुळे कर्जफेडीची चिंता वाटते अशी त्यांचीही तक्रार आहे. शास्त्रीय दृष्टिकोणाचा अवलंब, पशुसंवर्धनाचा नवा दृष्टिकोण, हिरव्या वैरणीची लागवड, वंश सुधारण्याच्या दृष्टीने प्रयत्न, कार्यक्षम दूध उत्पादन अशा स्वरूपाचे काम जरी बाकी असले तरी आज चाललेले कार्य निश्चितच भरीवपणाने प्रगतीच्या मार्गाने होत आहे. ह्या कार्यात सहकारी संस्था सामील असल्या तरी वाटपाची यंत्रणा सरकारी अधिकाऱ्यांवर अवलंबून आहे. अशा वेळी कृत्रिमरीत्या तयार केलेले दूध सहज रीतीने उपलब्ध झाल्यास त्याचा परिणाम ग्रामीण दूध योजना थंडावण्यात होईल अशी भीती वाटते.



भाव बरोबर मिळत नाहीत

ह्या 'ऑपरेशन फ्लड' योजनेमधून निर्माण होणाऱ्या १०० कोटी रुपयांचा फार मोठा मोह योजनाकारांना पडलेला आहे. नुसते पैसे खर्च केले किंवा उपलब्ध केले, की अपेक्षित कार्य होत नाही. आज ज्या महाराष्ट्रातील ग्रामीण दूध योजना प्रगती करीत आहेत, त्यांचे तरी पैशासाठी काम अडून राहिलेले नाही आणि जे १०० कोटी रुपये ५ वर्षांत उपलब्ध होणार आहेत. त्यांपैकी ४७॥ कोटी रुपये तर दूध प्रक्रियेकरिता जरूर त्या यंत्रसामग्रीवर किंवा वाटप व्यवस्थेवर खर्च होणार आहेत. २० कोटी रुपये शहरांतील जनावरांच्या पुनर्वसनावर खर्च होणार आहेत. ४ कोटी रुपये फक्त दुभत्या जनावरांच्या सुधारण्यासाठी आहेत. २८॥ कोटी रुपये जना-

वरांच्या खाद्य पदार्थांच्या मिश्रण कारखान्यावर, हिरव्या गवताच्या लागवडीवर, कृत्रिम गर्भधारणा केंद्र व औषधोपचार, वासरे पोसणी वगैरेवर खर्च होणार आहेत. जनावरांकरिता ज्या कॅटल फीड फॅक्टरीज व्हायच्या आहेत, त्यांत परदेशांतून बरीचशी अवजड यंत्रसामग्री येणार आहे. हे कारखाने येथे फक्त उपलब्ध असलेले धान्य, पेंडी, मोलॅसिस वगैरेचे मिश्रण तयार करण्यासाठी आहेत. नवीन खाद्य काही निर्माण होणार नाही. हे सर्व पैसे दूध उत्पादनावर खर्च न होता वाटप व्यवस्था व यंत्रसामग्रीवरच बऱ्याच प्रमाणात खर्च होणार आहेत, हे लक्षात येईल.

आतापर्यंतच्या विवेचनावरून ही नवी पावडर – दूध योजना महाराष्ट्रापुरते बोलायचे तर चालू दूध धंद्याची घडी विस्कटून टाकणारी आहे. ग्रामीण दूध योजनेची पीछेहाट करणारी आहे, आपली दूध उत्पादन व्यवस्था कोलमडून टाकणारी आहे, हे स्पष्ट होईल. बरेच दूरगामी परिणाम करणारी योजना आहे. ह्या बाबतीत महाराष्ट्र सरकारने संपूर्ण विचार करून नंतरच काय तो निर्णय घेणे हिताचे ठरेल. ही योजना लोकांच्या माहितीकरता प्रसृत करावी. लोकांचे मत अजमावावे. तज्ज्ञांशी विचारविमर्श करावा. विधानसभेत चर्चेला घ्यावी आणि नंतरच काय तो निर्णय घ्यावा. तोवर कार्यवाही स्थगित करावी.

नाहीतर ह्या योजनेत नवी यंत्रसामग्री येईल. त्याकरिता परदेशी तज्ज्ञ येतील. 'वर्ल्ड फूड प्रोग्रॅम'चे अधिकारी तपासणीसाठी येतील. कारण मध्यवर्ती सरकारच्या शेती खात्याचे चिटणीस श्री. बी. आर. पटेल यांनी रोमला ही भिक्षा किंवा देणगी मागताना जे लाचार्र चे भाषण केले आहे, त्यात असे स्पष्ट आश्वासन दिलेले आहे–

On behalf of the Government of India, I wish to assure this Inter Govermnental Committe that we will abide by the obligations which we have taken on ourselves, for achieving the objectives as outlined in the project request. The plan of operations to be executed will provide for a regular review of these operations to ensure that the W. F. P. s Commodity assistance is properly utilized in order to achieve these objectives.

हा उतारा नोव्हेंबर १९६९ च्या 'इंडियन डेअरी'च्या अंकात पान ३१९ वर आहे. आपल्या तंबूत आपणच उटाला शिरायला मोकळीक देत आहोत. पण ज्यांना आपण तज्ज्ञ म्हणतो त्यांच्या हे सर्व लक्षात कसे येत नाही ह्याबद्दल अचंबा वाटतो. एका जबाबदार व्यक्तीजवळ ह्या संबंधी बोलत होतो. तो म्हणाला, 'हे कसले तज्ज्ञ हे तर देशद्रोही आहेत.' मी विचार करू लागलो, आपण केव्हाच शहाणे होणार नाही का ?

सुरुवातीला दिलेल्या उताऱ्यात वर्णन केलेली परिस्थिती किती खरी आहे ?

आपल्याला स्वावलंबी व्हायचे की नाही ? आयते वापरायला मिळणारे पैसे आपला चलन फुगवटा करतात आणि आपला कर्जबाजारीपणा वाढवतात. आपल्या स्वातंत्र्याचा संकोच सुरू होतो. पी. एल. ४८० खाली अमेरिका आली. 'सहयोग-सहकार्य' ह्या गोंडस नावाखाली रशिया आला. आता 'ऑपरेशन फ्लड'च्या नावाखाली युरोपीय राष्ट्रे येत आहेत. ह्या कांचनमृगाचा मोह जर आपण आवरला नाही तर आश्रमात सीता राहणारच नाही. 'घी देखा है – बडगा नही देखा.' ही योजना वेळीच आपण रोखली नाही तर दूध-पावडरच्या दुधाच्या पुरात आपली भूमी उद्ध्वस्त व उजाड तर होईलच, पण आपली उरलीसुरली इभ्रत पण धुऊन जाईल. हा इशारा योग्य वेळीच आम्ही देऊ इच्छितो.

□ □ □


| | | |
|---|---|---|
| लाल महाल | प्रतापगड | पन्हाळगड |
| राजगड | पुरंदर | आग्रा |

आवृत्ती : तिसरी
किंमत : तीन रुपये

ब. मो. पुरंदरे

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव
पुणे ३०

# करपलेला अंकूर

**इद्रसेन डोंगरे**

माझी आंघोळ आटोपल्या आटोपल्यावर वहिनी मला म्हणाल्या, "सुहास भावजी, तुम्ही जेवायला चला !"

"दादाला येऊ द्या ना वहिनी ! आम्ही दोघं बरोबरच जेवायला बसू !" मी उत्तरलो.

"यांना उशीर होईल यायला कदाचित् ! तुम्ही प्रवासातून आला आहात, जेवण करून घ्या !"

माझा नाइलाज झाला. मी जेवण आटोपून आपल्या खोलीत खाटेवर थोडा आडवा झालो. बत्ती तशीच तेवत होती; तरी मला प्रवासातील थकव्यामुळं कधी डोळा लागला हे कळलंसुद्धा नाही ! पण पुढल्या दारावर थाप ऐकू आल्याबरोबर मी उठून खोलीतून बाहेर निघालो. आपल्या मनगटी घड्याळाकडं एक कटाक्ष टाकला, तो साडेअकरा वाजून गेले होते !

वहिनींनी पुढं जाऊन दार उघडलं, तसा अस्थिर पावलं टाकीत दादा घरात शिरला ! कदाचित् मला तशाही परिस्थितीत ओळखून तो स्वतःला सावरून क्षण-भर एका जागी कसाबसा उभा राहिला. माझ्याकडं पाहत म्हणाला, "कोण ?—सुहास ?" आणि पुढं येत मला मिठी मारीत तो पुढं म्हणाला, "माझ्या लाडक्या, तू कधी आलास ?"

त्याचं हे अकल्पित, झिंगलेलं रूप पाहून मला चांगलाच धक्का बसला ! त्याच्या मिठी मारण्यामुळं मी गोंधळलोही; तरीपण त्याच्या आलिंगनानं सुखावलो. तब्बल तीन वर्षांनीच आम्ही भेटत नव्हतो काय ? मला मिठी मारल्यावर तो माझ्या खांद्यावरच डोकं टेकून उभा राहिला ! ते पाहून मी त्याला दोन्ही हातांनी हल-वीत हाका मारू लागलो, "दादा ! दादा !" पण तो माझ्या खांद्यावरच झोपी गेला होता ! वहिनींच्या साहाय्यानं मी त्याला कसाबसा उचलून, त्याच्या बिछान्या-पर्यंत नेऊन तिथं झोपविलं.



मला बसलेला अकल्पित धक्का फार भारी होता. पण स्वतःला सावरून मी वहिनींना विचारलं,

" असं हे कधीपासून चाललंय् वहिनी ?"

त्या आपल्या पदरानं डोळ्यांतील आसवं टिपू लागल्या. " आता चांगलं वर्ष होईल, हे असंच चाललंय् यांचं."

" अन् तुम्ही मला एकदाही पत्रानं कळवलं नाही ?"

वहिनींच्या तोंडून एक हुंदकाच बाहेर पडला. जणू त्याचा भावार्थ होता, ' मला काही विचारू नका हो ! '

जवळजवळ साडेचार वर्षं ' इंडियन आर्मी मेडिकल कोअर'मध्ये डॉक्टर म्हणून केलेल्या नोकरीची शेवटची तीन वर्षं मी ब्रह्मदेशातल्या युद्धआघाडीवर काढली होती. ब्रह्मदेशाला जाण्यापूर्वी मी एकदा एक महिन्याच्या सुट्टीवर घरी आलो होतो.

त्या वेळी दादाचं लग्न जमून आलं होतं. त्याचं लग्न झालेलं पाहून मोठ्या सुखा-समाधानानं मी ' बर्मा फ्रंट'वर निघून गेलो होतो.

माझ्या लहानपणीच आमचे वडील वारल्यामुळं मी दादाला वडिलांच्या जागी मानीत आलो. मी इंटर सायन्सच्या वर्गात असताना आमची आईसुद्धा आम्हांला अनाथ करून देवाघरी गेली. दादा माझ्याहून सहा-सात वर्षांनी थोरला होता. त्यानंच मला आईची माया अन् वडिलांचं प्रेम दिलं. माझं पालन पोषण तर तो केव्हापासूनच करीत आला होता. त्याशिवाय त्यानं माझं एल्. सी. पी. एस्. पर्यंतचं वैद्यकीय शिक्षण पूर्ण होईपर्यंत एखाद्या व्रतस्थाप्रमाणं जीवन कंठलं.

मी जसजसा वयानं अन् ज्ञानानं वाढत होतो, तसतसा मला दादाचा त्याग अधिकाधिक दिसत होता. मी अनेकदा त्याच्या लग्नाबद्दल त्याला आग्रह धरी; परंतु तो तो विषय उडवून लावी. एकदा मी बराच हट्ट धरला. त्याच्या लग्नाविषयी आग्रहच धरला; तेव्हा विनोदी सुरात तो उत्तरला होता, " हे बघ सुहास, तुझा हा कोर्स पुरा होऊ दे ! मग माझं लग्न लग्न काय, तू म्हणशील तेव्हा करून काश्मीरलाच ' मधुचंद्र ' साजरा करायला जाईन ! मग तर झालं ?" दादा हा एक अत्यंत भावनाप्रधान माणूस होता. त्याचं हृदय एखाद्या कवीप्रमाणं हळुवार होतं. त्यानं माझ्यासाठी, माझ्या शिक्षणापायी आपली हौस-मौज पुरी करणं तर दूरच राहो, पण लग्न करून वैवाहिक जीवनातही पदार्पण करायचं मान्य केलं नाही. न जाणो, त्यामुळं माझ्याकडं, माझ्या शिक्षणाकडं त्याचं दुर्लक्ष झालं तर ? त्याला तो विचारही सहन होत नव्हता. माझं भाग्य थोर ! म्हणूनच दादासारखा वडील-बंधू मला लाभला.

...पण त्याच दादाचं हे अवनत रूप पाहून मला धक्का असह्य झाला. ती रात्र मी तळमळतच घालविली. पहाटे कुठं मला थोडा डोळा लागला. साहजिकच दुसऱ्या दिवशी सकाळी मी बऱ्याच उशिरा उठलो. तोपर्यंत दादा बाहेर निघूनही गेला होता ! बहुतेक मला टाळण्याच्या हेतूनंच तर तो निघून गेला नसेल ना ?

काल रात्री माझ्या आगमनाच्या वेळी झोपी गेलेला दिनेश-माझा पुतण्या-घरात इकडं तिकडं दुड्दुड् धावत फिरत असणार, ही माझी कल्पना ! परंतु त्या सकाळी मला दुसरा जबरदस्त धक्का देणारं दुसरं एक दृश्य पाहायला मिळालं. दिनेश दोन्ही पायांनी पूर्ण पांगळा होता ! जवळ जवळ अडीच वर्षांचा बालक तो; पण अगदी नवजात बालकाप्रमाणं तो सर्व गोष्टींत आईवरच अवलंबून असल्याचं मला स्पष्ट दिसत होतं. वहिनींनी त्याला उचलून शौचाला बसवावं, त्याचं सर्व काही करावं ! तो आपल्या पायावर उभा राहू शकत नव्हता की बसूही शकत नव्हता ! मानवी बांडगूळच नव्हता का तो ? काठीप्रमाणं बारीक, वाळलेले, गुडघ्यात कायमचे वाकलेले त्याचे ते काष्ठवत पाय काहीच कामाचे नव्हते ! ...आणि मी तर घरी येताना पुण्यात खास थांबून त्याच्यासाठी एक तीन चाकी सायकल घेऊन आलो होतो ! केवढा हा दैवदुर्विलास ?

दुर्दैव माझ्याशी खेळ खेळत होतं की दादा-वहिनींशी? मी दीर्घ कालावधी-नंतर घरी परतल्यावर हळूहळू तुटलेले दुवे जोडू शकत होतो. भूतकाळातल्या काही अनाकलनीय गोष्टींचा आता अर्थ लावू शकत होतो. दादाचा माझ्याशी असलेला पत्रव्यवहार कसा अधिकाधिक अनियमित होत गेला व त्याला केवळ औपचारिक पत्रोत्तराचं स्वरूप का येत गेलं? त्यानं मी नवजात शिशूबद्दल विचारलेल्या अनेक प्रश्नांना का उत्तर दिलं नाही वगैरे गोष्टींचं कोडं मला उलगडू लागलं.

दोन-तीन दिवसांच्या पाठशिवणीच्या खेळानंतर एका सकाळी मी दादाला गाठलं. त्याच्याजवळ दिनेशचा विषय काढला. शिवाय, खुद्द दादाच्या परवाच्या त्या झिंगून येण्याबद्दलचंही कारण मला हळूहळू शोधून काढायचं होतं. मी त्याला विचारलं,

"दादा, तुम्ही लोकांनी दिनेशबद्दल का नाही कळवलं? — का मला पूर्ण अंधारात ठेवलंत?"

"त्याबद्दल काय कळवायचं?... दिनेश हा एक दुर्दैवी जीव आहे, सुहास अन् त्याच्याहीपेक्षा अधिक दुर्दैवी आहोत, आम्ही—त्याचे आईबाप!..."

"पण दादा, सारेच उपाय खुंटल्यासारखं असं का बोलतोयस् तू?"

"आम्ही आमच्या परीनं शिकस्त केली. अनेक चांगल्या डॉक्टरांना दाखविलं; पण व्यर्थ!..."

"पण मी अजून माझं स्वतःचं समाधान कुठं करून घेतलंय्? जरी माझं ज्ञान तोकडं पडत असल, तरी मी हडी-तज्ज्ञांच्या शोधार्थ आहे. त्यांच्याकडून दिनेशच्या पायांवर उपचार करून घेऊ आपण!..."

"सुहस, तू स्वतः डॉक्टर आहेस! त्याचा मला अभिमान आहे. तुला आमच्या-पेक्षा अधिक कळेल कदाचित. मला तर या गोष्टीचं दुःख होतंय् की, तू इतक्या वर्षांनी घरी परतलायस् अन् आमच्याकडून तुला दुःख नि चिंताच मिळताहेत..." दाटलेले अश्रू शर्टाच्या पुढील टोकानं पुसत दादा उठला आणि टोपी घालून बाहेर निघून गेला!

असेच काही दिवस निघून गेले. एके रात्री मी नेहमीपेक्षा थोडा उशिराच घरी परतलो.

"एवढा उशीर का बरं आज?" वहिनींनी मला विचारलं. फक्त नऊ वाजून गेले होते. खुद्द दादासही वहिनींना असं कधी विचारताना मी ऐकलं नव्हतं. त्यामुळं मला आश्चर्य वाटलं. तथापि, माझं मन सुखावलं. वहिनींचा प्रश्न जणू याचंच द्योतक होतं की, आमच्यात अधिक आपुलकी व जवळीक निर्माण झाली होती. त्या मला आता घरातलाच एक मानू लागल्या होत्या. विस्कळीत चौकोनाच्या बाजू सांधल्या जात होत्या. मनामनांतील धागे हळूहळू गुंफले जाऊ लागले होते. परस्परांवरील विश्वास वाढून त्याचबरोबर परस्परांवरील अधिकारही वाढत चालले नव्हते काय?

मी हातपाय–तोंड धुऊन आल्यावर वहिनींनी मला पान वाढलं. बोलण्याच्या ओघात मी दादाविषयी अन् दिनेशविषयी विचारलं. विरू लागलेल्या धुक्याचा पडदा थोडा बाजूला सारून आत–भूतकाळात–डोकावण्याची संधी मला हवी होती. मी पाटावर बसत म्हणालो, "त्याचं असं झालं वहिनी, मी पोस्टातून मुंबईला एक 'ट्रंककॉल' लावून बसलो होतो. एकदाचा फोन लागला अन् मी माझ्या एका जुन्या डॉक्टर मित्राशी बोललो. इतके दिवस नुसते पत्रव्यवहारात गेले. आता दिनेशला घेऊन मुंबईला जावं म्हणतोय् मी! एका 'बोन स्पेशॅलिस्ट'ला दाखवून पाहू. "

निराशेचे दोन–अडीच वर्षांचे पटल एकाएकी कसे दूर होणार? वहिनी काहीच बोलल्या नाहीत. त्यांच्या तोंडून उसासा बाहेर पडला. मीच पुढं म्हणालो, "दादा-सारखा वडील बंधू लाभल्यामुळं मी स्वतःला भाग्यवान समजत आलो खरा! पण दुसऱ्या एका दृष्टीनं पाहता वाटतं, माझंच नशीब खोटं..."

"आपलं नशीब खोटं कशाला म्हणता भावजी? माझाच पायगुण चांगला नाही, म्हणा हवं तर "

"असं काय म्हणता वहिनी? दोष परिस्थितीचा आहे, तुमचा नाही. इतक्या वर्षांनी घरी परतल्यावर मला जे पाहायला मिळतंय् ते अकल्पित, तसंच दुर्दैवी नव्हे काय?"

"ध्यानीमनी किंवा स्वप्नीही न येणाऱ्या गोष्टी कधी कधी आयुष्यात घडतात, भावजी! आमच्या भावी संसाराबद्दल 'हे' किती उत्साहानं बोलायचे, म्हणायचे, 'सुहासचं शिक्षण पूर्ण झालं. तो आपल्या स्वतःच्या पायावर उभा राहिला. माझं एक मोठं स्वप्न पुरं झालं. आता आपल्या सुखी संसाराचं स्वप्न पुरं करणं तुझ्या हाती आहे .."

वहिनी बोलायच्या थांबल्या. माझ्या ताटात गरम पोळी वाढीत त्या म्हणाल्या, "भावजी, तुम्ही माझ्या धाकट्या भावासारखेच! – तुम्हांला सांगायला काही हरकत नाही...लग्नानंतर 'यांनी' आपल्या भावी जीवनाचे विचार, कल्पना मला बोलून दाखविल्या. उन्हाळ्यात आपण महिना–दीड महिना सुट्टी काढून दूर दूर प्रवासाला जायचं! काश्मीरला नाहीतर सिमल्याला जाऊन राहायचं! मौज–हौस करून परत यायचं. आणि पहिले काही महिने अशी सुखस्वप्नं पाहण्यात कसे भुर्रकन् निघून गेले, ते कळलंसुद्धा नाही?...

"मध्यंतरी मला दिवस गले. उन्हाळा आला, तेव्हा मला सहावा महिना लागला होता! अर्थातच प्रवास–पर्यटनाचे व थंड हवेच्या ठिकाणी जाऊन मजेत सुट्टी घालविण्याचे आमचे बेत बारगळले! 'हे' काही बोलले नाहीत. पण त्यांची मनातून निराशा झाल्याचं मी चांगली जाणून होते. पण एक आशा मनात अंकुरत होती की, बाळ जन्मल्यावर 'हे' आपोआप त्याच्यात रमून जातील. जुनी स्वप्नं विसरून जाऊन नवी स्वप्नं पाहण्यात त्यांचं मन गुंतेल. या विचारासरशी मीही

नकळत सुख-स्वप्नात रंगून जायची ! हे सर्व कदाचित् घडलंही असतं. पण दिनेश कसा जन्माला आला, ते तुम्ही पाहताच एक अपंग, एक पांगळा जीव !"

डोळयांत तरळू लागलेले अश्रू पुसून त्यांनी मला भात व वरण वाढलं. नंतर त्या पुढं सांगू लागल्या, "निसर्गानं मला फसवलं, भावजी ! माझा विश्वासघात केला; क्रूरपणानं माझी थट्टा केली ...जन्मलेल्या जिवाचं सारं काही माझ्यावरच अवलंबून. त्याला कुठं टाकून तर देता येत नाही ? त्याचा दोष तरी काय ? त्याचं करण्यातच माझा सारा वेळ जाऊ लागला. प्रेम, कर्तव्य, जबाबदारी व सक्ती यांच्या चक्रात मी एकाच वेळी अडकून गेले !

"याचा दुष्परिणाम म्हणजे 'हे' जास्तीत जास्त वेळ घराबाहेर काढू लागले. फुलांच्या आशेनं पसरलेल्या पदरात काटेच पडले. त्याचं दुःख आणि निराशा यांचं विस्मरण व्हावं, म्हणून 'हे' स्वतःभोवती मिळतील ते, मिळतील तसले मित्र जमा करून त्यांच्या व निरनिराळ्या व्यसनांच्या स्वाधीन होऊ लागले. 'हे' येनकेन प्रकारेण स्वतःला विसरून जाण्याच्या प्रयत्नात गर्क झाले. इतके की जेव्हा दिनेशवरील सर्व प्रकारचे औषधोपचार अन् निरनिराळ्या डॉक्टरांना दाखविणे निष्फळ ठरल्यावर तर हे पूर्णपणे प्रवाहपतीत बनले.

"मित्रांबरोबर बसून 'रमी' खेळण्यात 'हे' रात्री रात्री बाहेर घालवू लागले. विडी-सिगरेट प्यायला 'ह्यांनी' केव्हाच सुरुवात केली होती. पुढं पुढं काहीच विधिनिषेध ठेवला नाही ! हळूहळू दारूही प्यायला लागले. आरंभी मी 'ह्यांना' रागानं बोलले. विरोध करू लागले. पण पुढं पुढं गप्प बसू लागले. मला कळत होतं की, माझ्याइतक्याच कठोर मनोवेदना त्यांनाही होत होत्या. मी तरी अश्रूंच्या रूपानं स्वतःचं दुःख काही अंशी कमी करण्याचा प्रयत्न करीत होते; करू शकत होते. पण ते पुरुष ! त्यांना तोही मार्ग राहत नव्हता. अर्थात, आपल्या व्यथेपासून मुक्ती मिळविण्याच्या प्रयत्नांपायी 'ह्यांनी' स्वतःला जणू विनाशाच्या प्रवाहातच झोकून दिलं होतं ! खरं पाहता आम्ही तिघंही प्रवाह-पतीतच बनलो नव्हतो काय ? काय करू शकत होतो आम्ही या परिस्थितीत ?...आता तर आम्हांला आमची स्वतःचीच कीव येतेय् भावजी..." वहिनींनी अगतिकपणं म्हटलं. नंतर त्या गप्प बसून राहिल्या.

मी कसंबसं जेवण उरकून आतल्या खोलीत निघून गेलो. प्रेमाच्या व उपकाराच्या राशीखाली दबलेला मी एक भाऊ आणि डॉक्टर ! युद्धाच्या धुमश्चक्रीत घायाळ झालेल्यांना आणि अर्धमेलेल्यांनाही आपल्या प्रयत्नांची शिकस्त करून मी मरणाच्या दाढेतून माघारी आणलं; पण माझ्या पितृवत् दादाच्या पोटी जन्मलेल्या दुर्दैवी अन् अपंग दिनेशसाठी मी काय केलं होतं ? काय करू शकत होतो ? दिनेशच्या उपचारार्थ भगीरथ प्रयत्न करायचे ठरवून मी त्याला मुंबईस घेऊन गेलो. द्रव्यबळाशिवाय दृढनिश्चयही मनात घेऊन गेलो.

मुंबईत गेल्याच्या दुसऱ्याच दिवशी दिनेशला तपासण्याची तारीख व वेळ ठरविली होती. त्यानुसार दुसऱ्या दिवशी त्याला घेऊन मी अमेरिकन ' बोन स्पेशॅ-लिस्ट ' डॉक्टर फ्लेचर यांच्या दवाखान्यात हजर झालो. त्यांचे आणखी एक हाड-तज्ज्ञ मित्रही त्यावेळी मुंबईत त्यांच्यासमवेत हजर होते. त्या दोघांनी मिळून निरनिराळ्या उपकरणांनी दिनेशच्या दोन्ही पायांची कसून संपूर्ण तपासणी केली. गुडघ्यांच्या व घोटयांच्या सांध्यांचे क्ष-किरण फोटो घेऊन मला दुसऱ्या दिवशी यायला सांगितलं.

डॉ. फ्लेचरना मी नियुक्त समयी पुन्हा भेटलो. ते क्षणभर स्तब्ध राहिले. त्यामुळं, स्वत: एक डॉक्टर असूनदेखील, मी अस्वस्थ झालो. काही क्षणांनी त्यांनी आपला अभिप्राय दिला, " आय ॲम सॉरी डॉक्टर, वुई मेड ए थरो एक्झामिनेशन ऑफ् हिज नी-जॉईन्टस् ओन्ली टू रीच दी कन्क्ल्यूजन दॅट इफ् एनिथिंग कुड क्युअर हिज लेग्ज, इट् इज मिरॅकल !" आणि आपल्या पराभूत चेहऱ्यावर स्मितहास्य ओढून ताणून आणण्याचा प्रयत्न करीत ते पुढं म्हणाले, " ॲण्ड यू नो दॅट दी डेज ऑफ् मिरॅकल आर नॉट ओव्हर !"

[ " मला दिलगिरी वाटते डॉक्टर, की या ' केस 'बद्दल आशा बाळगायला जागाच नाही ! आम्ही मुलाच्या दोन्ही गुडघ्यांची व घोटयांची कसून तपासणी केली अन् त्यातून एकच सार निघतं की केवळ एखादा चमत्कार घडला तरच त्याचे पाय बरे होतील ! .. अन् चमत्कार आजही घडतात नाही का ? ]

तिसऱ्या दिवशी मी मुंबईहून दिनेशसह गावी परतलो. प्रवासाच्या दगदगीनं तो आजारी पडला. त्याला ताप येऊ लागला. या दुःखान्तिकेवर उपाय काय ? अनेक वर्षं स्वसुखाची आहुती देऊन माझ्यासाठी झिजणाऱ्या माझ्या प्रिय वडील

लहान मुलांसाठीं उत्कृष्ट औषध।

डोंगरे बालामृत

के. टी. डोंगरे ॲण्ड कं. प्रा. लि. बम्बई-१,

भावाला निराशेच्या अन् दुःखाच्या गर्तेतून कसं ओढून काढायचं? त्याच्या कौटुंबिक जीवनाची विस्कटू पाहणारी घडी पुन्हा कशी बसवावी? तो आत्मनाशाच्या कड्यावरून खाली कोसळत असताना मी गप्प बसून पाहत राहायचं काय?... नाही! काहीतरी केलंच पाहिजे.

एक दिवस संध्याकाळी मी घरातून बाहेर पडलो आणि गावातल्या सर्व मंदिरांना, मशिदींना व ख्रिस्ती उपासना गृहांना भेटी दिल्या. देवासमोर पदर पसरला. मार्गदर्शनासाठी देवाजवळ भीक मागितली. आता तेच माझ्या हाती राहिलं नव्हतं काय?

एके ठिकाणी मी परत फिरताना मंदिराच्या समोर मला भिकाऱ्याचा एक पोर दिसला. पंधरा–सोळा वयाच्या त्या मुलाचे पाय काष्ठवत् सुकून गेलेले होते! येणाऱ्या–जाणाऱ्या प्रत्येकापुढं हात पसरून तो दीनवाणेपणानं भिक्षा मागत होता. माझं मन ते दृश्य पाहून अधिकच उदास झालं.

दोन–तीन दिवस झाले, वहिनी दिनेशच्या उशागती बसून जाग्रण करीत होत्या. जाग्रणामुळं त्यांचे डोळे तांबूस व किंचित् सुजल्यासारखे झाले होते. तरीही त्या दिनेशपाशी बसून होत्या. मीही दिनेशच्या पायथ्याला येऊन बसलो आणि वहिनींना विनविलं,

'तुम्ही जाऊन थोडी झोप घ्या! मी राहतो बसून आज रात्री तरी. ऐका माझं..." माझ्या आग्रहामुळं त्या उठून झोपायला निघून गेल्या. काही क्षणांतच त्यांना गाढ झोप लागलेली दिसली. दादाच्या घोरण्याबरोबर त्यांचा उच्छ्वास आता ऐकू येऊ लागला. मला थोडं समाधान वाटलं.

रात्रीच्या नीरव शांततेत कुठं तरी दोनाचे ठोके निनादले. सर्व नगर निद्राधीन झालं होतं. माझ्याही डोळ्यांवर झोपेचा अम्मल होऊ पाहत होता. मी तसाच भिंतीला टेकून क्षणभर डोळे मिटले. एकाएकी कुणी "काऽका!" अशी हाक मारल्याचा मला भास झाला. मी दचकून डोळे उघडले आणि खडबडून जागा झालो. मला वाटलं काही मिनिटंच गेली असतील परंतु जवळच्या टाईम–पीसमध्ये चांगले तीन वाजायला आले होते! मी दिनेशचा ताप घेण्यासाठी थर्मामीटर घेतलं. ते त्याच्या बगलेत घालणार तोच मला त्याचा स्पर्श थंड वाटला. मी नाडी पाहण्यास त्याचा हात हाती घेतला. पण...पण...दिनेशचं प्राणपाखरू केव्हाच नकळत उडून गेलेलं होतं. मी एक दीर्घ उसासा सोडला–नकळत दिनेशनं दुसऱ्या दिवसाचा सूर्योदय पाहण्याचीही इच्छा दाखविली नव्हती. त्यानं आम्हा सर्वांना फसवलं. आम्हाला गुंगारा देऊन तो इहलोकातून चालता झाला!...

□ □ ■

# आपल्या लोकशाहीतील

काँग्रेस पक्षातील फुटीनंतर इंदिरा गांधी गट व निजलिंगप्पा किंवा सिंडिकेट गट यांच्यातील सत्तासंघर्षात पंतप्रधान श्रीमती गांधींनी सिंडिकेटवर मात करून बिहार व उत्तरप्रदेशात आपल्याला अनुकूल सरकारे स्थापण्यात अखेर यश मिळविले. या दोन राज्यांत गेल्या काही दिवसांत घडलेल्या घडामोडी, दोन्ही गटांनी एकमेकांविरुद्ध टाकलेले डाव-प्रतिडाव, राजकीय कारवायांनी गाठलेली हीन पातळी म्हणजे उद्या इतर राज्यांत आणि केंद्र पातळीवरही खेळल्या जाणाऱ्या राजकारणाची नांदी आहे. यातून आपली लोकशाही टिकेल काय, तिच्या निकोप विकासास आड येणाऱ्या अनिष्ट प्रवृत्ती कशा घालविता येतील, अधिकारारूढ पक्ष, विरोधी पक्ष, राज्यपाल आणि सर्वसामान्य नागरिक यांच्यावर याबाबतीत कोणती जबाबदारी पडते याचा विचार खऱ्या लोकशाहीबद्दल निष्ठा असणाऱ्या सर्वांनीच करण्याची वेळ आलेली असून त्या दृष्टिकोणातूनच काही विचार या लेखात मांडीत आहे.

बिहार व उत्तर प्रदेशात खरा सत्तासंघर्ष इंदिरा गट व निजलिंगप्पा गट किंवा रूढ शब्द वापरायचे तर ' इंडिकेट आणि सिंडिकेट' यांच्यातच होता. केंद्रातील आपली सत्ता टिकवायची तर जास्तीत जास्त राज्य सरकारे आपल्या बाजूची-निदान आपल्यास विरोध न करणारी-असली पाहिजेत या दृष्टीने इंदिरा गांधींनी काँग्रेसमधील फुटीनंतर हालचाली सुरू केल्या. केरळ, मद्रास, पश्चिम बंगाल, पंजाब व ओरिसा या पाच राज्यांत काँग्रेसेतर आघाड्यांची सरकारे आहेत. यापैकी केरळ व पश्चिम बंगालमधील डाव्या आघाड्यांची सरकारे आणि मद्रासमधील द्र. मु. क. चे सरकार यांच्या पक्षांच्या खासदारांचा पार्लमेंटमध्ये आपल्याला पाठिंबा मिळविण्यात इंदिरा गांधींनी यश मिळविले. पंजाब आपल्या बाजूला मिळविण्यासाठी चंडीगड पंजाबला दिले. ओरिसात मात्र त्यांना काही हालचाल करता आली नाही. काँग्रेस पक्षाच्या सरकारांपैकी गुजरात व म्हैसूर हे सिंडिकेटचे बालेकिल्ले. ते सर करणे सोपे नाही. पण तेथे आपले गट इंदिरा गांधींनी स्थापन केले असून विरोधी पक्षांच्या पाठिंब्याने तेथील सरकारेही खाली ओढण्याचा प्रयत्न केला जाईल. महाराष्ट्र, आंध्र, राजस्थान, हरियाना आसाम, काश्मीर ही सरकारे इंदिरा गटाच्या बाजूचीच आहेत तेव्हा तेथे काही करण्याचा प्रश्न नव्हता. राहता

वा. दा. रानडे

# अनिष्ट प्रवृत्ती

राहिली दोनच राज्ये. बिहार व उत्तरप्रदेश. तेथे आपल्या बाजूची सरकारे आणण्याच्या हालचाली इंदिरा गांधींनी सुरू केल्या.

बिहारमध्ये मुदतपूर्व निवडणुकीनंतरही स्थिर सरकार स्थापन होऊ शकले नाही. कॉंग्रेसचे हरिहरसिंग यांचे सरकार साडेचार महिने अधिकारावर होते. पण त्यांचे बहुमत संपुष्टात येताच बिहारमध्ये दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्षांची राजवट आली. कॉंग्रेस दुभंगलेली नसताना जेथे तिचे हुकमी बहुमत नव्हते तेथे तिच्यात फूट पडल्यावर इंडिकेट किंवा सिंडिकेट यापैकी कोणाच्याच मागे हुकमी बहुमत असणे शक्यच नव्हते. अशा परिस्थितीत सरकार बनविण्यासाठी इतर पक्षांशी आघाडी बनविण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. दोन्ही बाजूंनी तेच प्रयत्न सुरू केले. या सत्ता संघर्षात दोन घटनांमुळे इंदिरा गटाचे यश निश्चित झाले, त्यापैकी एक घटना म्हणजे प्रजासमाजवादी पक्षाने इंदिरा गटाचे नेते दरोगाराप्रसाद राय यांना पाठिंबा जाहीर केला. संयुक्त समाजवादी पक्ष त पडलेली फूट ही दुसरी घटना. पण संयुक्त समाजवादी पक्षातील फुटीपेक्षाही प्रजासमाजवादी पक्षाचा पाठिंबा निर्णायक ठरला. विधानसभेच्या एकूण ३१८ सभासदांत आपल्याला १७३ सभासदांचा पाठिंबा असल्याचा दरोगाप्रसाद राय यांचा दावा आहे. या १७३ मध्ये १७ प्रजासमाजवादी आहेत. त्यांचा पाठिंबा मिळाला नसता तर दरोगाप्रसाद राय यांचे बहुमत होऊ शकत नव्हते.

## सहा पक्षांचे संयुक्त सरकार

दरोगाप्रसाद राय यांनी सहा पक्षांचे संयुक्त मंत्रिमंडळ स्थापन केले आहे. त्यात इंदिरा गट ८४, भारतीय क्रांति दल ८, शोषित दल ६, कम्युनिस्ट २५, प्रजासमाजवादी १७ व झारखंड पक्ष १० असे या सहा पक्षांचे १५० सभासद आहेत म्हणजे या सहा पक्षांचेसुद्धा हुकमी बहुमत होत नाही. त्यासाठी इतर २३ अपक्ष सभासदांचा पाठिंबा दरोगा राय यांना मिळवावा लागला. भारतीय क्रांति दल व शोषित दलाचे आमदार बिनभरवशाचे असल्याचा अनुभव यापूर्वी आलेला आहे. अपक्ष सभासदही बिनभरवशाचेच असतात. प्रतिस्पर्धी पक्षाने मंत्रिपदाचे किंवा अधिकारपदाचे अधिक मोठे आमिष दाखविल्यास हे सभासद केव्हा फुटतील याचा

नेम नाही. अशा परिस्थितीत दरोगाप्रसाद राय यांचे मंत्रिमंडळ फार काळ टिकणे कठीण आहे.

मंत्रिमंडळ बनविताना बिहारमध्ये आघाड्यांचे जे राजकारण खेळले गेले त्यात राजकीय पक्षांचा उद्देश जनहितापेक्षा आपल्या हाती सत्ता आणण्याचाच होता. मी वर म्हटल्याप्रमाणे मुख्य सत्तासंघर्ष इंडिकेट विरुद्ध सिंडिकेट यांच्यांत होता. दोन आघाड्या दोन गटांच्या नेत्यांनीच पुढाकार घेऊन बनविल्या. यांपैकी आपण कोणत्या आघाडीत सामील व्हावयाचे याचा निर्णय इतर राजकीय पक्षांनी कोणत्या निकषावर घेतला ? इतर राजकीय पक्षांत तीन प्रकारचे पक्ष होते. डावे पक्ष, उजवे पक्ष व स्थानिक पक्ष. या सर्वांच्या भूमिकेचा अधिक सविस्तर विचार केल्यानेच बिहारमधील राजकीय चित्र अधिक स्पष्ट होईल.

चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीत व त्यानंतरच्या मुदतपूर्व निवडणुकीत कॉंग्रेस हुकमी बहुमत मिळवू शकली नाही. पण डाव्या गटांनासुद्धा एकत्रित हुकमी बहुमत मिळाले नाही. जनसंघ, स्वतंत्र पक्ष हे उजवे पक्ष आणि जनता पक्ष, झारखंड हे स्थानिक पक्ष यांचे सहकार्य संयुक्त आघाडी स्थापताना त्यांना घ्यावेच लागले. चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर स्थापन झालेल्या पहिल्या महामाया प्रसाद मंत्रिमंडळात दोन्ही कम्युनिस्ट पक्ष, संयुक्त समाजवादी, प्रजासमाजवादी, या डाव्या गटांच्या बरोबरीने जनसंघ व रामगडच्या राजांचा जनता पक्ष सहभागी झाले होते. सत्तालोभापुढे तत्त्वनिष्ठेला तिलांजली मिळाली आणि आयाराम-गयारामच्या उघड संधिसाधू राजकारणाने बिहारमध्ये थैमान मांडले.

केवळ डाव्या गटांचे नव्हे पण त्यांचा प्रभाव असलेल्या संयुक्त आघाडीचे सरकार स्थापणे शक्य होते. बिहार विधानसभेत संयुक्तसमाजवादी ५३, उजवे कम्युनिस्ट २५, डावे कम्युनिस्ट ३ व प्रजासमाजवादी १७ या चार डाव्या गटांचे मिळून ९५ सभासद आहेत. संयुक्त कार्यक्रमावर एकत्र आल्यास विधानसभेत त्यांचा सर्वात मोठा गट होऊ शकत होता. हे सर्व डावे गट आणि दरोगाप्रसाद राय गटाची कॉंग्रेस (८४ सभासद) यांची संयुक्त आघाडी झाली असती तर डाव्या गटांचा प्रभाव असलेले स्थिर सरकार बिहारला लाभले असते. चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीनंतरची बिहारमधील सरकारे शोषितदल, जनतापक्ष, भारतीय क्रांति दल, झारखंड पक्ष या स्थानिक पक्षांवर मुख्यतः अवलंबून होती. यांपैकी एकदोन पक्ष फुटताच ती सरकारे गडगडली. तेव्हा बिहारमध्ये पुरोगामी धोरणाचे स्थिर सरकार स्थापावयाचे तर जनसंघ, स्वतंत्र पक्ष या उजव्या पक्षांप्रमाणेच या स्थानिक संधिसाधू पक्षांना दूर सारणे आवश्यक होते. डावे गट व दरोगाप्रसाद राय गट यांच्या आघाडीचे सरकार हाच त्यावर उपाय होता.

## संयुक्त समाजवाद्यांचे धोरण

अशी आघाडी स्थापण्याचे प्रयत्न अयशस्वी झाले ते मुख्यतः संयुक्तसमाजवादी

पक्षाच्या धोरणामुळे. इतर डाव्या गटांप्रमाणे दरोगाप्रसाद राय गटाला पाठिंबा द्यावयाचा की सिंडिकेट-जनसंघ आघाडीत सामील व्हावयाचे या प्रश्नावर संयुक्त समाजवादी नेत्यांत मतभेद झाले. काँग्रेसमधील फुटीनंतर काँग्रेस विरोधाचे डॉ. लोहियांचे धोरण पुढे चालवायचे तर इंदिरा गांधी गटाला विरोध करणे आणि इंदिरा सरकार खाली ओढणे हाच या धोरणाचा पाया असला पाहिजे अशी मधू लिमये, राजनारायण या नेत्यांची भूमिका होती. म्हणूनच दरोगाप्रसाद राय यांच्या गटास पाठिंबा देण्यास त्यांचा विरोध होता व त्यापेक्षा सिंडिकेट गट त्यांना अधिक जवळचा वाटत होता. सिंडिकेट-जनसंघ आघाडीत सामील होण्याचा या नेत्यांनी निर्णय घेतला. रामानंद तिवारींना आघाडीचे नेते निवडण्यात आले पण पक्षात या प्रश्नावर मतभेद होते. तिवारी आणि पक्षाचे अध्यक्ष कर्पूरी ठाकूर यांना सिंडिकेटशी सोयरिक मनापासून मान्य नव्हती. सिंडिकेट आघाडी आम्ही मानीत नाही. तिच्याशी आमचा काही संबंध नाही, असे तिवारींनी एक दिवस जाहीर केले. पक्षातील फूट टाळण्यासाठी विधिमंडळ पक्षाची बैठक घेण्यात आली. तिला अखिल भारतीय नेते उपस्थित राहिले. तीन दिवस झालेल्या वीस तासांच्या चर्चेनंतर एक तडजोड ठराव ३२ विरुद्ध १४ मतांनी पास झाला. त्यात सिंडिकेट आघाडीत सामील होण्यास मान्यता दिली होती. पण त्याचबरोबर पर्यायी आघाडी स्थापण्याचे प्रयत्न चालू ठेवण्यास मोकळीक ठेवली होती. या ठरावाच्या अर्थाबद्दल पक्षसभासदांत पुन: मतभेद झाले पण सिंडिकेट आघाडीचे सरकार स्थापन होऊ न शकल्याने पक्षात उघड फूट पडण्याच्या थरापर्यंत हे मतभेद गेले नाहीत. तडजोड ठरावात सुचविल्याप्रमाणे पर्यायी आघाडी स्थापण्याचे प्रयत्न संयुक्त समाजवादी नेत्यांनी मनापासून केलेच नाहीत.

संयुक्त समाजवादी नेत्यांचे हे धोरण बरोबर होते का? काँग्रेसमधील फुटीनंतर काँग्रेसच्या स्वरूपात काहीही फरक पडलेला नाही. केंद्रातील इंदिरा गांधी सरकार खाली आणण्याचे पूर्वीचे धोरण पुढे चालू ठेवले पाहिजे. त्यासाठी जरूर तर जनसंघ वगैरे उजव्या गटाच्या पक्षांप्रमाणे सिंडिकेट काँग्रेसचेही सहकार्य घेतले पाहिजे. केंद्रात किंवा कोणत्याही राज्यात इंदिरा गटाचे बस्तान स्थिर होण्यास मदत होईल असे आपण काहीही करता कामा नये अशी त्यांची भूमिका आहे. पक्षातल्या एस. एम. जोशी गटाला हे धोरण पसंत नाही. बँक राष्ट्रियीकरणासारख्या इंदिरा सरकारच्या पावलांना पाठिंबा दिला पाहिजे व तेवढ्यावरच न थांबता आणखी धडाडीची समाजवादी पावले टाकण्यासाठी त्यांच्यावर सतत दडपण समाजवादी शक्तींनी आणले पाहिजे असे जोशी गटाला वाटते. पण जोशी गट अल्पमतात असल्याने पक्षाने बहुमताने ठरविलेले धोरण त्यांना अखेर मान्य करावे लागले.

बँकांचे राष्ट्रियीकरण इंदिरा गांधींनी केले ते समाजवादी कार्यक्रम धडाडीने

अमलात आणण्याच्या धोरणाचा भाग म्हणून नव्हे तर सत्तास्पर्धेत आपल्या गटाची बाजू बळकट करण्यासाठी. समाजवादी कार्यक्रम अमलात आणण्याच्या खऱ्या चळमळीपेक्षा तसे काहीतरी करीत असल्याचा देखावाच त्यात जास्त होता. इंदिरा सरकारचे धोरण मूलतः प्रतिगामीच राहणार आहे. बँक राष्ट्रीयीकरणासारखे एखादे पाऊल त्यांनी टाकले तर तेवढ्याकरता त्यास पाठिंबा द्यावयाचा. प्रतिगामी धोरणांना विरोध सतत चालूच ठेवावयाचा, अशीच भूमिका इंदिरा सरकारबद्दल डाव्या गटांनी घेणे योग्य होईल. पण इंदिरा सरकारला आणि इंदिरा गटाच्या काँग्रेसला विरोध करताना सिंडिकेटशी सहकार्य करून सिंडिकेटचे वजन वाढण्यास आपला हातभार लागत नाही याची ही खबरदारी घेतली पाहिजे. सिंडिकेट आघाडीत सामील होण्याच्या संयुक्त समाजवाद्यांच्या धोरणाने सिंडिकेटचे वजन वाढण्यास मदत होत आहे. बिहारमध्ये त्यांनी स्वीकारलेले धोरण या दृष्टीने बरोबर नव्हते असेच म्हणावे लागेल.

काँग्रेसच्या दोन्ही गटांना वगळून काँग्रेसेतर पक्षांच्या आघाडीचे सरकार स्थापन होऊ शकले असते का? असे सरकार स्थापन होऊ शकले असते पण त्यात जनसंघ, स्वतंत्र पक्ष या उजव्या पक्षांना, तसेच जनता पक्ष, शोषित दल वगैरे बिनभरवशाच्या संधिसाधू पक्षांना सामील करून घ्यावे लागले असते. चौथ्या सार्वत्रिक निवडणुकी-नंतर महामायाप्रसाद मंत्रिमंडळ अशाच प्रकारची आघाडी बनून स्थापन झाले होते पण अशा आघाड्या टिकत नाहीत असा अनुभव त्या वेळी आलेला असताना पुनः तशाच आघाड्या बनविण्यात काय अर्थ होता?

## राज्यपालांवर दडपण

सिंडिकेट आघाडीमागे बहुमत असताही तिला सरकार बनवू देण्याची संधी दिली नाही. दोन्ही आघाड्यांचे नेत्यांनी सादर केलेल्या याद्यांची राज्यपालांनी नीट छाननी केली नाही. दरोगाप्रसाद राय यांचे मंत्रिमंडळ स्थापण्याबाबत इंदिरा गांधींच्या केंद्र सरकारने राज्यपालांवर दडपण आणले अशी टीका सिंडिकेट व विरोधी पक्षाचे नेते करीत आहेत. दरोगाप्रसाद राय यांनी १७३ सभासदांची यादी पाठविली होती तर सिंडिकेट आघाडीने १७५ सभासदांची यादी पाठविली होती. दोन रिकाम्या जागा सोडता विधान सभेचे एकूण सभासद ३१६ आहेत. दोन्ही आघाड्यांनी सादर केलेल्या याद्यांतील सभासदांची एकूण बेरीज ३४८ म्हणजे विधानसभेच्या एकूण सभासदांपेक्षा ३२ ने जास्त आहे. काही सभासदांनी दोन्ही याद्यांवर सह्या केल्या होत्या व यावरून उघड होते. हे दोन्ही डगरींवर हात ठेवू पाहणारे संधिसाधू आमदार खरोखर कोणत्या बाजूचे याची राज्यपालांनी नीट छाननी केली होती काय, याबद्दल विरोधकांच्या मनात शंका राहयला नको असतील तर आपण बहुमताची छाननी कशी केली, कोणते निकष लावले याचा अहवाल राज्यपालांनी सादर केला पाहिजे आणि तो प्रसिद्ध करण्यात आला पाहिजे.

आणखी एक सूचना येथे करावीशी वाटते. दोन्ही बाजूंस सह्या करणाऱ्या आमदारांची यादीच राज्यपालांनी प्रसिद्ध करावी. दोन्ही बाजूंस सह्या करणे हा सभासदत्व रद्द होण्याइतका मोठा गुन्हा समजला जावा. विधानसभेच्या नियमांतच त्याचा अंतर्भाव करावा अशा प्रकारचे कडक उपाय योजल्याशिवाय अशा, संधि-साधूपणास आळा बसणार नाही.

आपल्याला अनुकूल अशी सरकारे अधिकारावर आणण्यासाठी केंद्र सरकार राज्यपालांवर दडपण आणते ही टीका काही नवीन नाही. यापूर्वीही अनेकदा ती करण्यात आली आहे. विरोधी पक्षाने टीका करावयाची, केंद्र सरकारने त्याचा इन्कार करावयाचा हेही अनेकदा झालेले आहे. पण परिस्थितीत फरक न पडता असे दडपण आणण्याचे प्रकार चालू आहेत. हे सारे थांबवायचे असेल तर ते का घडते हे पाहिले पाहिजे. राज्यपालांची नेमणूक केंद्र सरकारच्या सल्ल्याने राष्ट्र-पतींनी केलेली असते. राज्यपाल केंद्राने नेमलेला असल्याने आपले पद टिकविण्या-साठी तो स्वाभाविकच केंद्राच्या तंत्राने चालतो. राज्यपाल स्वतंत्र बाण्याने न वागता आपल्याच कलाने वागणारा असावा यासाठी निवडणुकीतील पराभूत कांग्रेस नेते किंवा सेवानिवृत्त वरिष्ठ सनदी अधिकारी यांना राज्यपाल म्हणून नेमण्याची प्रथा केंद्र सरकारने पाडली आहे. राज्यांत पेचप्रसंग उद्‌भवला तर स्वतःच खंबीर-पणाने निर्णय घेऊन परिस्थिती न हाताळता राज्यपालांच्या दिल्लीच्या वाऱ्या सुरू होतात. सल्ल्याच्या नावाखाली केंद्र सरकारचे आदेश घेऊन त्यानुसारच ते वागतात. केंद्र सरकारच्या वरिष्ठ नोकरांसारखेच हे वर्तन असते. केंद्राचे राज्यपालांवर दडपण येते, हस्तक्षेप होतो असे म्हणणेही बरोबर नाही. कारण राज्यपालांनी स्वतंत्र बाण्याने एखादा निर्णय घेतला, केंद्र सरकारला तो मान्य झाला नाही व आपला निर्णय केंद्राने राज्यपालांवर लादला तर केंद्राने दडपण आणले किंवा हस्तक्षेप केला असे म्हणता येईल. केंद्राचे आदेश राज्यपाल निमूटपणे मान्य करीत असल्याने केंद्राला दडपण आणण्याचा किंवा हस्तक्षेप करण्याचा प्रसंगच येत नाही. राज्य-पालपद लोकनियुक्त करणे हाच ही परिस्थिती सुधारण्याचा एकमेव मार्ग आहे. लोकनियुक्त राज्यपाल स्वतंत्र बाण्याने वागेल. केंद्राचा अन्याय्य सल्ला, दडपण किंवा हस्तक्षेप तो मान्य करणार नाही.

## संयुक्त आघाड्या–अटळ गरज

चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर बिहारमध्ये सहा सरकारे गडगडली. दोनदा राष्ट्राध्यक्ष राजवट आली. एकदा मुदतपूर्व निवणुका झाल्या. तरीही स्थिर सरकार स्थापन होऊ शकले नाही. मुदतपूर्व निवडणुकीने हा प्रश्न सुटेल असे वाटले होते, पण तसे घडले नाही. याचे एक कारण निर्णायक बहुमत कोणत्याच पक्षास मिळाले नाही. सर्वांत मोठा पक्ष कांग्रेस. बहुमत मिळविण्याची त्यातल्या त्यात आशा कांग्रेसला. पण फुटीने या पक्षाची दोन छकले झाल्याने कांग्रेसला बहुमत मिळणे पूर्वीपेक्षाही

आता फार कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत आघाड्यांची सरकारे ही एक अटळ गरज झालेली आहे. संयुक्त आघाड्यांचे राजकारण तुम्हाला मान्य असो की नसो आजच्या परिस्थितीत त्याशिवाय गती नाही.

संयुक्त आघाड्या कशा टिकतील, त्या अधिक परिणामकारक व कार्यक्षम कशा होतील, अशा आघाड्यांच्या स्थापनेत व कार्यपद्धतीत कोणते संकेत पाळले पाहि-जेत, याचा विचार सर्वच राजकीय पक्षांनी करण्याची वेळ आलेली आहे. संयुक्त आघाडी टिकावयाची तर ती सर्वसाधारणपणे समान धोरणाच्या पक्षांची असली पाहिजे. डाव्या पक्षांची आघाडी होऊ शकेल. पण डाव्या आघाड्याही टिकत नाहीत हा अनुभव केरळ व पश्चिम बंगालमध्ये आला आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष इतर पक्षांवर आपले वर्चस्व गाजविण्याचा प्रयत्न करीत असल्याची इतर पक्षांची तक्रार आहे. अशा धोरणाने आघाड्या टिकणार नाहीत. आघाडीतील सर्व पक्षांची लोकशाही कार्यपद्धतीवर निष्ठा असली पाहिजे. सर्व वादग्रस्त प्रश्नांवर लोकशाही पद्धतीने निर्णय घेतले गेले पाहिजेत. एकदा बहुमताने घेतले गेलेले निर्णय आपल्याला मान्य असोत-नसोत-सर्व घटक पक्षांनी मानले पाहिजेत. जनसंघ, स्वतंत्र पक्ष, सिंडि-केट यांची एक आघाडी होऊ शकेल. ही आघाडी यशस्वी होण्यासाठीसुद्धा वरील पथ्यच पाळावे लागेल. आणखी एक महत्त्वाचे पथ्य. आघाडीत छोटे, स्थानिक पक्ष घेतले तरी आघाडी त्यांच्यावर फारशी अवलंबून नसावी. कारण हे पक्ष संधिसाधू, बिनभरंवशाचे असतात. आघाडीचा कार्यक्रम मान्य करूनही ते केव्हा फुटतील व दगा देतील हे सांगता येत नाही. अशा पक्षांना व अपक्ष सभासदांना उत्तेजन न देणे, अधिकारपदाची आमिषे न दाखविणे हाच त्यांना निष्प्रभ करण्याचा मार्ग आहे. आपल्यावाचून आघाड्यांचे अडत नाही असे दिसून आल्यावर स्वाभाविकच आपला



सवता सुभा न ठेवता हे पक्ष मोठ्या प्रांतिक किंवा अखिल भारतीय पक्षांत विलीन होतील. अर्थात हे घडण्यास काही काळ जावा लागेल.

सरकारे अस्थिर होण्याचे एक महत्त्वाचे कारण संधिसाधू पक्षांतरे. चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर पक्षांतराची ही साथ हरियानापासून सुरू झाली. तंत्र सोपे होते. अधिकारारूढ पक्षातील एका गटाला मंत्रिपदाची आमिषे दाखवून फोडावयाचे, त्यांच्या नेत्याला मुख्यमंत्रिपद द्यावयाचे. हरियानानंतर उत्तर प्रदेश व मध्यप्रदेशची काँग्रेस सरकारे याच पद्धतीने गडगडली. पण हे तंत्र दुधारी होते. काँग्रेसनेही त्याचा वापर विरोधी पक्षांची सरकारे पाडण्यासाठी केला व तो यशस्वी होऊन बिहार, पंजाबची सरकारे गडगडली. आयाराम-गयारामची ही साथ लोकशाहीच्याच मुळावर आली आहे पण तिला आळा घालण्यासाठी परिणामकारक उपाय योजण्याची राजकीय पक्षांची अजून तयारी नाही. प्रत्येक पक्ष आपल्यापुरते पाहतो. पक्षांतर केलेल्या सभासदाने विधानसभेचा किंवा लोकसभेचा राजीनामा देऊन पुन: निवडून आले पाहिजे. नव्या पक्षात किमान एक वर्ष त्यास कोणतेही अधिकारपद किंवा मंत्रिपद मिळता कामा नये. हे दोन नियम सर्व राजकीय पक्षांनी कटाक्षाने पाळले तरी पक्षांतराला बराच आळा बसेल.

हा झाला सध्याच्या संसदीय लोकशाहीच्या कक्षेतील विचार. स्थिर सरकारे स्थापन होण्यासाठी सुचविलेले वरील उपाय सर्व राजकीय पक्षांनी मनःपूर्वक अमलात आणले तर संसदीय लोकशाही अजूनही यशस्वी करता येईल. पण तसे घडले नाही तर अस्थिरता चालूच राहील. त्या परिस्थितीत स्थिर सरकारसाठी संसदीय लोकशाही पद्धती बदलून अमेरिकेसारखी अध्यक्षीय लोकशाही पद्धती आपल्याकडे आणणे हाच एक उपाय ठरेल. कारण अध्यक्षीय पद्धतीत मंत्रिमंडळे विधिमंडळातील बहुमताच्या पाठिंब्यावर अवलंबून नसतात. एकदा मंत्रिमंडळ निवडल्यावर चार वर्षांनी पुन: निवडणूक होईपर्यंत अधिकारावर राहते. घटना दुरुस्तीचा विचार सध्या चालू आहे. त्या संदर्भात अध्यक्षीय पद्धती ही आपल्याकडील आजच्या अस्थिर राजकीय परिस्थितीत उपयुक्त ठरेल काय याचाही विचार लोकशाहीवाद्यांनी केला पाहिजे.

बिहारमधील नव्या सरकारच्या स्थापनेच्या अनुषंगाने आपल्या लोकशाहीतील काही उणिवा व त्या दूर करण्याचे उपाय यासंबंधी काही विचार येथे मांडले आहेत. मी सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे बिहार व उत्तर प्रदेशात जे घडले ती उद्याच्या राजकारणाची नांदी आहे. आपल्या लोकशाहीतील अनिष्ट प्रवृत्ती कशा थांबवायच्या, उणिवा कशा दूर करावयाच्या याबाबत राजकीय कार्यकर्ते, विचारवंत यांनी एकत्र येऊन काही निकोप संकेत ठरविल्याशिवाय आणि ते निर्धाराने अमलात आणल्याशिवाय लोकशाहीचे धिंडवडे थांबणार नाहीत.

□ □ □

७ मार्च १९७०

## मी कोण? आम्ही कोण?....

[ पृष्ठ २४ वरून ]

शिष्टाचार, माणुसकी, आधुनिकता यांचा तिथं मागमूसही दिसत नव्हता. खाली सडकेवरून लक्षाधिशांच्या मोटारी धावत होत्या. एक बारीकशी फटदेखील सामान्य माणसाला रस्ता ओलांडण्यासाठी मिळत नव्हती. वर लोखंडी पूल तरंगत होता. त्यावरून माणसं पलीकडे जात होती. लोकल्स धावत होत्या. माणसांचं पीठ लोकल्सच्या दारावाटे बाहेर पडत होतं. आणि जिना चढता उतरताना जिवाचा धोका टाळता येत नव्हता. जोशीबुवांना म्हटलं,

'काय करायचं?'

'कठड्यांना धरून मुंगीच्या पावलाने पुढेपुढे सरकायचं. हाच समाजवादाचा रस्ता आहे. इंदिराजींच्या कॉंग्रेसचा!'

आम्ही अक्षरशः पाऊण तासाने प्रार्थना समाजाच्या बोळात उतरलो. तिथंही सडकेवरून माणसं वाहत होती.

माणसं–माणसं–माणसं! वारुळातून मुंग्या निघाव्यात तशी ही माणसं बाहेर पडली होती. शहाणी माणसं, वेडी माणसं, अर्धवट माणसं, मतलबी माणसं, भोळी माणसं, हुशार माणसं, मठ्ठ माणसं; माणसंच माणसं! या साऱ्या आणि अशा कोटयवधी माणसांसाठी, त्यांच्या कल्याणासाठी समाजवादाचा मार्ग होता. समोर आजूबाजूला पाच-पाच, आठ-आठ, दहा-दहा, पंचवीस मजली आलिशान इमारती होत्या. रस्त्यांनी हजारो रुपयांच्या शेकडो मोटारी धावत होत्या. आतली माणसं लक्षाधीश–लक्षावधी रुपयांच्या किमतीची होती. आजूबाजूला दुकानांतून, कारखान्यांतून कोटयवधी रुपयांच्या उलाढाली होत होत्या. नुसत्या चोरट्या मार्गांनी येणाऱ्या वस्तूंचा व्यापार कोटी कोटी रुपयांचा होता. हजारो मार्गांनी संपत्ती तयार होत होती आणि हजारो माणसं घराअभावी फटपाथवर झोपत होती. लग्न न होताच त्यांना फूटपाथवर मुलंही होत होती.

लोकल्समध्ये गर्दी होती, गाड्यातून गर्दी होती, बसेसमधून गर्दी होती, रस्त्यावरून गर्दी होती. दुकानातून गर्दी होती आणि हॉटेलसमधूनही गर्दी होती. तरीही भुकेला भाकर मिळत नव्हतो, शरीराला वस्त्रं मिळत नव्हतो, विश्रांतीला निवारा मिळत नव्हता. कोटयवधी रुपयांच्या उलाढाली होत होत्या. शहरातून आणि खेड्यातून हरितक्रांतीची धमाल उडाली होती. तरीही माणूस भुकेकंगाल होता; अन्नाला मोताद होता.

आम्ही रस्त्याने चालत होतो. मन एकीकडे विचार करीत होतं. दुसरीकडे निर्लज्जासारखे हसत कोटया करीत आम्ही चालत होतो. जोशीबुवा म्हणाले, 'आज आता रात्री काहीच राजकीय कार्यक्रम नाही!'

मी त्यांच्याकडे पाहिलं आणि हसलो. तो विनोद होता का उपरोध होता हे लक्षात येत नव्हतं. उद्या सकाळी आझाद मैदानावर नियोजित अध्यक्षांच्या हस्ते झेंडावंदन होतं. नंतर मावळत्या अध्यक्षांचं निरोपाचं भाषण होतं आणि इंदिराजींच्या नव्या काँग्रेसची सुरुवात होती. आज रात्री तसा काहीच कार्यक्रम नव्हता.

आम्ही जेवण केलं आणि रात्री अकरा वाजता अंथरुणावर अंग टाकलं. जोशीबुवा अंथरुणावर पडल्या पडल्या काहीतरी बोलत होते. इंदिरा गांधींना शिव्या घालीत होते. म्हणत होते : हा सारा मूर्खपणा आहे, लबाडी आहे, ढोंग आहे. ही बाई कसला समाजवाद आणणार ? नेहरूंची लेक. स्वत: छानछोकीत वाढलेली. गरीबीची दुःखं हिला काय माहीत ? म्हणे समाजवाद आणणार !

मी त्यांना काहीच उत्तर देत नव्हतो. म्हणून मग त्यांच्या बोलण्याला विशेष धार चढत नव्हती. त्यांचं एकतर्फी बोलणं जुन्या नाटकातल्या स्वगतासारखं वाटत होतं. जोशीबुवांची मतं मला माहीत होती. चर्चिलचीही भारताच्या स्वातंत्र्याविषयी काही मतं होती, स. का. पाटील यांचीही मुंबईविषयी काही मतं होती, नेहरूंचीही चीनविषयी काही मतं होती, मतं चूक ठरत नाहीत असा काही नियम नाही. पण आता जोशीबुवांशी चर्चा करीत बसलो असतो तर झोप उडाली असती. उद्या पहाटे उठून कामाला लागायचं होतं. मी हं, हं, हं, करीत गप्प बसलो तेव्हा त्यांना वाटलं मला झोप लागली आणि मग ते गप्प बसले आणि चटकन झोपी गेले.

मला मात्र झोप येत नव्हती.

मला गलिव्हरच्या गोष्टीतील एक प्रसंग आठवत होता. लेलिपुटच्या किनाऱ्यावर येऊन गलिव्हर थकून झोपला होता. सकाळी त्याला जाग आली तेव्हा अक्षरशः हजारो टिचभर उंचीची माणसं त्याच्या डोक्यावरून, हनुवटीवरून, छातीवरून, मांड्यांवरून इकडून तिकडे आणि तिकडून इकडे फिरत होती. शिवण्याच्या दोऱ्याइतक्या जाडीच्या त्यांच्या नाड्यांनी त्याला बांधून ठेवण्याचा प्रयत्न करीत होती. त्याच्या हाताला, छातीला चिमुकल्या शिड्या लावून त्याच्या शरीरावर चढत होती. त्याला आवळण्याचा, बंदिस्त करण्याचा, त्याला सर करण्याचा, त्याच्यावर विजय मिळविण्याचा प्रयत्न करीत होती. गलिव्हरचं ते अवाढव्य शरीर, ती दुर्दम्य ताकद, ते टिचभर लक्षावधी लोक एकीकडे आणि गलिव्हर एकटा एकीकडे आणि त्या लोकांचा तो राजा ? गलिव्हरपुढे त्या राजाचा कसला पाड !

मला वाटलं भारतासारख्या खंडप्राय देशाचा तो अवाढव्य देह एखाद्या गलिव्हरच्या देहाप्रमाणे पडलेला आहे. निजलिंगप्पा काय अथवा इंदिरा गांधी काय, हा सुस्तावून पडलेला देह कसा काय हलविणार ? त्याला कसा जिंकणार, त्याला उभा कसा करणार ? हे अज्ञान, हे दारिद्र्य, हा जातीयवाद, हा रानटीपणा यांच्याविरुद्ध झगडा देणं सोपं का काम आहे ? इथं कसला समाजवाद येणार बोडक्याचा ! संपत्तीची आसुरी लालसा धरणारे अप्रामाणिक धनी, उद्योगधंद्याच्या नावाखाली

काळाबाजार करणारे उद्योगपती, शिक्षणाच्या पेशाला वाहून घेतलेले पण आत खुर्चीच्या राजकारणात स्वतःचं आणि नव्या पिढीचं आयुष्य बरबाद करणारे आधुनिक सांदिपनी ऋषी आणि राजकारणाला एखाद्या वेश्या व्यवसायाचं हिडीस रूप आणलेले आजचे राजकारणी जार; यांच्या हातून कसले देशाचे राजकारण आणि कसला समाजवाद येणार ?

काही केल्या झोप लागत नव्हती. कुठल्यातरी घड्याळातले दोनचे ठोके पडले. निदान तीन एक तास तरी झोप लागायला हवी होती. पण झोप येतच नव्हती. मी जोशीबुवांना हाक मारली. त्या अंधाऱ्या शांततेत माझा आवाज घुमला आणि विरून गेला. पण जोशीबुवा जागे झाले नाहीत. मनात विचार आला कशाला गेलो आपण अहमदाबादला ? तिथं काय मिळविलं ? पूर्वीच्या बालगंधर्वांच्या नाटकाला लांबून लांबून लोक येत असत. पैसे खर्चून येत असत. पैसे खर्चून नाटक पाहत असत आणि खूष होऊन परत जात असत. अहमदाबादेचंदेखील ते मोठं थोरलं नाटकच होतं. राजकीय नाटक. त्यात कामराज, मोरारजी आदी अथिरथी महारथींनी भूमिका केल्या होत्या. परंतु ते नाटक प्रेक्षकांच्या अंगावर आलं. अक्षरशः निराश मनाने लोक परतले.

आजदेखील ती निराशा गेली नाही. पण आपण एवढे का ओढले गेलो हा प्रश्न राहतोच. मी कोण ? हा प्रश्न अशा वेळी मनाला पडतो. मी कोणी राजकीय कार्यकर्ता नाही. मी कोणी राजकारणाचा विद्यार्थी नाही. इतकंच नव्हे तर कुठल्याही राजकीय पक्षाचा मी साधा सभासददेखील नाही. कुठल्याही वर्तमानपत्राचा अधिकृत प्रतिनिधि नाही. मग मी अहमदाबादच्या अधिवेशनाला का गेलो ? आणि मुंबईच्या या अधिवेशनासाठी का थांबलो ? वास्तविक पाहता राजकारणाचा माझा तसा अगदी परवा परवापर्यंत काही संबंध नव्हता. माझा जन्म तिकडे मराठवाड्यात झालेला (पूर्वीच्या निजाम स्टेटमध्ये.) इंग्रजांच्या काळात ब्रिटिश इंडियामध्ये प्रचंड राजकीय चळवळ सुरू होती. तिची तिकडे आम्हाला गंधवार्ताही नव्हती. माझ्या लहानपणी आमच्या जीवनात तसे काही प्रश्नच नव्हते. एक प्रश्न होता हिंदु-मुसलमानांचा. पण तोदेखील अस्वस्थ करणारा कधीच झालेला नव्हता. (अगदी वीस वर्षांपूर्वी रझाकारांच्या चळवळीमुळे झाला तेवढाच !) आम्ही सुखाने दोन घास खात होतो आणि समाधानाने जीवन जगत होतो. किरकोळ काही गरीबी वगैरेची दुःखे होती, पण ती दैवाधीन असतात अशी आम्हाला शिकवण मिळालेली असल्यामुळे त्यांचंही विशेष दुःख वाटत नव्हतं. सारा समाज सुस्त होता, दैववादी असल्यामुळे आळशी होता. पोटापाण्यापुरती नोकरी मिळाली म्हणजे पुरे होते. आणि त्यासाठी जेवढे शिक्षण (कमीत कमी) घ्यावे लागे तेवढीच तरुण पिढीची महत्त्वाकांक्षा होती. माझा जन्म झाला ते बीड हे जिल्ह्याचे ठिकाण. पण तिथे फक्त एकच हायस्कूल होते आणि तेही परीक्षेचे केंद्र नव्हते. मला आठवते ज्या साली मी मॅट्रिक झालो

त्या साली बीडच्या हायस्कूलहून फक्त सव्वीस विद्यार्थी परीक्षेसाठी पाठविले गेले होते !

अशा या शहराचे त्या वेळचे राजकीय जीवन काय असावे ?

नंतर मी पुढच्या शिक्षणासाठी हैद्राबादला गेलो. (चाळीस सालानंतर) तेव्हा तेथे मी प्रथम गांधींचे आणि पंडित नेहरूंचे नाव ऐकले. हैद्राबादमध्ये मात्र माझ्या संथ आयुष्याला अनेक डोळे आले. असतोष जाणवू लागला. जातीयवादाची झळ थोडी थोडी पोहोचू लागली. आपली मातृभाषा मराठी असून आपल्यावर माध्यम म्हणून उर्दू भाषा लादली गेली आहे. हा जाच आणि त्यामुळे जाणवणारे पारतंत्र्य खुपू लागले. पुढे तर हे पारतंत्र्य अनेक बाबतीत सलू लागले आणि गांधी–नेहरूंच्या प्रतिमा मनात वाढू लागल्या. हे लोक स्वातंत्र्यासाठी झटत आहेत आणि स्वातंत्र्य ही अत्यंत आवश्यक गोष्ट आहे याची जाणीव तीव्र होत गेली. परंतु तेव्हाही राजकीय विचार ज्याला म्हणतात असा कधीच मनाला स्पर्श करून गेल्याचे आठवत नाही.

पुढे स्वातंत्र्य मिळाले. तेव्हा मी पुण्यासच होतो. तेव्हा स्वा. सावरकरांचं भाषण मी प्रथम ऐकलं आणि अंतर्बाह्य मन पेटून उठलं. आपण इतकी वर्षे कुठल्या अंधारात राहत होतो याची शरम वाटू लागली. खरे स्वातंत्र्य आणि आपल्या देशाचे राजकीय जीवन यांची अतिशय तीव्रतेनं जाणीव त्या दोन वर्षांत झाली. सीमेवरच्या मारामाऱ्या, जाळपोळ, रक्तपात यांच्या बातम्यांनी तेव्हाचा माणूस हवालदिल झाला होता, भेदरून–गांगरून गेला होता. स्वातंत्र्य मिळाले म्हणजे काय मिळाले ? असा प्रश्न पडावा एवढी गांगरून सोडणारी, भेदक जाणीवच तेव्हाच्या माणसांच्या मनाचा स्थायीभाव झालेली असावी अशी माझी कल्पना आहे.

त्यातच महात्माजींचा खून झाला.

आणि त्या खुनाच्या निमित्ताने समाजजीवनातील निराळीच विषे ढवळून वर आली. या देशात किती अगणित प्रश्न आहेत याची जाणीव मोठ्या विचित्र तऱ्हेने आली. मला वाटते तेव्हापासूनच या देशातील प्रत्येक माणूस हा राजकारणाचे लक्ष्य बनला. सर्व बाजूंनी राजकारणाने त्याला वेढून टाकले आहे.

खरे म्हणजे सुबुद्ध, सुसंकृत आणि सुस्थितीतील देशाचा नागरिक कधी राजकारणाचा विचार करीत नाही ! तसा त्याने करूही नये. तशी त्याची आवश्यकताही जीवनात नसते. कारण प्रत्येक माणूस आपापल्या व्यवसायात, उद्योगधंद्यात व्यग्र असतो. आपल्या देशातील रिक्षेवाले आणि टांगेवालेदेखील राजकारण बोलतात. याचाच अर्थ देशातील माणूस सुखी नाही. म्हणून इच्छा असो नसो प्रत्येक माणूस राजकारणात ओढला जातो. मला वाटते मी असाच ओढला गेलो असेन. समाजवाद काय आणि राष्ट्रवाद काय ? सामान्य माणसाला फक्त कमी कटकटीचे, सुखी जीवन हवे असते.

७ मार्च १९७०

सिंडिकेटकडून ती आशाच नाही.

इंडिकेटच्या इंदिराबाई श्रीमंती कमी करण्याची आणि गरीबीचा नायनाट करण्याची भाषा बोलत आहेत. काही पावलं त्यांनी त्या मार्गांनी उचललीही आहेत. शिवाय त्यांच्या हातात सत्ता आहे. तरुण पिढी आणि वृद्ध पिढी असल्या सवंग वर्गीकरणाने एखादे तत्त्वज्ञान सिद्ध होत नाही. तेव्हा केवळ यशवंतराव, इंदिराबाई आणि तरुण तुर्क एका बाजूला आहेत तेव्हा नव्या पिढीच्या आकांक्षांचा तेच योग्य विचार करू शकतील असे गृहित धरणे चूक आहे. पाकिस्तानचा भुट्टो हादेखील तरुण रक्ताचाच नेता आहे ना ? पण त्याचे विचार केवढे विध्वंसक आहेत. (त्याच्याच देशाच्या दृष्टीने.)

विचारांच्या झपाट्यात केव्हा झोप लागली ते कळले नाही. पण दुसऱ्या दिवशी जोशीबुवांनी जोरजोरात हलवून जागं केलं तेव्हा भिंतीवरच्या घड्याळात साडेसात झाले होते. जोशीबुवा म्हणाले,

' अहो, झोप आहे का काय ? आता लवकर आटोपा.'

आम्ही झटपट दाढी–अंघोळ उरकली आणि थोडा नाश्ता करून आम्ही आझाद मैदानावर गेलो.

टॅक्सीमधून आम्ही खाली उतरलो तेव्हा आझाद मैदान रंगीबेरंगी कापडातील माणसांनी गजबजले होते. सकाळची वेळ होती. कोवळे ऊन मैदानावर पडले होते. झाडांचे उंच उंच शेंडे सोनेरी दिसत होते. मोठमोठ्या इमारतींमधील माणसे इकडे तिकडे करताना खिडक्यांतून दिसत होती. व्ही. टी. स्टेशनची भव्यता, टाईम्स ऑफ इंडियाची इमारत आणि आझाद मैदानावर जमलेल्या लोकात एक कसलं तरी नातं आहे, असावं असं वाटत होतं. उघड्या मैदानावर झेंडावंदन झालं. बाबू जगजीवनराम आज अगदी स्वच्छ कपड्यात होते. नंतर सर्व लोक आतल्या मंडपात गेले. तेवढ्यात गर्दी इतकी वाढली की तीस-चाळीस हजार लोक बसतील एवढा भव्य मंडप माणसांनी खच्चून भरून गेला. मंडपाबाहेरही हजारो माणसं तिष्ठत थांबली.

आत श्री. सुब्रह्मण्यम यांचे निरोपाचे भाषण चालले होते. त्यांचे भाषण परिणामकारक होते. सर्व गोष्टींची जाणीव त्या भाषणातून जाणवत होती. अलीकडे टीकात्मक भाषण किंवा राणाभीमदेवी भाषण या दोन प्रकारांशिवाय कार्यकर्त्यांच्या भाषणाला सूर लागतच नाही. आपल्या प्रतिस्पर्ध्यांना शिव्या घालावयाच्या किंवा आपण यँव करू आणि त्यँव करूच्या आरोळ्या ठोकीत राहायच्या. सुब्रह्मण्यम यांचे भाषण असल्या सवंग प्रकारांपासून मुक्त होते. प्रचारकी थाट ज्याला म्हणतात तोसुद्धा त्यातून प्रतीत होत नव्हता. मी तर सर्वांना ते भाषण मुळातच वाचण्याची शिफारस करीन.

नंतर बाबूजी भाषणास उठले. ते जेमतेम पंधरा मिनिटे बोलले आणि आपल्या

भाषणाच्या शेवटी ते म्हणाले, 'आता यानंतर पंतप्रधान इंदिरा गांधी भाषण करतील.' या घोषणेनंतर अक्षरशः दोन मिनिटे सभागृहात टाळ्यांचा प्रचंड कडकडाट होत होता !

बाई व्यासपीठावरच होत्या. व्यासपीठाच्या मागे गांधी-नेहरू आणि लालबहादूर यांच्या तसबिरी होत्या. मला अहमदाबादमधील त्या सिंधी ठेकेदाराच्या बोलण्याची आठवण झाली. 'यांचे आई-बाप एकच. सारं ढोंग आहे वगैरे.' सुब्रह्मण्यम् यांचे भाषण संपले आणि खरोखरच ढोंगाला सुरुवात झाली अशी जाणीव मला झाली. जोशीबुवा तर काय ? बोलून चालून इंडिकेटच्या विरुद्धच ! जगजीवनराम यांचं भाषण म्हणजे शब्द आणि कृती यामध्ये केवढी भयाण दरी असू शकते याचं प्रत्यंतर देणारा अनुभव. खरोखरच आपली लोकशाही धन्य आहे आणि भारतीय जनताही धन्य आहे ! जो नेता नुकताच सार्वजनिक रीतीने बदनाम झालेला आहे; ज्याच्यावर केलेला आरोप सिद्ध झालेला आहे, तोच नेता नव्या बंडखोर काँग्रेसचा पुरोगामीत्वाचा झेंडा मिरवणाऱ्या काँग्रेसचा अध्यक्ष निवडला जातो (आणि जो मंत्रीपदाचादेखील राजीनामा देत नाही. या पाठीमागे लोकहितापेक्षा वैयक्तिक स्वार्थच अधिक) आणि जो जनतेत येऊन लाखो लोकांच्या समोर धडधडीत, छातीठोकपणे भाषण करू शकतो आणि टाळ्या मिळवू शकतो याचं इंगित काय असावं हे आपल्याला काही कळत नाही ! धन्य ती भारतीय जनता आणि धन्य ते तिचे नेतृत्व !

इंदिराजी व्यासपीठावरून माईकपाशी आल्या. त्यांच्या अंगावर लेमन रंगाचे नाजुक पातळ होते. त्यांच्या कांतीला त्या पातळाच्या पोताची आणि रंगाची कांती शोभत होती, परंतु समाजवादी समाजरचनेच्या व्रताशी मात्र ते सारंच विसंगत वाटत होतं. महात्मा गांधींनी जन्मभर सत्य, कृती आणि उक्ती यांमध्ये अद्वैत शोधण्याचा प्रयत्न केला, त्यांचं जीवन म्हणजे हा महायज्ञच होता. त्यांच्या पासंगालाही आजचं भारतीय नेतृत्व उतरणार नाही ! अहमदाबादला साबरमतीच्या आश्रमात एक पाटी इंग्रजीत लिहिलेली आहे. एका विदेशी वार्ताहराने गांधींना, 'तुमचा काही संदेश मला लिहून द्या' म्हणून डायरी पुढे केली होती. त्यावर महात्माजींनी लिहिले होते, 'माझे जीवनच माझा संदेश आहे.' हीच ती इंग्रजी पाटी. विसंगत बोलणे, विसंगत जगणे आणि विसंगत वागणे हा आजचा युगधर्म झालेला आहे.

इंदिराजींचे भाषण चांगले होते. त्यांच्या भाषणातून देशापुढील आजच्या समस्यांची संपूर्ण जाणीव होत होती, श्रोत्यांकडून त्यांना कडाडून टाळ्याही पडत होत्या. पण माझं मन मात्र अस्वस्थ होत होतं. कृती आणि उक्ती यांच्यात प्रचंड, भयाण दरी पसरली होती. दिवाळीत जसे दारूकाम चालते, अर्धा-पाऊण तास सारा अंधार उजळून निघतो, उजळ प्रकाशाचा झगझगाट दिसतो आणि नंतर

पुन्हा भयाण अंधार पसरतो तसे बाईंचे भाषण वाटत होते भुईनळे, फुलबाज्या, अग्नीबाण, चंद्रज्योती पेटत होत्या. शब्द उडत होते, चकाकत होते, प्रकाशत होते, नाचत होते, झगमगाट होत होता. समोरचा श्रोतृवर्ग टिनोपॉल होता, मंडप भव्य होता. दिवस असून दिव्यांचा झगझगाट होता....बाई बोलत होत्या. 'हम अमीरोंके मकान गिराना नहीं चाहते। लेकिन हम गरीबोंको मकान देना चाहते हैं। गरीबी और अमीरीमें जो विषमता है वह हम दूर करना चाहते हैं।'...आणि ?

आणि मुंबईतून लोकल्स धावत होत्या. त्यातून माणसांचं पांढरं पीठ गळत होतं. झोपडपट्टीत भाकरीच्या तुकड्यावरून भांडणं चालली होती, उघडी गटारं वाहत होती, नागडी पोरं तिथंच परसाकडेला बसली होती, डुकरं आसपास हिंडत होती; हातभट्ट्या पेटल्या होत्या, फुटपाथवर झोपणारी माणसं खिसे कापण्याच्या कामधंद्यांना बाहेर पडली होती, श्रीमंतांच्या मोटारी रस्त्याने भर वेगात धावत होत्या. गिरण्यांची धुराडी पेटली होती, गरीब कामगार घाम गाळीत होते आणि तलम, सुळसुळीत टेरिलीन कापड तयार होत होतं.

इंदिराबाईंचं भाषण चाललंच होतं. टाळ्या पडतच होत्या. शब्दांच्या चंद्रज्योती पेटल्या होत्या. टिनोपॉलमध्ये आलेला श्रोतृवर्ग माना डोलवीत होता. समाजवाद आणण्याची प्रतिज्ञा बोलून दाखविली जात होती. बाईंचा भाव वाढला होता. त्यांच्या नेतृत्वाला निर्विवाद बहुमत मिळालं होतं.

तिकडे झोपडपट्टीतील कुत्री भुंकत होती. डुकरं पळत होती. नागडी मुलं विष्ठी करीत होती. बाया पाण्यासाठी भांडत होत्या आणि पोलिसांचं पोट भरावं म्हणून हातभट्ट्या पेटल्या होत्या !

आणि कधीही आवेशाने, त्वेषाने, क्रोधाने, भावनावश होऊन न बोलणारे यशवंतरावजी चव्हाण म्हणत होते, 'समाजवादाचा मार्ग आता आम्ही नक्की केला आहे. बाई जरी त्या मार्गावरून ढळल्या तरी आम्ही ढळणार नाही, हा मार्ग आता सोडणे नाही. आम्ही खाली उतरण्याचे दोर आता कापून टाकले आहेत !'

असा हा मार्ग !

## समाप्त

Statement about ownership and other particulars about newspaper 'MANOOS' Weekly to be published in the first issue every year after last day of February.

FORM IV
( See Rule 8 )

| | |
|---|---|
| 1. Place of Publication | 1025 Sadashiv Peth<br>Poona 30 |
| 2. Periodicity of its publication | Weekly |
| 3. Printer's Name | S. G. Mazgaokar |
| whether citizen of India | yes |
| If foreigner, state the country of origin | Not applicable |
| Address | 1025 Sadashiv Peth<br>Poona 30. |
| 4. Publisher's Name | S. G. Mazgaokar |
| whether citizen of India | Yes |
| If foreigner, state the country of origin | Not applicable |
| Address | 1025 Sadashiv Peth,<br>Poona 30 |
| 5. Editor's Name | S. G. Mazgaokar |
| whether citizen of India | Yes |
| If foreigner, state the country of origin | Not applicable |
| 6. Address | 1025 Sadashiv Peth,<br>Poona 30 |
| 7. Names and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one per cent of the total capital. | Rajhans Prakashan<br>1025 Sadashiv Peth,<br>Poona 30.<br>(1) S. G. Mazgaokar<br>(2) B. M. Purandare |

I, S. G. Mazgaokar, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date 1–3–1970

Signature of Publisher
S. G. Mazgaokar

# प्रेम-पुजारी

## भाई भगत

विदेशी चित्रपट पाहायची संवय नसलेल्या प्रेक्षकांसाठी खास सोय. आणि तीही आपल्या राष्ट्रभाषेतल्या चित्रपटाची. तो चित्रपट आहे सुप्रसिद्ध चॉकलेट हीरो देव आनंद यांचा—नवकेतन इंटरनॅशनलचा 'प्रेमपुजारी.' त्यात काय नाही ? त्यात युद्धाची दृश्ये आहेत, प्रेमचाळे आहेत, गाणी, नाच इतकंच काय फॉरेन कॅबरे डान्सही आहे. एवढं दाखवून प्रेक्षक खूष झाले नाहीत तर परदेशातील लंडन, स्पेन, पॅरीस ह्या शहराचं दर्शनही आहे.

तुम्ही म्हणाल मग हा चित्रपट आहे की एखादी डॉक्यूमेंटरी फिल्म ? तसं 'प्रेमपुजारी' हे एक भारतीय चित्रच आहे. कसे ते पहा.

खेमकरण गावातली ही कथा. एका रिटायर्ड सैनिकाचा राम नावाचा मुलगा. त्याला युद्ध त्यातील मनुष्यसंहार नको असतो. म्हणून तो सैन्यात जायला नाखूष असतो. तो असतो अहिंसेचा पुजारी. (मला वाटते अहिंसा म्हणजेच प्रेम असा अर्थ निर्मात्याने गृहीत धरला असावा!) हा अहिंसेचा म्हणजे प्रेमाचा पुजारी दिवसभर करतो काय तर हातात फुलपाखरे पकडायचे जाळे घेऊन शेतातून, नदीनाल्यातून आपली प्रेयसी (वहीदा रेहमान) हिच्याबरोबर प्रेमाचे चाळे करीत फिरतो, गाणी म्हणतो. आणि एका घटकेला तर चक्क आपण अहिंसेचे पुजारी आहोत हे दाखवण्यासाठी हातातली बंदूक नदीत फेकून देतो.

त्याच्या वडलांना हे त्याचे वागणे आवडत नसते. ते त्याला नेहमी सैन्यात जा म्हणूनच उपदेश करतात. शेवटी हा प्रेमपुजारी राम सैन्यात परत जातो. आणि एका कुत्र्याच्या मृत्यूने त्याच्या मनात कालवाकालव होते. तो त्याच्या वरिष्ठाचे ऐकत नाही—त्याला कोर्टमार्शल कोठडीत टाकण्यात येते. तो तिथून पळतो—पुढे एका एअरक्रॅशमध्ये एक पाकिस्तानी स्त्री हेर रानी (झहिदा) हिच्या तावडीत सापडतो आणि मग तिच्याबरोबर तो परदेशात फिरतो—तिच्या कारवाया हाणून पाडतो—

इथे पाकिस्तानी लोक खेमकरणवर हल्ला चढवतात. गाव उद्ध्वस्त होते—नेमका त्याच वेळेस राम परत आपल्या मायभूमीत येतो—भारतीय सेना प्रतिहल्ला चढवून खेमकरण जिंकून घेते—आणि युद्धाची समाप्ती होते.

बस्स—खेळ खलास ! तमाम प्रेक्षक वंदेमातरम्साठी म्हणा किंवा थिएटरबाहेर पळण्यासाठी म्हणून तयार होतात.

वास्तविक चित्रपटाचा विषय चांगला आहे. परंतु त्या ठिकाणी जर चांगला

पटकथा लेखक असता तर त्याने त्या विषयाचे सोने करून दाखवले असते. एक अहिंसक माणसाचे वेळ आल्यावर शस्त्र हातात घेऊन कसे परिवर्तन होते हे चांगल्या तऱ्हेने दाखवता आले असते. परंतु देवसाहेबांनी आपल्या आधीच्या सस्पेन्स फिल्मप्रमाणे ह्याही बोलपटात हेरगिरीच्या नावावर खूप सस्पेन्स दडपण्याचा प्रयत्न केलाय्. त्यामुळे एखादे विचारप्रवर्तक चित्र बनण्याऐवजी 'प्रेमपुजारी' हे सामान्य चित्र बनले गेले.

मध्यंतरापर्यंत चित्रपट भलताच फास्ट टेम्पोने जातो. म्हणजे चित्रपट सुरू होऊन दोन तास कसे गेले ते कळतच नाही. मग मात्र इंटरव्हलनंतर मंदगतीने चित्र चालते. ते कधी संपते इथे प्रेक्षकाचे लक्ष लागून राहाते.

गाण्याच्या बाबतीत बर्मनदादानी विशेष समाधान दिलेले नाही. अगदी टायटल साँग व त्यानंतरचे देव आनंदचे शेतातले वहिदाबरोबरचे गाणे सोडल्यास बाकी कुठेच गंमत नाही. शेतातल्या गाण्याचे टेकींगही उत्तम आहे. सर्क्युलर ट्रॉली मूव्हमेंटने खूप मजा आणलाय्.


या चित्रपटात प्रेक्षकांचे पैसे सर्वात जर कुठे वसूल होत असतील तर नादीया गमालच्या कॅब्रे डान्समध्ये. कलात्मक रीतीने चित्रीत केलेला हा डान्स डोळ्याचे पारणे फेडतो.

देव आनंदच्या दिग्दर्शनाच्या काही झलका खरेच उल्लेखनीय अशाच वाटाव्या. वहिदा एअरक्रॅशमध्ये जमिनीवर पडली आहे. तिची पर्स तिच्याजवळच पडली आहे. त्या मध्ये तिच्या मागून येणाऱ्या देव आनंदचे प्रतिबिंब दिसते. हा शॉट अप्रतिम असाच आहे. (आमच्या चित्रपट–टीकाकारांना असले शॉट नेहमी कॅमेरामन घेतो असे वाटत असते. वास्तविक ही किमया दिग्दर्शकाची असते. यालाच दिग्दर्शनाचे टचेस् म्हणतात.) फुलपाखरांचा सिंबॉलिझम दाखवून नायकाची अहिंसक मते दाखवली आहेत. तो फुलपाखरांनादेखील मारीत नाही. असे एकदोन नमुने सोडल्यास दिग्दर्शनाच्या विशेष गमती कुठेही आढळत नाहीत. 'शोखियोंमें घोला जाय' ह्या गाण्याचे टेकिंग म्हणजे उत्कृष्ट दिग्दर्शनाचा नमुना.

फोटोग्राफी हे ह्या बोलपटाचे एक ॲसेट ठरावे असे म्हणावे लागेल. फली मिस्त्री ह्यांचे कौतुक करावे. वहीदा रेहमान ह्या बोलपटाइतकी सुंदर कधीच दिसली नव्हती.

शेख यांच्या एडिटिंगविषयी थोडसं. त्यानी फास्ट कटींग पद्धत चांगली वापरली आहे. उदा. सुरुवातीच्या काही प्रसंगात डिझॉल्व्ह फिल्मचा उपयोग न करता केवळ कटसिस्टीम वापरली आहे. दुसरी गोष्ट म्हणजे एखादा सिक्वेन्स कट करून पुढल्या प्रसंगावर साऊंड ओव्हरलॅप करण्याची पद्धत. भारतीय चित्रपटात ही प्रथा मी प्रथमच पहातो आहे. त्याबद्दल दिग्दर्शक देव आनंद व एडीटर बाबू शेख ह्यांना धन्यवाद.

इतके जरी मी लिहिले तरी सामान्य प्रेक्षकाला हा चित्रपट आवडावा इतका रंजक बनविला आहे. अर्थात हे श्रेय देवसाबूंचे व त्यांच्या सहकाऱ्यांचे. ◻ ◻ ◻



# अंदाज

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

७ ते १३ मार्च ७०

**मेष** : या सप्ताहातील ग्रहमान मेष राशीला सुखकारक आहे. रवि-राहू-बुध अकरावे, शुक्र बारावा, शनि मंगळ पहिले, गुरू सातवा असे सर्व ग्रह शुभ फलदायी आहेत. चंद्राचे भ्रमण ११।१२।१।२ या घरातून आहे. ता. ८।९ ला स्त्रियांकडून विवाहाची विचारणा केली जाईल. भागीदार व पत्नीशी मतभेद. प्रवासयोग. प्रवासात फायदा. सार्वजनिक कामात यश. विद्येत थोडे अडथळे येतील. संतती विरोध करील. चैनीच्या वस्तूंकरता अफाट खर्च होईल. शास्त्रीय लिखाण हातून होईल. ता. ११।१२ ला अचानक धनलाभ होईल. मातुल घराण्याकडून मदत होईल. सर्व आठवडाच शुभ फलदायी आहे. ज्यांची नावे च, ल, र, त, अ या अक्षरांनी सुरू असतील त्या व्यक्ती अगर संस्थांना वरीलप्रमाणेच फळे मिळतील. परदेशगमनाच्या आकांक्षा एप्रिल महिन्यापर्यंत पुऱ्या होतील.

**वृषभ** : या सप्ताहातील ग्रहमान वृषभ राशीला प्रगतिपर आहे. रवी-राहू-बुध दहावे, शुक्र अकरावा, शनी-मंगळ बारावे, गुरू सहावा. शनीमंगळ बाराव्या घरात आहेत. ६।८।१२ मधील पाप ग्रह शुभफळ देतात. शत्रूनाश होईल. अचानक धनलाभ होईल. वडील माणसे-विशेषत: वडील आजारी पडण्याचा योग आहे. चंद्राचे भ्रमण १०।११।१२।१ या घरातून आहे. ता. १०।११ ला थोडेसे मनाविरुद्ध घडेल. १२।१३ धनयोग येईल. सार्वजनिक कामात भरघोस यश येईल. घराबद्दल अगर स्थावर बद्दलची कामे जरा पुढे ढकलावी. प्रवासाला दिवस चांगले नाहीत. विद्येत यश येईल. भागीदार व पत्नीशी मतभेद होतील. न, य, व, ब, आणि सर्व स्वरांनी ज्यांची नावे सुरू आहेत त्या व्यक्तींना व संस्थांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा १०।११।१२।१३.

**मिथुन** : या सप्ताहातील ग्रहमान मिथुन राशीला शुभफलदायक आहे; रवी-राहू-बुध नववे, शुक्र दहावा, शनी-मंगळ अकरावे व गुरू पाचवा असे सर्व ग्रह यश देण्याला सिद्ध आहेत. शिवाय चंद्राचे भ्रमण १०।११।१२ या घरातून होत आहे. शेवटचे दोन दिवस १२।१३ तारखांना अचानक अफाट खर्च होईल. विद्येत यश येईल. वडील भावंडे व मित्र यांच्याकडून मदत होईल. भागीदारीच्या धंद्यात, विशेषेकरून चैनीच्या वस्तूंच्या धंद्यात बराच फायदा होईल. लग्न जमण्याचा योग येईल. सरकारी कामात यश येईल. ४२ वर्षाच्या पुढे वय असलेल्या व्यक्तींना जास्त यश

आहे. सार्वजनिक कामात अपयश येईल. क, प, द, ध, च, फ, झ, ञ, घ, भ, थ छ या अक्षरांनी ज्यांची नावे सुरू असतील त्या व्यक्तींना अगर संस्थाना वरील प्रमाणेच फळे मिळतील.

शुभ तारखा ९।१०।११।१२.

कर्क : या सप्ताहातील ग्रहमान कर्क राशीला धनदायक आहे. दहावे शनिमंगळ-नववा शुक्र, आठवे रवी-राहू-बुध व चवथा गुरू असे ग्रह आहेत. दशमातील शनी-मंगळ व्यवसायाचा बोजवारा उडवतील. शत्रूकडून अब्रूनुकसानी करण्याचा प्रयत्न होईल. सरकारी कामात अपयश येईल. फक्त गुरू चतुर्थात असल्यामुळे शेवटच्या क्षणाला अब्रू बचावली जाईल. पत्नीकडून सहकार्य चांगले मिळेल. वाहतुकीच्या धंद्यातील लोकांना फायदा होईल. भाग्यातील शुक्र व चतुर्थातील गुरू हा अन्योन्य-योग चांगला आहे. भाग्य व सुख दोन्ही प्राप्त होईल. चंद्राचे भ्रमण ९।१०।११ या घरातून आहे ते चांगले. चंद्र लग्नेश आहे. ता. ८।९ प्रवासात फायदा १०।११ ला मनस्वास्थ्य विघडेल. पत्नीशी भांडण होईल. १२।१३ ला मित्रांकडून साहाय्य होईल. सर्व अडचणीतून सुखरूप बाहेर पडाल. ज, स, ख, ग, श, या अक्षरानी ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे सुरू असतील त्याना वरीलप्रमाणेच फळे मिळतील. सर्व आठवडा शुभफल देणारा आहे.

सिंह : या सप्ताहातील ग्रहमान सिंह राशीला यश प्राप्त करून देणारे आहे. नवमात शनीमंगळ, अष्टमात शुक्र, सप्तमात रवी-राहू-बुध, तृतीयात गुरू असे शुक्राखेरीज सर्व ग्रह शुभ आहेत. शुक्र दहाव्या व तिसऱ्या घराचा अधिपती अष्टम-स्थानात गेला. स्त्रियांकडून मानहानी, प्रेम प्रकरणात अपयश व आत्मघातकी विचार वाढतील. एकच एक केंद्र त्रिकोणाधिपती मंगळ भाग्यात आहे. तो या संकटातून वाचवील. भावडांकडून त्रास होईल. विद्येत यशप्राप्ती. २७ ते ३२ वयापर्यंतच्या व्यक्तींना प्रेमात अपयश. चंद्राचे भ्रमण ८।९।१० या स्थानातून आहे. चंद्र व्ययेश आहे. पहिले दोन दिवस ८।९ मानसिक त्रास फार जाणवेल. सर्व गोष्टी मनाविरुद्ध होतील. १०।११ ला अचानक प्रवासाला जावे लागेल. १२।१३ दिवस चांगले आहेत. सरकारी कामात अपयश. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे ग, श, म, ट, या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील.

शुभ तारखा ९।१०।११।१२

कन्या : या सप्ताहातील ग्रहमान कन्या राशीला पीडादायक आहे. सहावे रवी-राहू-बुध, सातवा शुक्र, आठवे शनी-मंगळ, व दुसरा गुरू असे सर्वच ग्रह मारक स्थानातून आहेत. भावंडांकडून त्रास. विद्येत अपयश, मानहानी. स्त्रियांकडून लाभ होईल. धनप्राप्ती चांगली होईल. सट्टा लॉटरीत अचानक धनलाभ होईल. चंद्राचे भ्रमण ७।८।९ या स्थानातून आहे. ते तितकेसे चांगले नाही. ८।९ तारखांना मित्रां-कडून थोडाफार लाभ होईल. १०।११ तारखा सर्व दृष्टीनी त्रासदायक जातील.

धननाश संभवतो. या राशीची माणसे अत्यंत खोल मनाची असतात. या महिन्यात ही त्यांची वृत्ती जास्त दिसून येईल. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे क, प, द, ध, च या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील.

शुभ तारखा १२।१३

**तूळ :** या सप्ताहातील ग्रहमान तूळ राशीला सौख्यदायक आहे. पाचवे रवी–राहू–बुध, सहावा शुक्र, सातवे मंगळ–शनी व पहिला गुरू असे सर्वग्रह शुभफलदायी आहेत. शुक्र लग्नेश सहावा आहे. हा अत्यंत चांगला योग आहे. सार्वजनिक कामात यश मिळेल. हातून पराक्रम होईल. शत्रूनाश निश्चित होईल. शास्त्रीय लिखाण हातून होईल. पत्नीकडून लाभ होईल. भागीदारांकडून मदत होईल. लोखंडी सामानाच्या–यंत्रांच्या व्यापाऱ्यांना भरभरटीचा काळ आहे. चंद्राचे भ्रमण ५।६।७ या स्थानातून आहे. ता. ८।९ मानसिक स्वास्थ्य बिघडेल. संततीकडून त्रास होईल. वडील भावंडाना आजारीपण येण्याचा योग आहे. स्त्रियांकडून १०।११ ला त्रास होण्याचा योग आहे. १२।१३ तारखांना इभ्रतीला धक्का बसण्याचा योग आहे. पण लग्नातील गुरू सर्व अडचणी नाहीशा करील. र, त, या अक्षरांनी ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील.

शुभ तारखा १०।११।१२

**वृश्चिक :** या सप्ताहातील ग्रहमान वृश्चिक राशीला सौख्यदायक आहे. चवथे रवी–राहू–बुध, पाचवा शुक्र, सहावे शनी–मंगळ व व्ययात गुरू. गुरू खर्च फार करील. विद्येत अपयश. संततीकरता खर्च करावा लागेल. चंद्राचे भ्रमण ४।५।६।७ स्थानातून आहे. ते चांगलेच आहे. चंद्र भाग्येश आहे. ८।९ तारखांना घरासंबंधी सरकारी कामे यशस्वी होतील. शनी–मंगळ योग शत्रुनाश घडवून आणील. मामा अगर सासऱ्याकडून सर्व प्रकारची मदत होईल. भागीदारही सर्व प्रकारे उपयोगी पडेल. अचानक धनलाभ होईल. स्त्रिया आपण होऊन विवाहाबद्दल विचारणा करतील. २७ ते ३२ वयातील व्यक्तींना–स्त्री, पुरुषांना–हा योग आहे. न, य, व, ब या अक्षरांनी ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील.

शुभ तारखा १०।११।१२.

**धन :** या सप्ताहातील ग्रहमान धनु राशीला मिश्र फलदायी आहे. तिसरे रवी–राहू–बुध, चवथा शुक्र, पाचवे शनी–मंगळ, अकरावा गुरू असे सर्वच ग्रह शुभस्थानात आहेत. चंद्राचे भ्रमण ३।४।५ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. विद्याभ्यासात यश. शास्त्रीय अभ्यासात जास्त प्रगती. घरात शुभसमारंभ घडून येईल. विवाहाच्या योजना जमून येतील. धनलाभ चांगला होईल. कलेत यशप्राप्त होईल. सरकारी कामात यश येईल. संतती चांगली वागेल. २८ ते ३२ वयातील मिलिटरी अधिकाऱ्यांना प्रमोशन मिळेल. मित्रमंडळी चांगली वागतील. १०।११ ला कलेपासून

पसा मिळेल. क, प, द, घ या अक्षरांनी ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे सुरू असतील त्यानाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील.

शुभ तारखा १०।११।१२।१३.

मकर : या सप्ताहातील ग्रहमान मकर राशीला भोगदायक आहे. दुसरे रवी–राहू–बुध, तिसरा शुक्र, चवथे शनी–मंगळ, व दहावा गुरू असे सर्वच ग्रह शुभ-फलदायी आहेत. धनस्थानातील राहू–रवी वाचाशुद्धी कमी करतील. बोलण्यात संयम राखणे जरूर आहे. धंदा–व्यवसाय उत्तम चालेल. चतुर्थेश मंगळ लग्नेश शनीबरोबर सुखस्थानात आहे. त्यामुळे घरच्या अडचणी नाहीशा होतील. चंद्राचे भ्रमण २।३।४ या घरातून आहे. ८।९ मनस्वास्थ्य बिघडेल. सरकारी कामे पुढे ढकलावी. नोकरीच्या प्रयत्नांना यश मिळण्याचा योग आहे. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे ज, स, ख, ग, श या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरील-प्रमाणेच फळे मिळतील.

शुभ तारखा १०।११।१२

कुंभ : या सप्ताहातील ग्रहयोग कुंभराशीला भोगदायक आहेत. पहिले रवी–राहू–बुध, दुसरा शुक्र, तिसरे शनी–मंगळ व भाग्यात गुरू असे सर्व ग्रह सेवेला तयार आहेत. धनलाभ चांगलाच होईल. संततीकडून सहाय्य होईल. प्रतिष्ठा वाढेल. विद्याभ्यासात यश येईल. शास्त्रीय विषयात प्रगती होईल. चंद्राचे भ्रमण १।२।३।४ या स्थानातून आहे. ता. ८।९ मनस्वास्थ्य बिघडेल. भागीदारांशी थोडासा मतभेद होईल. प्रतिष्ठा वाढेल. प्रवास शुभकार्याकरता घडेल. त्यात यशप्राप्ती होईल. ता. १३ घरात काही समारंभ घडून येईल. धाडसाने केलेल्या प्रयत्नात पुढे पाऊल पडेल. नवीन योजना यशस्वी होतील. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे ग, श, म, ट, ठ या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील.

शुभ तारखा १०।११।१२।१३

मीन : या सप्ताहातील ग्रहमान मीन राशीला सुखनाशक आहे. व्ययात रवी–राहू–बुध, लग्नात शुक्र, दुसऱ्या घरात शनी-मंगळ व अष्टमात गुरू असे सर्वच ग्रह अशुभ स्थानात आहेत. धननाश होईल. प्रतिष्ठेला धक्का बसण्याची वेळ येईल. विद्याभ्यासात अपयश. संततीकडून त्रास. सरकारी कामे पुढे टाकावी. कोणत्याही–रवी–गुरू त्रिकोण व व्ययातील राहू–शत्रूचा नाश करतील. अडचणींचा कडेलोट पण त्यातून निश्चित सुटका होईल. अचानक मदत मिळेल पण कसोटीच्या परि-स्थितीतून जावे लागेल. आयत्या वेळी स्त्रियांकडून मदत होईल. ललितकलेतील व्यावसायिकांना प्रगतिपर दिवस आहेत. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे क, प, द, ध, च अक्षरांनी सुरू आहेत त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील.

शुभ तारखा ९।१० बाकी आठवडा त्रासदायक आहे. ◻ ◻ ◻

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ. पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री ग. माजगावकर



"...दरवाढ रोखण्यासाठी वस्तूंचं उत्पादन वाढायला पाहिजे. वस्तूंचं उत्पादन वाढण्यासाठी उद्योगधंद्याची वाढ व्हायला पाहिजे. उद्योग-धंद्याच्या वाढीसाठी रेल्वे कार्यक्षम रहायला पाहिजे. रेल्वे कार्यक्षम रहाण्यासाठी भाड्यात दरवाढ अपरिहार्य आहे. आलं ना आता लक्षात दरवाढ होऊ नये म्हणून दरवाढ करणं कसं अपरिहार्य आहे ते?...."